Panchayati Raj
Government of India
पंचायती राज मंत्रालय.
भारत सरकार

ग्राम विकास विभाग,
महाराष्ट्र शासन

## राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान

# मी सरपंच.....
# .....मी लोकसेवक.

## थेट निवडून आलेल्या सरपंचांचे क्षमताबांधणी प्रशिक्षण

शाश्वत विकासासाठी गावसंस्था नियंत्रण, सेवांची गुणवत्ता आणि
योजनांची अंमलबजावणी सरपंचांची भूमिका
(संदर्भ साहित्य)

यशदा

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा)
राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे - ४११ ००७

# थेट निवडून आलेल्या सरपंचांचे
# क्षमताबांधणी प्रशिक्षण – संदर्भ साहित्य


**प्रेरणा**

श्री. आनंद लिमये, (भाप्रसे) महासंचालक, यशदा, पुणे

इंजि. असीम गुप्ता, (भाप्रसे) सचिव, ग्रामविकास व पंचायतराज, महाराष्ट्र शासन

**मार्गदर्शन**

श्री. अजय सावरीकर,
संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे

श्री. डी. डी. शिंदे,
राज्य प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष,
रा.ग्रा.स्व.अं. महाराष्ट्र राज्य, पुणे

**संपादन**

श्रीमती प्रांजल शिंदे,
सहाय्यक प्राध्यापक, राग्राविसं., यशदा

डॉ. श्री. दादासाहेब काटे,
प्रकल्प अधिकारी, राग्राविसं., यशदा

**लेखन सहाय्य**

श्री. अंकुश बगाटे,
प्रकल्प उपसंचालक, एसपीआरसी, यशदा

श्री. बी.एम. वराळे,
प्रकल्प उपसंचालक, एसपीआरसी, यशदा

श्री. म.ल. वाघमारे,
प्रकल्प उपसंचालक (पेसा), राग्राविसं, यशदा

श्रीमती अनिता महिरास,
सहाय्यक प्राध्यापक, राग्राविसं, यशदा

श्रीमती स्नेहा देव,

श्री. रामप्रसाद पोले
संशोधन सहाय्यक, राग्राविसं, यशदा

**प्रकाशन सहाय्य**

डॉ. बबन जोगदंड,
संशोधन अधिकारी, प्रकाशन विभाग, यशदा

**तांत्रिक सहाय्य**

**श्री. संजय शेलार,** सहाय्यक लेखाधिकारी, रा.ग्रा.वि.सं.
**श्री. पांडुरंग गाडेकर, श्रीमती अलका सोमवंशी,**
**श्रीमती रजनी घोलप, श्री दत्तात्रय पोरे,**
**डॉ. श्रीमती अनुश्री कदम, श्रीमती रेखा कांबळे,**
**श्रीमती वसुधा जुनावणे, श्री. प्रशांत संकपाळ,**
**श्रीमती सीमा निंबाळकर, श्रीमती राजश्री केवाळे,**
**श्रीमती प्राजू चव्हाण, श्रीमती चंदा लोहकरे**

**विशेष आभार**

**श्री. ओमप्रकाश निला,**
कार्यकारी अभियंता (प्रमंगासयो), महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, लातूर
**श्री. सचिन अडसूळ**
माहिती, शिक्षण व संवाद सल्लागार, पाणी व स्वच्छता, जि. प. पुणे

**प्रकाशक**



**© यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे**



**मुद्रक**

**शिवानी प्रिंटर्स,** कसबा पेठ, पुणे – ४११ ०११

**प्रकाशन**

**ऑगस्ट २०१८**


**टिप : सदरील संदर्भ साहित्यात विषयाची मांडणी करताना काही संदर्भ व उदाहरणे दिलेली आहेत. अधिक माहितीसाठी मूळ शासन निर्णय अभ्यासावेत. शासनाच्या www.panchayat.gov.in, www.maharashtra.gov.in व rural.nic.in या वेबसाईटस्ना भेट द्यावी.**

# अनुक्रमणिका

| अ.क्र. | प्रकरण | पान क्र. |
|---|---|---|
| | **I. शाश्वत विकास** | |
| ● | नियोजन प्रक्रिया | |
| ● | सबकी योजना सबका विकास | |
| ● | शाश्वत विकासाच्या दिशेने... | |
| ● | शाश्वत विकासाची ध्येये | |
| | **II. केंद्र शासनाच्या योजना** | |
| १. | आवास योजना (ग्रामीण) Rural Housing Schemes व राज्य शासनाच्या पूरक योजना | |
| | ● प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण (PMAY-G) | |
| | ● पंडित दीन दयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसाहाय्य योजना | |
| | ● आदिम विकास योजनांतर्गत घरकुले | |
| | ● रमाई आवास योजना | |
| | ● शबरी आवास योजना | |
| २. | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (NRDWP) | |
| ३. | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS) | |
| ४. | राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (NRLM) | |
| ५. | दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना (DDU-GKY) | |
| ६. | स्वच्छ भारत अभियान (SBA) | |
| ७. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (PMKSY) | |
| ८. | सांसद आदर्श ग्राम योजना (SAGY) | |
| ९. | सर्व शिक्षा अभियान (SSA) | |
| १०. | राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) | |
| ११. | एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS) | |
| १२. | आमचं गाव आमचा विकास (GPDP) | |
| १३. | राष्ट्रीय बायोगॅस कार्यक्रम (National Biogas Programme) | |
| १४. | प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (PMGSY) | |
| १५. | राष्ट्रीय सामजिक साहाय्य कार्यक्रम (NSAP) | |

- प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना
- प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना
- अटल पेन्शन योजना
- सुकन्या समृद्धी योजना
- इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना
- इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना
- इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना
- राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना
- आम आदमी विमा योजना

१६. दीनदयाळ उपाध्याय पंचायत सशक्तीकरण पुरस्कार (DDUPSP)

## III. राज्य शासनाच्या योजना

**१. ग्रामविकासाशी संबंधित योजना**

- वार्षिक योजना
- जलयुक्त शिवार अभियान
- पर्यावरण स्मार्ट ग्राम योजना
- अस्मिता योजना
- सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना
- संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान
- यशवंत पंचायत राज अभियान
- तीर्थक्षेत्र विकास योजना
- शालेय पोषण आहार

**२. महिला व बाल विकास विभाग**

- बलात्कार/बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसाहाय्य व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठीची मनोधैर्य योजना
- एकात्मिक बाल संरक्षण योजना
- राजीव गांधी सबला योजना
- बेटी बचाओ बेटी पढ़ाओ योजना
- माझी कन्या भाग्यश्री योजना
- बाल संगोपन योजना (मुलामुलींसाठी कौटुंबिक देखभाल)
- बाल सल्ला केंद्र
- निराश्रीत महिलांसाठी आधार गृहे
- अत्याचारग्रस्त पिडीत महिलांसाठी सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय महिला केंद्र
- महिला समुपदेश केंद्र

- शुभ मंगल सामुहिक विवाह योजना
- अनाथालय, महिला स्वीकृती केंद्रे आणि संरक्षित गृहे यामधील निराधार आणि परित्यक्ता विधवांच्या मुलींच्या विवाहाकरिता अनुदान

**३. आदिवासी विकास विभाग**

- केंद्रिय अर्थसंकल्प (न्यूक्लिअस बजेट) योजना
- खावटी कर्ज योजना
- ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम
- नवसंजीवन योजना

**४. कृषी पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय विभाग**

- राष्ट्रीय कृषी विकास योजना
- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान
- शेतकरी जनता अपघात विमा योजना

**५. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग**

- सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना
- अपंगांचे शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसन योजना
- संजय गांधी निराधार अनुदान योजना
- श्रवणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना

**६. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**

- रोजगार मेळावे
- आदिवासी उमेदवारांसाठी सेवायोजन प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्रे
- रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम योजना
- ग्रंथालय सदृश्य अभ्यासिका सुरू करणे

**७. सांस्कृतिक कार्य विभाग**

- महाराष्ट्र वैभव-राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजना
- वृद्ध कलावंत मानधन योजना

**८. पर्यटन विभाग**

- प्रादेशिक पर्यटन विकास योजना

**९. सार्वजनिक आरोग्य विभाग**

- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना
- जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९

- गर्भधारणपूर्व व प्रसवपूर्ण निदान तंत्र अधिनियम २००३
- वैद्यकीय गर्भपात अधिनियम १९७१
- गरोदर माता व इतर मातांच्या संबंधित असणाऱ्या कल्याणकारी योजना

१०. **महसूल व वन विभाग**

- संरक्षित वनाच्या लगतचे क्षेत्रातील गावात सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसूचित जमाती तसेच अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना कुकिंग गॅस, बायोगॅस, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्ष लागवडीचे संरक्षण योजना
- पाणवहाळ व इतर क्षेत्रातील वनेतर सामूहिक जमिनीवर वृक्ष लागवड

११. **सार्वजनिक बांधकाम विभाग**

- ग्रामीण पायाभूत विकास निधी

१२. **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३

## IV. गाव संस्था नियंत्रण आणि सेवांची गुणवत्ता

१. गावसंस्था नियंत्रण आणि सेवांची गुणवत्ता – सरपंचांची भूमिका

- केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५
- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५
- आपले सरकार सेवा केंद्र
- गुणवत्तापूर्ण पायाभूत सुविधांची निर्मिती
- अंगणवाडीबाबत सरपंचांची भूमिका
- प्राथमिक शाळा व सरपंचांची भूमिका
- प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंमद्राबाबत सरपंचांची भूमिका
- गावात २४ तास सुरक्षित विद्युत पुरवठ्यासाठी सरपंचांची भूमिका
- पशुसंवर्धन कार्यक्रमात सरपंचांचे योगदान
- गाव विकास आराखडा व नवनिर्वाचीत सरपंचांची भूमिका
- घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी व्यवस्थापन

## V. विविध शासकीय विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या योजनांची यादी

# १. शाश्वत विकास

# नियोजन प्रक्रिया

राज्याकडे उपलब्ध साधनसंपत्तीचे क्षेत्रनिहाय वाटप करण्यापूर्वी, त्यातून साध्य करावयाच्या भौतिक उद्दिष्टांचा प्रथम विचार करून त्या अनुरूप कार्यवाही करणे ही मूलत: नियोजन प्रक्रिया आहे. नियोजन प्रक्रियेत साधारणत: खालील ४ टप्प्यांबाबत विचार करण्यात येतो.

- उपलब्ध साधनसंपत्ती
- अपेक्षित उद्दिष्टे
- उद्दिष्टपूर्तीसाठी आवश्यक बाबी
- प्रत्यक्ष प्रगती

### नियोजन यंत्रणा:–

### नीती आयोग (National Institution for Transforming India)

सन १९५०, मध्ये केंद्र शासनाने देशात उपब्ध असलेल्या साधनसंपत्तीचा कार्यक्षम वापर करून, जनतेचे राहणीमान उंचावणे, उत्पादन क्षमता वाढविणे व रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे यासाठी योजना आयोगाची स्थापना केली होती. या योजना आयोगाचे पारंपरिक स्वरुप बदलून नवीन व्यवस्था म्हणून केंद्र शासनाने दिनांक १/१/२०१५ च्या अधिसूचनेद्वारे नीती आयोगाचे घटन केले आहे.

नीती आयोगात मा. पंतप्रधान हे अध्यक्ष आणि सर्व राज्यांचे मुख्यमंत्री व केंद्रशासित प्रदेशांचे उप राज्यपाल सदस्य आहेत. एकापेक्षा अधिक राज्यांच्या संबंधित मुद्याबाबत निर्णय घेण्यासाठी विशिष्ट कालावधीसाठी क्षेत्रीय परिषदेची स्थापना करण्यात येणार आहे. यामध्ये संबंधित राज्याचे मुख्यमंत्र्यांचा सदस्य म्हणून समावेश असणार आहे. या परिषदेची अध्यक्षता नीती आयोगाचे अध्यक्ष सांभाळणार आहेत. मा. पंतप्रधान हे विशिष्ट क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना नीती आयोगात विशेष आमंत्रित म्हणून नेमणूक करू शकतील. मा. पंतप्रधान यांच्यामार्फत उपाध्यक्षांची नेमणूक तसेच अन्य पूर्णवेळ सदस्य व विश्वविद्यालय, मान्यवर संस्था या मधून जास्तीत जास्त दोन सदस्य नियतकालासाठी अंशकालिक सदस्य म्हणून नेमणूक करण्यात येते. केंद्रीय मंत्री परिषदेतून जास्तीत जास्त ४ सदस्य मा. पतंप्रधान नेमणूक करतील. केंद्र शासनाचे सचिव स्तरावरील अधिकाऱ्याची नेमणूक मा. पंतप्रधान ठरावीक कालावधीसाठी करतील. याबाबत बहुतांश नेमणुका करण्यात आलेल्या आहेत.

नीती आयोगाची उद्दिदष्टे खालीलप्रमाणे राहतील:–

- राज्यांच्या सक्रिय सहभागाने राष्ट्रीय उद्दिष्ट नजरेस ठेवून देशाच्या विकासाच्या प्राथमिकता, क्षेत्र व धोरण निश्चित करून राष्ट्रीय विषयपत्रिका तयार करणे.
- सशक्त राज्य हे सशक्त राष्ट्र निर्माण करु शकतात. या तत्त्वाचा स्वीकार करून राज्यांसमवेत सहकारी तत्त्वावर संरचनात्मक सहयोग व तंत्राच्या माध्यमाद्वारे देशाचा विकास करणे.

- ग्रामस्तरावर विश्वसनीय अचूक योजना तयार करण्यासाठी तंत्रज्ञान विकसित करणे व ते शासनाच्या वरिष्ठ स्तरापर्यंत पोहोचवणे.
- आयोगाकडे सोपविण्यात आलेल्या विशिष्ट क्षेत्राचा राष्ट्रीय सुरक्षा हीत लक्षात घेऊन आर्थिक उपाययोजना व योजना सुनिश्चित करणे.
- आर्थिक प्रगतीपासून वंचित असलेल्या समाजाच्या विशिष्ट भागासाठी विशेष लक्ष देऊन त्यांना मुख्य प्रवाहात सामील करण्यासाठी आवश्यक उपाययोजना.
- दीर्घकालीन उपाययोजनेसाठी योजनाबद्ध उपाययोजना करून त्याची वेळोवेळी होणारी प्रगती आणि क्षमता याची तपासणी करून त्यानुसार योजनेमध्ये बदल घडवून आणणे.
- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय थिंक टँक तसेच शैक्षणिक आणि नीती संशोधन संस्थेसोबत विचारविनियम करणे व भागीदारीसाठी प्रोत्साहन देणे.
- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विशेषतज्ज्ञ तसेच अन्य भागीदारांच्या समवेत सहकार्याने नावीन्यपूर्ण साह्यकारी प्रणाली तयार करणे.
- विकास आधारित मुद्दे त्वरित कार्यान्वित करताना आंतरक्षेत्रीय आणि आंतरविभागीय मुद्यांच्या समाधानासाठी मंचाची स्थापना करण्याबाबत.
- सुशासन आणि न्यायसंगत विकासासाठी सर्वोत्कृष्ट कार्यप्रणाली संशोधन करण्यासाठी अत्याधुनिक संशोधन केंद्र तयार करून त्यात संबंधित भागधारकांचा समावेश करणेबाबत.
- सफलपूर्वक सेवा देण्यासाठी आवश्यक साधनसंपत्तीचा शोध घेऊन कार्यक्रम आणि उपाय यांचे कार्यन्वय सक्रिय मूल्यांकन आणि संवर्धन करणे.
- राष्ट्रीय विकास कार्यक्रम आणि वरील उद्देश अंमलात आणण्यासाठी विविध उपक्रमांचे कार्यान्वयन करणे.

**महाराष्ट्रातील नियोजन यंत्रणा :–**

राज्य स्तरावर मंत्रीमंडळ नियोजन उपसमिती आणि राज्य नियोजन मंडळ या दोन उच्चस्तरीय संस्था आहेत. मुख्यमंत्री हे दोन्ही संस्थांचे अध्यक्ष असून मंत्री, वित्त व नियोजन हे सदस्य आहेत. राज्याच्या विविध भागांचे प्रतिनिधित्व करणारे आणि महत्त्वाचा कार्यभार सांभाळणारे काही मंत्री नियोजन उपसमितीचे सदस्य असतात. नियोजन मंडळ, ही राज्य शासनाला नियोजनविषयक धोरणांबाबत सल्ला देणारी समिती आहे. राज्य योजनांना विधानमंडळाची मान्यता घेण्यात येते.

राज्य शासनाचा नियोजन विभाग राज्यातील योजना तयार करणे व त्या संबंधीच्या सर्व बाबींचे नियंत्रण करतो. नियोजन विभागाची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

- वार्षिक / पंचवार्षिक योजनेची धोरणे ठरविण्याबाबत शासनास मदत करणे.
- राज्याची पंचवार्षिक/ वार्षिक/यथार्थदर्शी योजना तयार करणे.
- योजना तयार करून त्याची अंमलबजावणी व संनियंत्रण करणे.

- योजनेच्या साधनसंपत्तीचे मूल्यांकन.
- योजनेचे मूल्यमापन.
- वित्तीय संस्थांमार्फत वित्त पुरवठ्याचे समन्वयन (बाह्य साह्यभूत प्रकल्पांसह)

मुख्य सचिव हे मुख्य विकास आयुक्त तर नियोजन विभागाचे सचिव हे विकास आयुक्त असतात. विकास आयुक्त म्हणून राज्याची पंचवार्षिक/ वार्षिक/ यथार्थदर्शी योजना तयार करून सदर योजनांची अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन यावर देखरेख करण्याची जबाबदारी नियोजन सचिवांची असते. त्यांना योजना तयार करण्याच्या व ती राबविण्याच्या संदर्भात योजना आयोग व मंत्रालयातील विविध विभाग यामध्ये समन्वय साधण्याचे कामही करावे लागते. प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समिती कार्यरत असते.

### राज्य नियोजन प्रक्रिया–

आर्थिक धोरणाचे उदारीकरण लक्षात घेऊन तत्कालीन योजना आयोगाने आपली भूमिका निर्देशक नियोजनापुरती मर्यादित केली होती. राज्याला उपलब्ध साधन संपत्तीच्या आधारे योजना तयार करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्यानुसार, विविध प्रशासकीय विभागांकडून वार्षिक योजनांचे प्रस्ताव मागविण्यात येतात. या माहितीच्या आधारे वार्षिक योजना तयार केली जाते. सन २००९–१० पासून नियोजन विभागाने महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर योजना माहिती प्रणाली (MPSIMS) विकसित केली आहे. त्याद्वारे प्रशासकीय विभागांकडून ऑनलाईन माहिती प्राप्त झाल्यानंतर नियोजन विभागामार्फत संस्कारित केली जाते.

महाराष्ट्राच्या नियोजन प्रक्रियेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे नमूद करता येतील.

- योजनेचे विकेंद्रीकरण
- आदिवासी उपयोजना तसेच अनुसूचित जाती उपयोजनांसाठी नियतव्यय उपलब्ध करण्याकरिता विनिर्दिष्ट तरतुदी
- जिल्हास्तरीय योजनांसाठी जिल्हानिहाय स्वतंत्र नियतव्यय देण्यात येत असून त्यात दरवर्षी भरीव वाढ करण्यात येत आहे.
- भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) अनुसार वैधानिक विकास मंडळांची स्थापना.

### जिल्हा योजना–

सन १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर शासनाने जिल्हा हा नियोजनाचा घटक धरून जिल्ह्याची वार्षिक व पंचवार्षिक योजना तयार करून समतोल विकास घडवून आणण्याचे धोरण स्वीकारले. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा नियोजन व विकास मंडळची स्थापना करण्यात आली होती. संविधानाच्या ७४ व्या घटना दुरुस्तीतील कलम २४३–झेड डी नुसार सन–१९९८ पासून राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हा नियोजन व विकास मंडळाऐवजी जिल्हा नियोजन समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील जिल्हा परिषद व नगरपालिका / महानगरपालिका यांनी तयार केलेल्या जिल्हा वार्षिक योजनांचा आराखडा व मागणी विचारात घेऊन संपूर्ण जिल्ह्याकरिता विकास योजनेचा एकत्रित मसुदा तयार करून राज्य शासनास सादर करणे हे या समितीचे काम आहे.

### जिल्हा नियोजन समितीची रचना–

जिल्ह्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात जिल्हा नियोजन समितीतील सदस्यांची संख्या अवलंबून आहे. जिल्हा नियोजन समितीमध्ये २० लाखांपर्यंत लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यासाठी ३० सदस्य, २० ते ३० लाखांपर्यंत लोकसंख्या असलेल्या

जिल्ह्यामध्ये ४० सदस्य व ३० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यांमध्ये ५० सदस्य असतात.

जिल्ह्याचे पालकमंत्री हे जिल्हा नियोजन समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतात. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष हे पदसिद्ध सदस्य असतात. तर जिल्हाधिकारी हे सदस्य सचिव म्हणून काम पहातात.

राज्यपालांनी संबंधित विभागीय संविधानिक विकास मंडळाच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेला एक सदस्य, जिल्ह्यातील आमदार व खासदार यामधून पालकमंत्र्यांनी नामनिर्देशित केलेले दोन सदस्य व जिल्हा व नियोजन समितीच्या ४० व ५० सदस्य असलेल्या समितीवर जिल्हा नियोजनाचे ज्ञान असलेल्या अनुक्रमे २ व ४ व्यक्तींना शासन नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्त करते.

वरील सदस्यांव्यतिरिक्त अन्य आमदार/खासदार, विभागीय आयुक्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय आयुक्तांच्या कार्यालयातील विशेष कार्य अधिकारी, जिल्हा नियोजन अधिकारी, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष / सदस्य यांचेमधून एक सदस्य, पालकमंत्र्यांनी नामनिर्देशित केलेल्या सदस्यांना विशेष निमंत्रित म्हणून जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यांना बोलाविण्यात येते.

जिल्हा नियोजन समितीच्या एकूण सदस्यांपैकी किमान ८०% पेक्षा कमी नसतील इतके सदस्य हे जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी क्षेत्राच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जिल्हा परिषदेच्या व नगरपंचायती, नगरपरिषदा, व महानगरपालिका यांच्या निर्वाचित सदस्यांमधून जिल्हा नियोजन समितीवर सदस्य म्हणून निवडून द्यावयाचे आहेत. दिनांक २४ डिसेंबर, २०१२ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९८ यामध्ये सुधारणा करून जिल्हा नियोजन समितीतील निवडून येणाऱ्या सदस्यांमध्ये स्त्रियांकरिता ५०% आरक्षण ठेवण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हा नियोजन समितीवर रिक्त जागा भरणेसाठी जिल्हा परिषदेच्या व नगर पंचायती, नगर परिषदा व महानगरपालिका यांच्या नवनिर्वाचित सदस्यांमधून निवडणुकीने सदस्यांची नियुक्ती करण्याकरिता सर्व संबंधित जिल्ह्यात फेब्रुवारी-मार्च, २०१३ मध्ये जिल्हा नियोजन समितींच्या निवडणुका घेण्यात आल्या आहेत.

## जिल्हा नियोजनामध्ये जिल्हा नियोजन समितीची भूमिका-

जिल्ह्यातील पंचायत राज संस्था आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी तयार केलेल्या वार्षिक योजना आणि पंचवार्षिक योजना एकत्र करून सर्व जिल्ह्यांसाठी सर्व समावेशक विकास योजनेचा मसुदा तयार करून राज्य शासनास सादर करणे हे जिल्हा नियोजन समितीचे महत्त्वाचे काम आहे. जिल्ह्याचा योजना आराखडा तयार करताना ज्या क्षेत्रांसाठी राज्य किंवा केंद्र शासनाच्या योजनेतून निधी मिळत नाही अशा क्षेत्रावर जिल्हा योजनेतून निधी उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. जिल्ह्याचा आराखडा तयार करताना जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक, जिल्ह्याची सामाजिक व भौगोलिक स्थिती व जिल्ह्याच्या गरजा यांचा प्राधान्याने विचार होणे आवश्यक आहे. जिल्ह्याच्या गरजा निश्चित होण्यासाठी सर्वात खालच्या पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थापासून नियोजनामध्ये सहभाग असणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून आलेल्या सदस्यांनीही संबंधित संस्थांचे प्रतिनिधीत्व करून त्यांच्या भागातील गरजांबाबत समितीमध्ये चर्चा करून त्याची सोडवणूक करण्यासाठी उपाययोजना सुचविणे आवश्यक आहेत. असे झाले तरच खऱ्या अर्थाने सहभागातून नियोजन (Participative planning) होण्यास मदत होणार आहे व योग्य व आवश्यक क्षेत्रासाठी निधी उपलब्ध होऊन जनतेस लाभ होणार आहे.

## सुधारित कार्यपद्धती-

सन २००८-०९ पासून जिल्हा वार्षिक योजनेच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा केली असून जिल्हा नियोजन समितीने तयार केलेल्या आराखड्यास राज्य शासनाची मान्यता मिळाल्यानंतर तो आराखडा नियोजन विभागांतर्गत अर्थसंकल्पीत करण्यात येतो.

अर्थसंकल्पीत झालेला निधी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत कार्यान्वयीन यंत्रणांना वितरीत केला जातो. जिल्हा वार्षिक योजनेतील स्थानिक स्वराज्य संस्थांकडील योजना वगळता अन्य योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. यासाठीचे प्रस्ताव शासन स्तरावर पाठविण्याची आवश्यता नसल्याने निधी त्वरित खर्च होण्यास मदत होत आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१०-११ पासून जिल्ह्यांना त्यांच्या एकूण नियतव्ययापैकी ०.५ % इतका नियतव्यय मूल्यमापन, संनियंत्रण, डाटाएंट्रीसाठी खर्च करता येईल. तसेच जिल्ह्यातील नावीन्यपूर्ण योजना या नावाची नवीन योजना सुरू करण्यात आली असून त्याअंतर्गत जिल्ह्यांना एकूण नियतव्ययापैकी ३.५ % इतक्या मर्यादेत स्थानिक गरजेनुसार अनेक योजना / कामे घेता येतील.

## अनुसूचित जाती योजना–

अनुसूचित जाती या प्रामुख्याने समाजातील दुर्बल घटकात येतात. यासाठी केंद्र शासनाने अनुसूचित जाती या वर्गाचा जलद विकास होण्यासाठी अनुसूचित जाती उपयोजना कार्यान्वित केली आहे. या घटकांकडे स्वत: ची मालमत्ता अत्यल्प असून हे लोक साधारणत: शेतमजुरी व इतर कमी उत्पन्नाच्या व्यवसायावर अवलंबून असतात. बहुतेक लोक पारंपरिक व्यवसाय करतात आणि निरनिराळ्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमामुळे निर्माण होणाऱ्या नव्या रोजगार संधीचा स्वत:साठी उपयोग करून घेण्यास असमर्थ असतात. त्यामुळे अनुसूचित जाती / नवबौद्ध यांचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास व त्यांच्या किमान गरजांची पूर्तता करण्यासाठी समन्वित दृष्टिकोन ठेवून विविधांगी कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता जाणवली.

## राज्य शासनाचा दृष्टिकोन–

केंद्र शासनाने निर्देशित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा अभ्यास करून राज्य शासनामार्फत पुढील बाबींचा अवलंब केला जातो :-

(अ) अनुसूचित जाती उपयोजनेत फक्त अनुसूचित जाती व नवबौद्ध व्यक्तींना / कुटुंबांना किंवा त्यांच्या वस्त्यांना थेट व जास्तीत जास्त लाभ देणाऱ्या योजना घेण्यात याव्यात.

(ब) अविभाज्य क्षेत्राखालील कार्यक्रमांची संबंधित असलेल्या विभागाने अनुसूचित जातीकरिता निश्चित निधी उपलब्ध करून देण्याच्या योजनांची अंमलबजावणी करण्याची शक्यता पडताळून पहावी.

(क) केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या विशेष केंद्रीय अर्थसाहाय्याचा उपयोग अनुसूचित जातीतील दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या साहाय्यात वाढ करण्याकरिता केला जावा. विशेष केंद्रीय साहाय्यांतर्गत कोणत्याही कार्यक्रमासाठी दिले जाणारे कमाल अनुदान त्या कार्यक्रमाच्या / प्रकल्पाच्या एकूण किमतीच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त असणार नाही व ही ५० टक्के रक्कम रु. १०,०००/- पेक्षा अधिक असणार नाही.

## लोकसंख्या–

सन २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातीची लोकसंख्या १,३२,७५,८९८ आहे. त्यापैकी ६७,६७,७५९ पुरुष आणि ६५,०८,१३९ स्त्रिया आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येशी टक्केवारी ११.८१ टक्के आहे. सन १९९५-९६ पासून अनुसूचित जाती उपयोजना तयार करण्याची जबाबदारी सामाजिक न्याय विभागावर सोपविण्यात आली आहे. नियोजन विभागाकडून सामाजिक न्याय विभागाला अनुसूचित जाती उपयोजना तयार करण्यासाठी नियतव्यय कळविण्यात येतो.

## विशेष केंद्रीय साहाय्य–

अनुसूचित जाती उपयोजनेला पूरक म्हणून दरवर्षी केंद्र शासनाकडून विशेष केंद्रीय साहाय्याच्या रूपाने, पूरक नियतव्यय उपलब्ध करून दिला जातो.

## आदिवासी उपयोजना :–

महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रफळ ३,०७, ७१३ चौ. कि. मी असून त्यापैकी ५०,७५८ चौ. कि. मी. म्हणजे १६.५ टक्के क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली आहे. राज्यात एकूण ४७ अनुसूचित जमाती आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार राज्यात आदिवासी एकूण लोकसंख्या १०५.१० लक्ष आहे व ती राज्याच्या १,१२३.७४ लक्ष या एकूण लोकसंख्येच्या ९.४ टक्के आहे. राज्यात भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकूर आणि वारली या मुख्य आदिवासी जमाती आहेत. कोलम, कातकरी आणि माडिया गोंड या तीन जमाती आदिम जमाती म्हणून अधिसूचित करण्यात आल्या आहेत. राज्यातील १०५.१० लक्ष आदिवासींपैकी ५१ टक्के आदिवासी उपयोजना क्षेत्रात राहतात व ४९ टक्के आदिवासी उपयोजनेच्या बाहेरील क्षेत्रात राहतात.

आदिवासी लोकसंख्या राज्याच्या १५ जिल्ह्यांमध्ये एकत्रित झालेली आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, माडा व मिनीमाडा क्षेत्रात पायाभूत सोय सुविधा करून देणे, तसेच आदिवासी क्षेत्रातील व आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी यांच्यासाठी वैयक्तिक लाभाच्या योजना राबविणे इत्यादींचा आदिवासी उपयोजनेत समावेश आहे.

**उद्दिष्टे–** राज्यातील आदिवासी व बिगर आदिवासी लोकसंख्या यांच्यातील आर्थिक व मनुष्य बलाचा विकास यांच्यातील असलेली दरी दूर करण्यासाठी उपयोजना तयार करण्यात आली.

(१) राज्यातील आदिवासी क्षेत्रे व इतर क्षेत्रे यांच्या विकासातील अंतर भरून काढणे.

(२) आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा सुधारणे,

(३) त्यांना भेडसावणाऱ्या व महत्त्वाच्या समस्यांची सोडवणूक करणे आणि त्यांची पिळवणूक थांबविणे,

(४) त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासाची गती वाढविणे.

सुखथनकर समितीच्या शिफारशीप्रमाणे आदिवासी उपयोजना तयार करण्याचे काम आदिवासी विकास विभागाला सन १९९३–९४ पासून सोपविण्यांत आले आहे. राज्य योजनेतील ठरावीक रक्कम नियोजन विभागातर्फे आदिवासी उपयोजना तयार करण्यासाठी आदिवासी विकास विभागाला देण्यात येते. आदिवासींना प्रत्यक्ष लाभदायी असलेल्या भिन्न योजनांवरील नियतव्यय आता आदिवासी विकास विभागामार्फत अंतिमत: निश्चित करण्यात येतो. आदिवासी लोकांना एकत्र तसेच व्यक्तिगत फायदेशीर ठरतील अशा योजना आदिवासी उपयोजनेत घेण्यात येतात. ग्रामीण विकास, आदिवासी उपयोजना जिल्ह्यातील डोंगरी भागाचा विकास, लघु पाटबंधारे, रस्ते विकास, शिक्षण, आरोग्य आणि पाणीपुरवठा इत्यादीसाठी पुरेशा प्रमाणात नियतव्यय ठेवण्यात येतो.

# सबकी योजना सबका विकास

- केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास व पंचायती राज मंत्रालयाने सबकी योजना सबका विकास ही मोहीम आखली आहे.
- ग्रामपंचायत विकास आराखडा बनविण्यासाठी लोकांचा आराखडा (People's plan for Grampanchayat Development plan) असे या मोहिमेचे स्वरूप आहे.
- कालावधी – दिनांक २ ऑक्टोबर,२०१८ ते ३१ डिसेंबर, २०१८.
- या कालावधीत संपूर्ण देशभर विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात येणार आहे. या ग्रामसभा आखीव (Structured) असतील.
- शासनाच्या विविध विभागांमार्फत ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये राबविण्यात येत असलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजनांचे अभिसरण करून सन २०१८-१९ चा ग्रामपंचायत विकास आराखडा याद्वारे तयार करण्यात येणार आहे.
- ७३ व्या घटनादुरुस्ती अनव्ये, अनुसूची ११ मध्ये नमूद केलेल्या २९ विषयांची जबाबदारी पंचायत राज संस्थांकडे सोपविण्यात आलेली असल्यामुळे या सर्व २९ विषयांशी संबंधित राज्य शासनाच्या विभागांनी ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होणे अपेक्षित आहे.
- प्रत्येक ग्रामपंचायतीच्या विशेष ग्रामसभेसाठी २९ विषयांशी संबंधित विभागांच्या ग्राम तालुकास्तरीय वा अन्य अधिकारी कर्मचारी यांनी उपस्थित रहावयाचे आहे.
- या प्रतिनिधींनी ग्रामसभेमध्ये त्यांच्या विभागामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती, सन २०१८-१९ मध्ये त्या गावात हाती घेतलेले उपक्रम कार्यक्रम, त्यांची भौतिक व आर्थिक सद्य:स्थिती आणि सन २०१९-२० या वर्षासाठी प्रस्तावित केलेले उपक्रम कार्यक्रम, त्यासाठी केलेली तरतूद इ. माहिती लेखी स्वरूपामध्ये ग्रामसभेस आणि ग्रामपंचायतीस द्यावयाची आहे.
- विशेष ग्रामसभांपूर्वी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) द्वारे प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी नियुक्त केलेल्या फॅसिलिटेटर (Ficilitator) मार्फत मिशन अंत्योदयचे पायाभूत सर्वेक्षण (MA Mobile App) पूर्ण केले जाणार आहे. सर्वेक्षणाद्वारे गोळा केलेली सर्व माहिती आज्ञावलीवर भरली जाणार आहे. दारिद्रय घटविण्यासाठी आराखडा तयार करून ग्रामसभेत मांडला जाणार आहे. ग्रामसभेमध्ये अनुसूचित जाती, जमाती, महिला, अपंग इ. वंचित घटकांना विशेषत्वाने सहभागी करून घेतले जाईल.
- या विशेष ग्रामसभांमध्ये, गावाच्या सर्व विकासात्मक गरजा आणि तफावत (उणिवा) यावर चर्चा केली जाईल.

# शाश्वत विकासाच्या दिशेने...

विकास प्रक्रियेचा केंद्रबिंदू 'जनता' आहे. फक्त आर्थिकदृष्ट्या प्रगती साधण्यापेक्षा विकासाच्या विविध संधी उपलब्ध करून त्याद्वारे लोकांना सक्षम करून त्यांचा शाश्वत विकास साधण्याची गरज आहे. दरडोई उत्पन्न हा विकासाचा एक निदर्शक आहे, परंतु तेथून सुरूवात करून शाश्वत व सर्वांगीण विकासाची अधिक व्यापक व सर्वसमावेशक भूमिका 'मानव विकास' संकल्पनेत आहे.

## मानव विकास म्हणजे काय ?

शिक्षण, आरोग्य आणि उपजिविकेची साधने या मानवी जीवनाच्या तीन महत्त्वाच्या पैलूंसाठी केलेले प्रयत्न आणि प्रत्यक्षात त्यांची उपलब्धता यांचा संगम म्हणजे मानव विकास. लोकांना मिळणाऱ्या संधीचा परिघ मोठा करण्याची प्रक्रिया अशी मानवी विकासाची व्याख्या करण्यात आली आहे. मानव विकास निर्देशांक हा आरोग्यपूर्ण व दीर्घायुष्य, ज्ञानार्जनाची संधी व दर्जेदार राहणीमान या दीर्घकालीन प्रगतीचे मोजमाप करून मूल्यांकन करण्याचा संयुक्त निर्देशांक आहे.

भारत मानव विकास अहवाल २०११ नुसार केरळ (०.७९०) प्रथम स्थानावर असून महाराष्ट्र (०.५७२) सहाव्या स्थानावर आहे.

**महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०१२ नुसार जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांक खालील प्रमाणे आहे.**

जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांक २०११

| जिल्हा | एकूण साक्षरता दर (२०११) | एकूण पटसंख्या प्रमाण (२०११-१२) | अर्भक मृत्यू दर (२००७-०८) | दरडोई जिल्हा स्थूल उत्पन्न स्थिर किमतीनुसार (१९९९-२०००) रू. | मानव विकास निर्देशांक (माविनि) २०११ | माविनि स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| नंदूरबार | ६३.० | ६७.७ | ७५ | १९,१५६ | ०.६०४ | अल्प |
| गडचिरोली | ७०.६ | ८०.७ | ६३ | १४,९१३ | ०.६०८ | |
| वाशिम | ८१.७ | ८८.० | ४६ | १४,८८५ | ०.६४६ | |
| हिंगोली | ७६.० | ७८.७ | ५० | १८,२८६ | ०.६४८ | |
| उस्मानाबाद | ७६.३ | ८१.९ | ५० | १७,८४७ | ०.६४९ | |
| नांदेड | ७६.९ | ८०.३ | ३० | १८,१५५ | ०.६५७ | |
| जालना | ७३.६ | ८३.७ | ४८ | २०,५६५ | ०.६६३ | |
| लातूर | ७९.० | ९१.१ | ५३ | १७,६७४ | ०.६६३ | |
| धुळे | ७४.६ | ८३.७ | ४४ | २१,४४२ | ०.६७१ | |
| बीड | ७३.५ | ९०.४ | ३३ | २१,०१३ | ०.६७८ | मध्यम |
| परभणी | ७५.२ | ८६.३ | ५१ | २३,१४६ | ०.६८३ | |
| बुलढाणा | ८२.१ | ८७.६ | ३४ | १९,४८७ | ०.६८४ | |
| यवतमाळ | ८०.७ | ८४.९ | ४७ | २१,११८ | ०.७०० | |

| जिल्हा | एकूण साक्षरता दर (२०११) | एकूण पटसंख्या प्रमाण (२०११-१२) | अर्भक मृत्यू दर (२००७-०८) | दरडोई जिल्हा स्थूल उत्पन्न स्थिर किमतीनुसार (१९९९-२०००) रू. | मानव विकास निर्देशांक (माविनि) २०१९ | माविनि स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| गोंदिया | ८५.४ | ८७.२ | ६७ | २३,०९१ | ०.७०१ | |
| अमरावती | ८८.२ | ८६.० | ५९ | २१,८०४ | ०.७०१ | |
| भंडारा | ८५.१ | ८९.३ | ६० | २५,७३५ | ०.७१८ | |
| चंद्रपूर | ८१४ | ८८.९ | ७४ | २८,७३० | ०.७१८ | |
| अहमदनगर | ८०.२ | ८७.९ | ४१ | २७.३९२ | ०.७२० | उच्च |
| अकोला | ८७.६ | ८५.६ | २८ | २४,०५५ | ०.७२२ | |
| वर्धा | ८७.२ | ८७.९ | ६२ | २६,१३० | ०.७२३ | |
| जळगाव | ७९.७ | ८८.२ | ४८ | २८,९३९ | ०.७२३ | |
| औरंगाबाद | ८०.४ | ८२.२ | ४४ | ३०,६९० | ०.७२७ | |
| सोलापूर | ७७.७ | ८९.५ | २३ | २८,८२८ | ०.७२८ | |
| रत्नागिरी | ८२.४ | ८९.० | २५ | २७,८६५ | ०.७३२ | |
| सातारा | ८४.२ | ८५.७ | २७ | २९,९१६ | ०.७४२ | |
| सांगली | ८२.६ | ८७.९ | ३३ | ३३,७१३ | ०.७४२ | अति उच्च |
| नाशिक | ८१.० | ८२.२ | ४६ | ३५,५४५ | ०.७४६ | |
| सिंधुदुर्ग | ८६.५ | ८७.५ | ३५ | ३१,५६३ | ०.७५३ | |
| रायगड | ८३.९ | ८८.९ | ३५ | ३४,३७७ | ०.७५९ | |
| कोल्हापूर | ८२.९ | ८८.४ | १३ | ३६,१७८ | ०.७७० | |
| नागपूर | ८९.५ | ९२.६ | ४० | ३७,९९५ | ०.७८६ | |
| ठाणे (पालघरसह) | ८६.२ | ७८.५ | ३४ | ५०,४०८ | ०.८०० | |
| पुणे | ८७.२ | ८८.२ | २८ | ५०,१५८ | ०.८१४ | |
| मुंबई (शहर व उपनगर) | ९०.३ | ८५.५ | १८ | ५८,८१८ | ०.८४१ | |
| **महाराष्ट्र राज्य** | **८२.९** | **८५.४** | **४४** | **३५,०३३** | **०.७५२** | |

सहस्त्रक विकास उद्दिष्टांच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर संयुक्त राष्ट्रसंघाने विकासाची नवीन उद्दिष्टे शाश्वत विकास स्वरूपात जगासमोर मांडली आहेत.

**शाश्वत विकासाची १७ ध्येये आणि १६९ उद्दिष्ट्ये २०३० पर्यंत साध्य करावयाची असून प्रत्यक्ष कृती गावपातळीपासून करणे आवश्यक आहे.**

# शाश्वत विकासाची ध्येये



शाश्वत विकासाची ध्येये, ग्रामपंचायत विकास आराखड्याचा एक भाग असले पाहीजेत. शाश्वत विकासाची ध्येये (SDG) खालील प्रमाणे असून ती सन २०३० पर्यंत साध्य करावयाची आहेत.




सर्व प्रकारच्या गरिबीचे निर्मूलन करणे.




भूक संपवणे, अन्न सुरक्षा व सुधारित पोषण आहार उपलब्ध करून देणे आणि शाश्वत शेतीला प्राधान्य देणे.




आरोग्यपूर्ण आयुष्य सुनिश्चित करणे व सर्व वयोगटातील नागरिकांचे कल्याण साधणे.




सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करणे.





लिंगभावाधिष्ठित समानता व महिला आणि मुलींचे सक्षमीकरण साधणे.




पाण्याची व स्वच्छतेच्या संसाधनाची उपलब्धता सुनिश्चित करणे.




सर्वांना अल्पखर्चीक विश्वासार्ह, शाश्वत आणि आधुनिक ऊर्जा साधने उपलब्ध करून देणे.




शाश्वत, सर्वसमावेशक आर्थिक वाढ आणि उत्पादक रोजगार उपलब्ध करणे.




पायाभूत सोयीसुविधांची निर्मिती करणे, सर्वसमावेशक आणि शाश्वत औद्योगिकीकरण करणे आणि कल्पकतेला वाव देणे.




देशांमधील विविध असमानता दूर करणे.




शहरे आणि मानवी वस्त्या अधिक समावेशक, सुरक्षित, संवेदनशील आणि शाश्वत करणे.




उत्पादन आणि उपभोगाच्या पद्धती शाश्वत रूपात आणणे.




हवामान बदल आणि त्याच्या दुष्परिणामांना रोखण्यासाठी उपाययोजना करणे.




महासागर व समूहांचे संवर्धन करणे तसेच त्यांच्याशी संबंधित संसाधनांचा शाश्वतपणे वापर करणे.




परिस्थितिकीय व्यवस्थांचा शाश्वत पद्धतीने वापर करणे. वनाचे शाश्वत व्यवस्थापन, वाळवंटीकरणाशी मुकाबला करणे, जमिनीचा कस कमी होण्याची प्रक्रिया आणि जैवविविधतेची हानी रोखणे.




शांततापूर्ण आणि सर्वसमावेशक समाजव्यवस्थांना प्रोत्साहन देणे. त्यांची शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल निश्चित करणे, सर्वांची न्यायापर्यंत पोहोच स्थापित करण्यासाठी विविध पातळ्यांवर परिणामकारक, उत्तरदायी आणि सर्वसमावेशक संस्था उभ्या करणे.




चिरस्थायी विकासासाठी वैश्विक भागीदारी निर्माण व्हावी यासाठी अंमलबजावणीची साधने विकसित करणे.

# २. केंद्र शासनाच्या योजना

# आवास योजना (ग्रामीण)

## प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण (PMAY-G)



सन २०१६–१७ पासून प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण राबविण्यात येत आहे. २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे अंतर्गत ग्रामीण भागातील बेघरांना घरे उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

### लाभार्थी निवड प्रक्रिया:

सदरील योजनेअंतर्गत लाभार्थी निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.

१. सामाजिक आर्थिक जात सर्वेक्षण सन २०११ मधून उपलब्ध झालेल्या प्राधान्यक्रम यादी (Generated Priority List) ची माहिती आवास सॉफ्ट (Awaas Soft) वर उपलब्ध आहे. सदर याद्या ग्रामसभेपुढे ठेवून त्यातून पात्र लाभार्थींची निवड करणेत येते.

२. प्राधान्य क्रम यादी बेघर, १ खोली लाभार्थी, २ खोली लाभार्थी याप्रमाणे निश्चित केलेली आहे.

प्राधान्यक्रम यादीमधील व्यक्तींची ग्रामसभेद्वारे निवड करतेवेळी खालील निकषावरील गुणांकनानुसार प्राधान्यक्रम देणेत यावेत.

- १६ ते ५९ वयोगटातील प्रौढ व्यक्ती नसलेले कुटुंब
- महिला कुटुंबप्रमुख व १६ ते ५९ वयोगटातील प्रौढ व्यक्ती नसलेले कुटुंब
- २५ वर्षावरील अशिक्षित / निरक्षर व्यक्ती असलेले कुटुंब
- अपंग व्यक्ती कुटुंब ज्यात शारीरिकदृष्ट्या सक्षम प्रौढ व्यक्ती नाही
- भूमिहीन कुटुंब ज्यांची उत्पन्न स्रोत मोलमजुरी आहे

सदरील गुणांकनाचे आधारे ग्रामसभा यादी तयार करतील व अशाप्रकारे गुणांच्या उतरत्या मांडणीने प्राधान्यक्रम यादी तयार करणेत येईल.

३. जर निकषांआधारित गुणसंख्या समसमान असेल तर ग्रामसभा खालील मुद्यांच्या आधारे प्राधान्य देतील.

- एकच मुलगी अपत्य असणारे कुटुंब

- कुटुंबामध्ये विधवा, कुटुंबांतील व्यक्ती संरक्षण / निमलष्करी / पोलीस खात्यात होते आणि कारवाई मध्ये मृत्यू पावले असल्यास
- ज्या कुटुंबातील व्यक्ती कर्करोग व कुष्ठरोगी आहेत.
- ज्या कुटुंबामध्ये HIV संसर्गासह जीवन कंठणारे व्यक्ती (PLHIV) आहेत.

४. ग्रामसभा एखाद्या कुटुंबास घराची तातडीची गरज लक्षात घेऊन त्याप्रमाणे योग्य कारणमीमांसा नोंदून प्राधान्य क्रमात बदल करू शकते.

५. ज्या कुटुंबांना राज्य किंवा केंद्र सरकारचे गृह निर्माण अर्थसाहाय्य प्राप्त झाले असेल, ते कुटुंब आपोआपच या योजनेसाठी अपात्र होईल. या कारणाव्यतिरिक्त इतर कारणांसाठी कुटुंबांची नावे यादीतून काढण्यासाठी सत्यपडताळणी करून ग्रामसभेची मान्यता लागेल.

६. ग्रामसभेद्वारे मान्यता प्राप्त वार्षिक निर्धारित सूची / यादी, समाजात / लोक प्रतीनिधीकडे / पंचायत समिती आणि जिल्हा परिषद सदस्यांकडे त्यांच्या मतासाठी / हरकतीसाठी पाठविले जातील. गावाच्या भिंतीवर अशी सूची रंगवून प्रसिद्ध करण्यात येतील. अशा प्रसिद्धी नंतर यावर हरकत घेण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी राहील.

७. जिल्हास्तरीय सर्व पात्र सूचींचे एकत्रिकरण केले जाईल. योजनेमध्ये ह्या सर्व प्राथमिकता सूचींचे प्रसिद्धीकरण करणेत येईल.

### पारदर्शकपणा:

१. सदरील योजनेअंतर्गत लाभार्थीस PFMS (Public Financial Management System) प्रणालीद्वारे सरळरित्या राज्याच्या खात्यातून (State Nodel Account ) लाभार्थ्यांच्या खात्यावर निधी वितरण करणेत येते.

२. लाभार्थ्यांचे रजिस्ट्रेशन (Registration) करताना खालील २ फोटो आवास सॉफ्ट (Awaas Soft) वर अपलोड करणे बंधनकारक आहे.

- लाभार्थ्यांचा सध्या राहत असलेला फोटो.
- लाभार्थी ज्या ठिकाणी घर बांधणार आहे त्या जागेचा फोटो

यामुळे लाभार्थ्याचे जागा निश्चिती होणे तसेच दुबार लाभार्थी टाळणे या प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यात येत आहे.

### प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीणची ठळक वैशिष्ट्ये:

१. सदर योजनेअंतर्गत IAP जिल्ह्यामधील (भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली) लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी रु. १.३० लाख आणि NON-IAP राज्यातील उर्वरित जिल्ह्यामध्ये प्रति लाभार्थी रु. १.२० लाख इतके आर्थिक साहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

२. सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MG-NREGA) आणि स्वच्छ भारत मिशन (SBM) इ. योजनांचे अभिसरण करण्यात येत आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत रु. १२०००/– इतके आर्थिक साहाय्य आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MG-NREGA) ९०/९५ अकुशल मनुष्यदिवस निर्मिती करणेत येते.

३. सदर योजनेअंतर्गत लाभार्थ्याला २५ चौ.मी. क्षेत्रफळाचे घरकुल बांधणे गरजेचे आहे. यात आरोग्यदायी स्वयंपाक गृह असणे गरजेचे आहे.

४. लाभार्थ्यांची इच्छा असल्यास त्याला या योजनेअंतर्गत बँकेकडून रु. ७०,०००/- इतके कर्ज प्राप्त होऊ शकते.

५. प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत प्राप्त होणाऱ्या उद्दिष्टाच्या ६०% उद्दिष्ट हे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या संवर्गास आणि १५% उद्दिष्ट अल्पसंख्याक प्रवर्गास देणे बंधनकारक आहे. तसेच ३% उद्दिष्ट दिव्यांग व्यक्तींसाठी देणे बंधनकारक आहे.

६. ग्रामीण भागातील घरकुल बांधकामाचा दर्जा सुधारण्यासाठी गवंडी प्रशिक्षण राबविण्यात येते.

७. लाभार्थ्यांना ते राहत असलेल्या ठिकाणी उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करून तसेच त्यांनी निवडलेल्या गृहबांधणी आराखड्याचा वापर करून घर बांधता येते.

सदर योजना आवास सॉफ्ट (AwaasSoft) द्वारे लाभार्थ्यांचे रजिस्ट्रेशन (Registration) करून आणि पी.एफ.एम.एस. (PFMS) प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये सरळरित्या निधी वितरीत करून राबविण्यात येत आहे. लाभार्थ्यांने बांधलेल्या घराचे फोटो, निधी वितरणाचे ट्रॅकिंग (Tracking) करणे या सर्व बाबी आवास सॉफ्ट (AwaasSoft) वर उपलब्ध आहेत. त्यामुळे सदर योजनेंतर्गत अंमलबजावणीमध्ये पारदर्शकपणा आलेला आहे.

## पंडित दीन दयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थ साहाय्य योजना

(संदर्भ : शासन निर्णय ग्राम विकास विभाग आयो/२०१५/पत्र २००/योजना-१० दि. ३०/१२/२०१५)

१. घरकुलास पात्र लाभार्थी जागेअभावी घरकुल लाभ मिळणेपासून वंचित राहू नये, याकरिता सन २०१५-१६पासून सदरील लाभार्थींना जागा खरेदी करण्यासाठी या योजनेचा लाभ दिला जात आहे.

२. जागा खरेदी करण्यासाठी केंद्र शासनामार्फत १००००/- रुपये व या योजनेअंतर्गत रक्कम रुपये ४००००/- असे एकूण ५००००/- रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

३. घरकुल बांधकामासाठी ५०० चौ. फुटापर्यंत जागा प्रती लाभार्थी खरेदी करता येईल.

४. ही योजना दारिद्र्यरेषेवरील (APL) लाभधारकांसाठी लागू नाही.

५. जागा खरेदीबाबत तालुका स्तरावर समिती घटित करण्यात आली आहे.

## आदिम विकास योजनांतर्गत घरकुले

राज्यातील कातकरी, माडिया गोंड, कोलाम या जमाती आदिम जमाती (Particularly Vulnerable Tribes) म्हणून केंद्र शासनाने अधिसूचित केल्या आहेत. या जमाती अतिशय दुर्गम व डोंगराळ भागात वस्ती करून रहातात. त्यामुळे या जमातींचा

निवासाचा प्रश्न सोडविणेस प्राधान्य देऊन आदिवासी विकास विभागामार्फत 'आदिम जमातीचा विकास' योजनेंतर्गत घरकुल योजना राबविणेत येते.

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.आदिम-२०१५/प्र.क्र.८९/का-१९, दि.३१ मार्च २०१६ अन्वये सदर योजनेची अंमलबजावणी राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण मार्फत करणेत येत आहे.

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.आदिम-२०१७/प्र.क्र.१३/का-१९, दि.७ फेब्रुवारी, २०१७ अन्वये आदिम जमाती विकास कार्यक्रमाखाली मंजूर केलेली घरकुले शबरी आदिवासी घरकुल योजनेच्या निश्चित केलेल्या निकषानुसार बांधण्यात यावीत.

## रमाई आवास योजना

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.बीसीएच-२००८/प्र.क्र.३६/मावक-२, दि. १५ नोव्हेंबर २००८ अन्वये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी घरकुल योजना जाहीर करणेत आली असून सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.बीसीएच-२००९/प्र.क्र.३६/मावक-२, दि. ९ मार्च २०१० अन्वये सदर घरकुल योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू करणेत आली आहे. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.बीसीएच-२००११ /प्र.क्र.१२६/ मावक-२, दि. १९ नोव्हेंबर २०११ अन्वये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी घरकुल योजना याला रमाई आवास योजना असे नाव देणेत आले आहे. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक रआयो-२०१६//प्र.क्र.५७८/बांधकामे, दि. ३० सप्टेंबर २०१६ अन्वये लाभार्थी निवड निकष निश्चित करणेत आले आहेत.

### लाभार्थी पात्रता :

१. लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध संवर्गाचा असावा.

२. लाभार्थ्याचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षे असावे.

३. ग्रामीण क्षेत्रातील लाभार्थी कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. १.०० लाख इतकी राहील.

४. सदर योजनेचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीस देणेत येईल.

५. शासनाच्या इतर गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

६. कमी जमीन उपलब्ध असलेल्या ठिकाणी २ पेक्षा जास्त लाभार्थी एकत्रित बांधकाम करू शकतील.

७. लाभार्थी हा बेघर असावा किंवा त्याच्याकडे पक्के घर नसावे.

८. लाभार्थी सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC-२०११) प्राधान्यक्रम यादीच्या (Generated Priority List) बाहेरील असावा.

### आवश्यक कागदपत्रे :

१. ७/१२ चा उतारा, मालमत्ता नोंदपत्र (प्रॉपर्टी रजिस्टर्ड कार्ड), ग्रामपंचायतीतील मालमत्ता नोंदवहीतील उतारा यापैकी एक.

२. घरपट्टी, पाणीपट्टी, विद्युत बिल या कागदपत्रांपैकी एक.

३. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत

४. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला

**घराचे क्षेत्रफळ :**

घराच्या बांधकामाचे चटई क्षेत्र २६९ चौ. फूट राहील. लाभार्थी स्वत:च्या मालकीची जागा असेल तर, त्यावर त्याच्या मर्जीनुसार स्वखर्चाने जास्त क्षेत्राचे बांधकाम करू शकेल.

**प्राधान्य क्षेत्र :**

१. जातीय दंगलीमध्ये घराचे नुकसान (आगीमुळे व इतर तोडफोड) झालेली व्यक्ती

२. ॲट्रोसिटी कायद्यानुसार पीडित झालेल्या अनुसूचित जातीच्या पात्र व्यक्ती.

३. पूरग्रस्त क्षेत्र

४. घरात कोणीही कमावत नाही अशा विधवा महिला

५. शासकीय अभिकरणामधून निवड झालेल्या व्यक्तींना परिच्छेद अनुक्रमांक २ नुसार अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल.

६. उर्वरित सर्व क्षेत्र

**लाभार्थी निवड :**

१. या योजनेंतर्गत ग्रामीण भागामध्ये अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेमार्फत करण्यात यावी.

२. ग्रामसभेने निवड केलेल्या अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांची अंतिमत:निवड करण्याकरिता सुरुवातीला संदर्भ दिलेल्या दि.०९ मार्च २०१० च्या शासन निर्णयामधील १४ (अ) नुसार ग्रामीण क्षेत्राकरिता स्थापन केलेली घरकुल निर्माण समिती खालीलप्रमाणे पुनर्घटित करण्यात आली आहे –

| | | |
|---|---|---|
| १) मुख्य कार्यकारी अधिकारी | – | अध्यक्ष |
| २) जिल्हा समाजकल्याण अधिकारी | – | सदस्य |
| ३) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | – | सदस्य |
| ४) कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सार्वजनिक बांधकाम विभाग) | – | सदस्य |
| ५) सहायक आयुक्त (सामाजिक न्याय विभाग) | – | सदस्य सचिव |

३. ग्राम विकास विभागाच्या दि. १०.०२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (ग्रामविकास विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती स्थापन करण्यात आलेली असल्यामुळे दि. ०९.०३.२०१० च्या परिच्छेद १६ अन्वये सचिव (सामाजिक न्याय) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेली घरकुल योजना समन्वय समिती ग्रामीण क्षेत्राकरिता रद्द करण्यात आली आहे.

### लाभार्थ्यास द्यावयाचे अनुदान :

१. रमाई आवास योजनेंतर्गत (ग्रामीण) प्रति घरकुल (शौचालय बांधकामासह) अनुदान साधारण क्षेत्र रु. १,३२,०००/- व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी (शौचालय बांधकामासह) रु. १,४२,०००/- निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

२. शौचालय बांधण्यासाठी लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या रु. १२,०००/- ची प्रतिपूर्ती, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून करण्यात येईल.

३. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मधील लाभार्थ्यांप्रमाणे रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांना अभिसरणाद्वारे साधारण क्षेत्रासाठी रु. १७,२८०/- व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी रु. १८,२४०/- अनुदान उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदर योजना आवास सॉफ्ट (AwaasSoft) द्वारे लाभार्थ्यांचे रजिस्ट्रेशन (Registration) करून आणि पी.एफ.एम.एस. (PFMS) प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये सरळरित्या निधी वितरीत करून राबविण्यात येत आहेत. लाभार्थ्यांने बांधलेल्या घराचे फोटो, निधी वितरणाची ट्रॅकिंग (Tracking) करणे या सर्व बाबी आवास सॉफ्ट (AwaasSoft) वर उपलब्ध आहेत. त्यामुळे सदर योजनेंतर्गत अंमलबजावणीमध्ये पारदर्शकपणा आलेला आहे.

## शबरी आवास योजना

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.घरकुल २०१२/प्र.क्र.३८(भाग-१)/का-१७, दि.२८ मार्च २०१३ अन्वये आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी तसेच आदिवासी बाह्य क्षेत्रातील जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना पक्के घरकुल देणेकरिता 'शबरी आवास योजना' राबविणेत येते. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.घरकुल २०१६/प्र.क्र.३७/का-१७, दि.१५ मार्च २०१६, आदिवासी विकास विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. घरकुल २०१६/प्र.क्र.३७/का-१७,दि. २८ जून २०१६ व सचिव, आदिवासी विकास विभाग, यांचेकडील अ.शा.पत्र शघयो२०१६/प्र.क्र.३१/का-१७, दि. २७ सप्टेबर २०१६ अन्वये लाभार्थी पात्रता निश्चित करणेत आली आहे.

### लाभार्थी पात्रता :

१. लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमाती संवर्गातील असावा.

२. लाभार्थ्याचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षे असावे.

३. लाभार्थ्याकडे स्वत: ची किंवा शासनाने दिलेली जमीन असणे आवश्यक राहील.

४. लाभार्थ्याकडे स्वत: चे किंवा कुटुंबीयांचे पक्के घर नसावे.

५. विधवा, परित्यक्ता, निराधार, दुर्गम भागातील लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे.

६. लाभार्थीने शासनाच्या अन्य गृहनिर्माण योजना जसे - म्हाडामार्फत वितरीत घरे, एस.आर.ए. अंतर्गत बांधलेली घरे, मा. मुख्यमंत्री महोदय स्वेच्छा निर्णयानुसार वितरीत झालेल्या सदनिका इत्यादी योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

७. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. १ लक्षचे आत असावे.

८. लाभार्थी सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC-२०११) प्राधान्यक्रम यादीच्या (Gemerated Priority List) बाहेरील असावा.

### आवश्यक कागदपत्रे :

१. ७/१२ चा उतारा, मालमत्ता नोंदपत्र (प्रॉपर्टी रजिस्टर्ड कार्ड), ग्रामपंचायतीतील मालमत्ता नोंदवहीतील उतारा यापैकी एक.

२. घरपट्टी, पाणीपट्टी, विद्युत बिल या कागदपत्रांपैकी एक.

३. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत

४. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला

### घराचे क्षेत्रफळ :

घराच्या बांधकामाचे चटई क्षेत्र २६९ चौ. फूट राहील. तथापि, लाभार्थी स्वत:च्या मालकीची जागा असेल तर, त्यावर त्याच्या मर्जीनुसार स्वखर्चाने जास्त क्षेत्राचे बांधकाम करू शकेल.

### प्राधान्य क्षेत्र :

१. जातीय दंगलीमध्ये घराचे नुकसान (आगीमुळे व इतर तोडफोड) झालेली व्यक्ती

२. अ‍ॅट्रोसिटी कायद्यानुसार पीडित झालेल्या अनुसूचित जातीच्या पात्र व्यक्ती.

३. पूरग्रस्त क्षेत्र

४. घरात कोणीही कमावत नाही अशा विधवा महिला

५. शासकीय अभिकरणामधून निवड झालेल्या व्यक्तींना परिच्छेद अनुक्रमांक २ नुसार अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल.

६. उर्वरित सर्व क्षेत्र

### लाभार्थी निवड :

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.घरकुल २०१६/प्र.क्र.३७/का-१७, दि.१५ मार्च २०१६ अन्वये सामाजिक, आर्थिक जात सर्वेक्षण नुसार लाभार्थी निवड करावी.

१. या योजनेंतर्गत ग्रामीण भागामध्ये अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेमार्फत करण्यात यावी व ग्रामसभेने निवड केलेल्या लाभार्थ्यांची यादी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीकडे पाठविण्यात यावी.

२. ग्रामसभेने निवड केलेल्या अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची अंतिमत: निवड करण्याकरिता संदर्भ क्र.१ वरील दि.२८ मार्च २०१३ च्या शासन निर्णयामधील परि.१४ (अ) नुसार ग्रामीण क्षेत्राकरिता स्थापन केलेली घरकुल निर्माण समिती रद्द करण्यात येऊन त्याऐवजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - | अध्यक्ष |
| २) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | - | सदस्य |
| ३) कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद | - | सदस्य |
| ४) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | - | सदस्य सचिव |

३. ग्राम विकास विभागाच्या दि. १०.०२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (ग्रामविकास विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती स्थापन करण्यात आलेली असल्यामुळे दि. २८ मार्च, २०१३ च्या परि.१६ अन्वये प्रधान सचिव (आदिवासी विकास विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेली घरकुल योजना समन्वय समिती ग्रामीण क्षेत्राकरिता रद्द करण्यात आली आहे.

आदिवासी विकास विभागामार्फत शबरी आदिवासी घरकुल योजनेकरिता निधी उपलब्ध करून दिला जाईल.

## लाभार्थ्यास द्यावयाचे अनुदान :-

१. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.शघयो-२०१६/प्र.क्र.३३६/का-१७, दि. ६ जानेवारी २०१७ अन्वये शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत ग्रामीण भागाकरिता प्रति घरकुल (शौचालय बांधकामासह) अनुदान साधारण क्षेत्र रु. १,३२,०००/- व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी (शौचालय बांधकामासह) रु. १,४२,०००/- निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

२. शौचालय बांधण्यासाठी लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या रु. १२,०००/- ची प्रतिपूर्ती, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून करण्यात येईल.

३. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मधील लाभार्थ्यांप्रमाणे ग्रामीण भागातील शबरी आदिवासी घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना अभिसरणाद्वारे साधारण क्षेत्रासाठी रु. १७,२८०/- व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी रु. १८,२४०/- अनुदान उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदर योजना आवास सॉफ्ट (AwaasSoft) द्वारे लाभार्थ्यांचे रजिस्ट्रेशन (Registration) करून आणि पी.एफ.एम.एस. (PFMS) प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये सरळरित्या निधी वितरीत करून राबविण्यात येत आहेत. लाभार्थ्यांने बांधलेल्या घराचे फोटो, निधी वितरणाची ट्रॅकिंग करणे या सर्व बाबी आवास सॉफ्ट (AwaasSoft) वर उपलब्ध आहेत. त्यामुळे सदर योजनेंतर्गत अंमलबजावणीमध्ये पारदर्शकपणा आलेला आहे.

# राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम

## १. अभियानाची गरज :

पाण्याला आपल्याकडे जीवन म्हटलं आहे. पाण्यावर आपण सगळेच अवलंबून असतो, पण असं असलं तरी अजूनही महाराष्ट्रात दोन दोन -तीन तीन किलोमीटरवरून महिलांना पाणी आणावं लागतं. एक फार अर्थपूर्ण वाक्य आहे, ''जेव्हा एखादी स्त्री लांब जाऊन पाणी आणते, तेव्हा तिथे पाण्याची कमतरता नसते, तर कमी असते तिला मिळणाऱ्या न्यायाची''.

२०११ च्या जनगणनेनुसार साधारण ६८% महाराष्ट्र नळानं येणारं पाणी पितो. निम्म्या ग्रामीण भागात घरांमध्ये पाणीपुरवठा नाही. ज्यांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा नळानं होतो अशी घरं फक्त ५६% आहेत. जवळ जवळ महाराष्ट्रातील १३% घरांना लांबवरून पाणी आणावं लागतं. याचा अर्थ महाराष्ट्राची स्थापना होऊन ५८ वर्ष झाली तरी सर्वांच्या घरापर्यंत पाणी पोचलेलं नाही. घरात शुद्ध पाणी नसेल तर अशुद्ध पाण्यामुळे रोगराई होते, त्यावर खर्च होतो, स्त्रियांना फार लांबवरून पाणी आणावं लागत असल्याने त्यांना पाठीचे-मणक्याचे आजार होतात.

## २. अभियानाची सुरुवात :

सन २००० पासून ७३ व ७४ व्या राज्यघटना दुरुस्तीच्या आधारे केंद्र शासनाच्या मागणी आधारित योजना (Demand Driven approach) धोरणानुसार ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषदेच्या वतीने ग्रामीण पाणीपुरवठा योजनांचे नियोजन, अंमलबजावणी व देखभाल - दुरुस्तीची जबाबदारी दिली. ७५ लाखांपर्यंतच्या योजना राबविण्याचे अधिकार जिल्हा परिषदेला प्राप्त झाले.

केंद्र शासनाच्या निर्णयानुसार दिनांक १-४-२००९ पासून केंद्र शासनाच्या सर्व ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंमलात आलेला आहे. ग्रामीण जनतेला शुद्ध, सुरक्षित व पुरेसे पाणी देण्याचे शासनाचे धोरण आहे. या कार्यक्रमाअंतर्गत पाण्याच्या गावातील स्त्रोताची शाश्वती, शुद्धता व कुटुंब पातळीवर जल सुरक्षा या प्रमुख मुद्यांवर भर दिलेला आहे. शाश्वत पाणीपुरवठा योजने द्वारे शुध्द व स्वच्छ पाणीपुरवठा, आरोग्य व स्वच्छता यामध्ये सुधारणा तसेच भूजल व्यवस्थापन यासाठी पूरक उपाय आणि देखभाल व दुरुस्ती यामध्ये लोक सहभाग आदी धोरणांचा अंगीकार करण्यात आलेला आहे.

## ३. अभियानाचा उद्देश :

- गावात अस्तित्वात असलेल्या सर्व पिण्याच्या पाण्याच्या उपाययोजनांचा (existing drinking water infrastructure) आढावा घेऊन त्यातील स्त्रोतांचे संवर्धन व बळकटीकरण करणे म्हणजेच स्त्रोतांचे प्रदूषित होण्यापासून संरक्षण व त्यांची क्षमता वाढविणे.
- गुणवत्ताबाधित गावांमध्ये सुरक्षित स्त्रोत विकसित करण्याकरिता उपाययोजना करणे.
- गावाच्या लोकसंख्येत झालेल्या वाढीमुळे पूरक योजनांचा विचार करणे.
- उपाययोजना प्रस्तावित करताना वेगवेगळ्या विकल्पांपैकी किमान खर्चावर आधारित विकल्पाचा विचार करणे.

- एका गावातील वाड्या/वस्त्यांसाठी एकच योजना करण्यापेक्षा विकेंद्रित उपाययोजना किफायतशीर असल्यास त्याला प्राधान्य देणे.
- प्रस्तावित नळ योजना स्त्रोत बळकटीकरण व १००% घरगुती नळ जोडण्याचा समावेश अनिवार्य करणे.
- जलस्वराज्य प्रकल्पाच्या धर्तीवर प्रस्तावित उपाययोजनेचा भाग म्हणून गावकृती आराखडा तयार करणे बंधनकारक आहे. या अंतर्गत लोकसहभागामधून गावातील सर्व स्त्रोतांचा विचार करून पाण्याचा ताळेबंद तयार करणेचा आहे.
- पाण्याची गुणवत्ता टिकविण्याकरिता गावांतील संपूर्ण स्वच्छता आवश्यक असून गाव हागणदारीमुक्त होणे ही अट योजनांचे काम सुरू करण्याकरिता अनिवार्य आहे.

## ४. धोरणातील महत्त्वाचे तत्त्व व प्राधान्यक्रम:

मागील तीन वर्षांत टँकरद्वारे पाणीपुरवठा केलेल्या गावांना प्राधान्य देणे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाचे तांत्रिक सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषद किंवा भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांचे साहाय्य घेतले जाते. या तीन संस्थांपैकी कोणत्या संस्थेमार्फत आपल्या गावची नवीन नळ पाणीपुरवठा योजना/विशेष दुरुस्ती/विंधन विहीर/ पाणी साठवण टाक्या कामे घ्यावयाची याची निवड ग्रामसभा करू शकते.

## ५. ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी :

ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम मागणी आधारित धोरण असून केंद्र शासन पुरस्कृत वर्धीत वेग कार्यक्रम, स्वजलधारा व राज्य शासन पुरस्कृत महाजल तसेच बिगर आदिवासी/आदिवासी अंतर्गत कामाचा समावेश करून सन २००९-२०१० पासून सदर कार्यक्रमांचे रूपांतर राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमात करण्यात आलेले आहे. या अंतर्गत खालील पाणीपुरवठ्याच्या योजना येतील.

- साधी विहीर
- विंधन विहीर (हातपंप)
- शिवकालीन पाणी साठवण योजना
- अस्तित्वातील योजनेतील उद्भवाचे बळकटीकरण
- पूरक योजना
- अस्तित्वातील विहिरींचे रुंदीकरण व खोलीकरण
- लघु नळ पाणीपुरवठा योजना
- अस्तित्वातील योजनेची दुरुस्ती
- योजना विस्तारीकरण
- नवीन योजना

> वरीलपैकी कोणतीही योजना आपल्या गावासाठी राबवायची झाल्यास आपल्या तालुक्यातील उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेशी संपर्क साधावा.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने Habitation Directory व Yearly Status Report (YSR) या दोन बाबींना फार महत्त्वाचे स्थान आहे. Habitation Directory म्हणजेच जिल्ह्यामध्ये/तालुक्यामध्ये असलेल्या मान्यताप्राप्त वाड्या/वस्त्यांची यादी जिल्हाधिकारी यांचेकडून दरवर्षी मार्च अखेरीस अंतिम करून घेणे तसेच Yearly Status Report (YSR) म्हणजेच वाडी/वस्तीत प्रतिदिनी प्रती माणशी दरवर्षीच्या मार्च अखेरीस उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे प्रमाण देण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र. ग्रापाधों-११०९/प्र.क्र. १०४ अ/पापु-०७/दि. १७/०३/२०१० नुसार ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सुधारित मार्गदर्शक सूचना केल्या आहेत.

१. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची व्याप्ती (NRDWP- Coverage)

२. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (पाणीगुणवत्ता) NRDWP- Water Quality

३. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (शाश्वतता) NRDWP- Sustainability.

दरडोई दर दिवशी ४० लिटर पेक्षा कमी पिण्याचे पाणी उपलब्ध होत आहे, अशा गावांना/ वाड्यांना हाताळण्यासाठी जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी एकत्रित कृती आराखडा १९९९ (CAP ९९) तयार केलेला आहे. या अंतर्गत गावाचे, जिल्ह्याचे जलसुरक्षा आराखडे व वार्षिक कृती आराखडे तयार करणे बंधनकारक करण्यात आले आहे. भूजल व भूपृष्ठावरील पाण्याचा संयुक्त व शाश्वत वापर, भूजलसंवर्धन, पाण्याची गुणवत्ता या बाबींवर कार्यक्रमामध्ये भर आहे.

## ६. ग्रामपंचायतीची भूमिका व जबाबदाऱ्या :

- पाणीपुरवठा व स्वच्छता या संबंधीच्या सुविधांची तरतूद, संनियंत्रण, मूल्यांकन व व्यवस्थापन.
- गावातील पाण्याचे स्त्रोतांचे संरक्षण, देखभाल दुरुस्तीच्या दृष्टीने नियोजन व अंमलबजावणी करणे.
- ग्रामीण जनतेस निर्णय प्रक्रियेत सहभाग करून निधीचे व्यवस्थापन करणे, कर्मचारी व्यवस्थापन करणे.
- मंजूर प्रकल्प म्हणजेच योजनेची अंमलबजावणी आराखड्यानुसार उत्तम कारागिरी असलेल्या कारागिरांकडून बांधकामाद्वारे करून घ्यावी.
- खरेदी केलेले साहित्य व्यवस्थित कोठारात ठेवले आहे आणि या साठवलेल्या साहित्याच्या नोंदी व्यवस्थितपणे घेतल्या आहेत याची खात्री करणे.
- ग्रामसभेने मंजुरी दिलेल्या प्रकल्प म्हणजेच योजनेचे पूर्णत्व अहवाल आणि आर्थिक अहवाल ग्राम आरोग्य, पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने, ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेकडे सादर करणे.
- आर्थिक माहितीपत्रातील महत्त्वाचे मुद्दे गावामध्ये सार्वजनिक ठिकाणी लावले पाहिजेत.
- ग्रामपंचायतीचे कार्यालय, ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, महिला विकास समित्यांचे कार्यालय, गावातले देऊळ, शाळा, महिलामंडळाचे कार्यालय आदी ठिकाणी ही माहिती लावणे.
- सर्व योजनांचा मासिक भौतिक व आर्थिक प्रगतीचा आढावा घेणे व त्यांचा अहवाल ग्रामसेवकांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) व गट विकास अधिकारी यांना सादर करणे.

## ७. ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची रचना :

- ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती ही महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ४९ नुसार बनलेली प्रकल्पातील प्रमुख समिती आहे. प्रकल्पाची आखणी, नियोजन, अंमलबजावणी व देखभाल करण्याची जबाबदारी या समितीची आहे. सदर समितीची निवड ग्रामसभेमधून केली जाते.

- सदर समितीचे अध्यक्ष थेट निवडलेले सरपंच आणि सचिव ग्रामसेवक हे असतील.
- या समितीमध्ये किमान १२ सदस्य, जास्तीत जास्त २४ सदस्य असतील.
- त्यातील किमान १/३ सदस्य ग्रामपंचायत सदस्यांतून निवडलेले असतील.
- या समितीत ५० टक्के महिला सदस्यांचा समावेश असेल.
- गावपातळीवरील महिला मंडळ, युवा मंडळ, भजनी मंडळ, महिला बचत गट, सहकारी संस्था इ. चे प्रतिनिधीत्व असेल.
- ग्रामस्तरीय शासकीय/ जिल्हा परिषद/ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची आमंत्रित व सहकारी सदस्य म्हणून निवड करता येईल, पण त्यांना मतदानाचा अधिकार नसेल.
- ३० टक्के मागासवर्गीय असतील.
- प्रत्येक वॉर्ड किंवा वस्तीतील किमान एक प्रतिनिधी सदस्य म्हणून असेल.

## ८. ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :

- ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती/ महिला विकास समिती यांनी सर्व रोकड व्यवहारांच्या नोंदी त्याच दिवशी रोखवहीत नोंदवणे.
- प्रकल्प म्हणजेच योजनेअंतर्गत मिळालेली रक्कम तात्काळ प्रकल्पाकरिता उघडण्यात आलेल्या बँक खात्यात विनाविलंब त्याच दिवशी जमा करणे. लाभार्थीकडून मिळालेली वर्गणी किंवा काही भाग मागे ठेवू नये किंवा दैनंदिन खर्चासाठी वापरण्यात येऊ नये.
- कोणतीही रक्कम अदा करण्यापूर्वी पाणीपुरवठा समिती/ ग्रामसभेच्या मंजुरीशिवाय रक्कम अदा करू नये.
- बँकेतून रक्कम काढताना, ती काढणे अत्यंत आवश्यक असल्यासच काढावी. आवश्यकतेपेक्षा जास्त रक्कम काढण्यात येऊ नये.
- हातची शिल्लक शक्यतो निरंक ठेवावी. हातची शिल्लक रु. ५००/– पेक्षा जास्त पडून राहिल्यास सदर बाब ही तात्पुरता अपहार समजून सबंधितांवर त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.
- आगाऊ दिलेल्या रकमांचे समायोजन त्वरित होणे जरुरीचे आहे. सदर रकमा जास्त कालावधीसाठी समायोजित न झाल्यास सदर रक्कम मंजूर करणाऱ्या विरुद्ध त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

### अ) निविदा कार्यपद्धती :

प्रकल्पाच्या म्हणजेच योजनेच्या नियमावलीनुसार साहित्याची खरेदी अगर कामे जाहीर निविदा मागवून करणे बंधनकारक आहे. मजूर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगारांना कामे देणेबाबतचे शासनाचे आदेशा व्यतिरिक्त कोणतेही खरेदी अगर कामे विनानिविदा करून घेता येणार नाहीत.

### ब) देयकांचे प्रदान करण्याची पद्धत :

प्रकल्प नियमावलीतील तरतुदीनुसार ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने प्राधिकृत केलेल्या सभासदांनी देयके पारीत करावीत. प्राधिकृत व्यक्तीव्यतिरिक्त व्यक्तीचे सहीची प्रदाने स्वीकारु नये.

- मागणी किंवा देयके यांची पोहोच पावती साक्षांकित केलेली असावी.
- मागणी देयक हे मागणी करणाऱ्याने किंवा ज्याच्या वतीने मागणी करणेत येत आहे त्याने स्वाक्षरी केलेले असावे. देयकाचे प्रदान पोहोच पावती प्राप्त झाल्याशिवाय करण्यात येऊ नये.
- कोणत्याही आर्थिक व्यवहारासोबत बिले, पावत्या व कॅशमेमो जोडावेत. ही कागदपत्रे नसल्यास त्याबदली प्रमाणक (व्हाऊचर) तयार करावे.
- योग्य कागदपत्रे जोडलेली खर्चाची निवेदने मंजुरीसाठी ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती/महिला विकास समितीकडे पाठवावीत. त्यांची सही व मंजुरीशिवाय बिल चुकते केले जाऊ नये.
- रु. १०००/– वरील रकमेचे प्रदान हे धनादेशाद्वारेच करण्यात यावे.
- बँकेचे खाते चालवणाऱ्या दोघांपैकी एकाकडे धनादेश पुस्तक राहील. खर्चाच्या रकमेची योग्य पाहणी केल्यानंतर ग्रामसभेने/महिला विकास समितीने नियुक्त केलेले दोन सदस्य धनादेशावर सह्या करतील. या दोघांपैकी एक महिला सदस्य असेल.
- धनादेश पुस्तक हे बँक खात्यावर व्यवहार करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती सदस्याने ताब्यात ठेवणे असून, सुरक्षित ठेवावयाचे आहे.
- रक्कम ज्याला प्रदान करण्याची आहे, त्यांचे नावे धनादेश काढणेत यावा. अन्य व्यक्तीच्या नावे धनादेश काढण्यात येऊ नये.
- प्रत्येक धनादेश हा रेखांकित करण्यात यावा.
- कोऱ्या धनादेशांवर स्वाक्षऱ्या करून ठेवू नयेत.
- दर महिनाअखेरीस बँक अकाऊंट स्टेटमेंट मिळाल्यानंतर, त्यातील नोंदी व रोकड नोंदवहीतील नोंद परस्परांशी पडताळून बँक ताळमेळ पत्रक तयार करावे.

**क) सेवांचा खर्च :**

स्वयंसेवी संस्था, साह्य देणाऱ्या संस्था व अन्य संस्था यांच्याशी झालेल्या करारातील तरतुदीनुसारच त्यांनी पुरविलेल्या सेवेसाठी त्यांना रक्कम प्रदान केली जाईल. कराराच्या अटीचा भंग करून काही रक्कम अदा करणाऱ्याकडून सदरची रक्कम वसूल करण्यात येईल.

ग्रामस्तरावर खरेदी करताना ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने कामासाठी पुरवठादार/कंत्राटदारांना अग्रीम देऊ नये. अशी अग्रीमाची रक्कम देणे अत्यंत अपरिहार्य असेल तर अग्रीमाबाबतच्या वित्तीय नियमांचे काटेकोर पालन होत आहे याची खात्री करावी. कार्यारंभ आदेशातील तरतुदीनुसार अग्रीम द्यावयाचे झाल्यास अग्रीमाइतकी राष्ट्रीयीकृत बँकेकडून आवश्यक ती बँक गॅरंटी घेणे आवश्यक आहे. या अग्रीमाच्या व समायोजनाच्या नोंदी मोजमाप पुस्तकामध्ये असणे आवश्यक आहे.

मोजमाप पुस्तकात दिनांक निहाय नोंदी नोंदविताना ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा स्वच्छता समितीने अंतिम केलेल्या मंजूर निविदेतील दराप्रमाणे नोंदविणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तक हे अत्यंत महत्त्वाचे

अभिलेख असल्याने त्याची हालचाल नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ग्रामस्तरावरील प्रत्यक्ष नोंदविलेला खर्च व नोंदमाप पुस्तकामध्ये नोंदविलेल्या कामाची मोजमापे व बाबनिहाय खर्च याचा ताळमेळ घालून शहानिशा करणे आवश्यक आहे.

कंत्राटदाराला केलेल्या कामाचा मोबदला अदा करणे पूर्वी केलेल्या कामाचे मोजमाप पुस्तकांमध्ये नोंदवून त्यांनुसार होणाऱ्या किमतीपेक्षा जास्त रक्कम अदा केली जाणार नाही याची खात्री करावी. जर मोजमाप पुस्तकामध्ये नोंद न घेता अगर झालेल्या कामाच्या किमतीपेक्षा जास्त रक्कम कंत्राटदारास अदा केली गेली तर रक्कम मंजूर करणारा व रक्कम अदा करणारा यांना संयुक्तपणे जबाबदार धरून सदर रक्कम व्याजासह त्यांच्याकडून वसूल करणेत येईल.

साहित्याच्या पुरवठादारास पुरवठा केलेल्या साहित्याचा मोबदला अदा करणेपूर्वी प्राप्त झालेल्या साहित्याची नोंद मोजमाप पुस्तकांमध्ये नोंदी घेऊन ते साहित्य चांगले व मागणी केलेल्या दर्जाचे आहे हे प्रमाणित करुन घ्यावे. प्राप्त साहित्याची नोंद साठा नोंदवही/मालमत्ता नोंदवहीमध्ये घेऊनच रक्कम अदा करावी.

ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे सदस्य हे विश्वस्त या नात्याने आपली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडतात. सदर कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा जाणूनबुजून गैरव्यवहार, अपहार अगर फसवणूक केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर फौजदारी / दिवाणी कारवाई केली जाईल.

**ड) सामाजिक लेखापरीक्षण समितीची कर्तव्य व जबाबदाऱ्या :**

ग्रामपंचायतीच्या कारभारावर लक्ष ठेवण्यासाठी आणि प्रकल्पांचे सर्व काम नियमांनुसार चालले आहे किंवा नाही, याची खातरजमा करण्यासाठी ग्रामसभा एका सामाजिक लेखापरीक्षण समितीची स्थापना करील या समितीच्या ठरलेल्या जबाबदाऱ्यांखेरीज इतरही काही जबाबदाऱ्या आहेत.

ग्रामपंचायत, इतर उप-प्रकल्प म्हणजेच योजनेच्या संदर्भातील समितींचे सर्व आर्थिक व्यवहार, पुस्तकातल्या नोंदी आर्थिक शिस्तीनुसार झाल्या आहेत याची खात्री करण्यासाठी त्यांची छाननी व लेखापरीक्षण करणे.

काही गैरव्यवहार आढळल्यास त्याची ग्रामसभेला तात्काळ माहिती देऊन परिस्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

आर्थिक गैरव्यवहारांचा आणि त्रुटींचा पाठपुरावा करून त्यावर उपाय करणे.

जिल्हा परिषदेकडून मिळणाऱ्या प्रत्येक हप्त्याच्या बरोबरीने होणाऱ्या प्रत्यक्ष कामाच्या टप्प्याला प्रमाणपत्र देणे.

## ९. ग्रामीण पाणीपुरवठा योजनांचे देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान :

(शासन निर्णय क्र. देप्रोअ-१३०९/प्र.क्र.६९/पापु-०७/दि.१७ ऑगस्ट २००९ नुसार) आर्थिक वर्ष सन २००९-१० पासून राज्य स्तरावर देखभाल दुरुस्तीसाठी उपलब्ध असलेल्या एकूण देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानापैकी

१. हातपंप/वीजपंपाच्या देखभाल दुरुस्तीसाठी १५ टक्के निधी.

२. राज्यातील नियमित (Regular) चालणाऱ्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी १५ टक्के निधी.

३. राज्यातील हंगामी (Seasonal) चालणाऱ्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी १५ टक्के निधी.

४. राज्यातील गुरुत्व आधारित योजनांसाठी ५ टक्के निधी. त्या अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यातील तीन ग्रामपंचायतींना पाणीपुरवठा योजनांची आदर्श अंमलबजावणी, देखभाल दुरुस्ती, पाणी पट्टीची आकारणी व १०० टक्के वसुली, १०० टक्के घरगुती कनेक्शन, भूजल पुनर्भरण इ. साठी त्यांनी मागील आर्थिक वर्षात केलेल्या कामासाठी बक्षीसरूपात देणेत येते.

अ) अ.क्र. १,२ व ३ नुसार देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानासाठीचे प्रस्ताव जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी राज्य शासनाकडील पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडे दरवर्षी ३१ ऑगस्टपर्यंत पाठवावयाचे आहेत. प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानाचे वाटप संबंधित जिल्हा परिषदांना पाणीपुरवठा स्वच्छता विभागाकडून केले जाते. वरील सर्व निधी राज्य स्तरावर राखून ठेवण्यात येतो.

ब) अ.क्र. १,२ व ३ साठी राज्य शासनाकडून जेवढा निधी वितरीत करण्यात येतो, तेवढाच निधी सर्व जिल्हा परिषदांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात स्वतंत्र गावच्या नळ पाणीपुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी वितरीत करण्यात येतो. या ग्रामपंचायतींना मागील आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष दिलेल्या महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या वार्षिक देयकांच्या (वीजबिलांच्या ५० टक्के निधी देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान द्यावयाचे आहे.)

## १०. प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण

| | |
|---|---|
| – आकस्मित ओटी टेस्ट करणे. | आरोग्य कर्मचारी, |
| – कार्य कक्षेतील १०% स्त्रोतांचे नमुने तालुका– ग्रामीण रुग्णालय प्रयोगशाळा/उप विभागीय/जिल्हा प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविणे. | आरोग्य पर्यवेक्षक, |
| – तालुका ग्रामीण रुग्णालय प्रयोगशाळेत दूषित येणाऱ्या पाणी नमुन्यांची शुद्धीकरणानंतर ओटीटेस्ट नकारात्मक असल्यास पाणी नमुना सखोल तपासणीसाठी पुन्हा जिल्हा प्रयोगशाळेकडे पाठविणे. | वैद्यकीय अधिकारी |
| – गावातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे परिसर स्वच्छतेचे सर्वेक्षण जलसुरक्षक, ग्रामस्थ, यांना बरोबर घेऊन वर्षातून २ वेळा करून ग्रामपंचायतीस लाल/हिरवे/पिवळे कार्ड वितरीत करणे. | |
| – जल सुरक्षाकांकडून प्राप्त झालेला ब्लिचिंग पावडर नमुना व रासायनिक तपासणीसाठीचा पाणी नमुना जिल्हा प्रयोगशाळेकडे पाठविणे. | |

## ११. ग्रामपंचायत स्तरावरून प्रस्ताव सादर होताना करावयाची आवश्यक पूर्तता :

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडील शासन परिपत्रक क्र. ग्रा.पा.पु १००५/प्र.क्र.७४ (२)/पापु–०७/दि. २ मे २००५ नुसार खालील सूचना निर्गमित केल्या आहेत.

- या योजनेत गावाची निवड होण्यासाठी संबंधित गावाच्या ग्रामसभेच्या सहमतीने रीतसर मागणी अर्ज (परिशिष्ट अ शासन शुद्धिपत्रक -११०-/प्र.क्र.१०४-अ/पापु-०७/दि. ३० ऑगस्ट २०१० नुसार) उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद उपविभाग यांचेकडून ग्रामपंचायतीने घेणेत यावा.
- वाड्या वस्त्यांची ग्रामसभा झाल्यानंतर महिलांची स्वतंत्र सभा व त्यानंतर सर्वसाधारण ग्रामसभा या पद्धतीची ग्रामसभा झाली पाहिजे.
- नवीन योजनेची मागणी करण्यापूर्वी गावातील जुनी योजना, त्याची सर्व उपांगे गावाने ताब्यात/ हस्तांतरीत करून घेतली पाहिजे व त्याचा वापर होत असावा.
- गाव ग्रामपंचायतीने, पंचायत समितीकडे (उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग) अर्ज सादर करताना योजनेसाठी दिलेला पर्याय हा किमान खर्चाचा असावा.
- लोकवर्गणी ही गावातील लाभार्थ्यांकडूनच जमा केलेली असावी. मात्र, ती कमीजास्त प्रमाणात आर्थिक परिस्थितीनुसार लाभधारकांकडून घेता येईल.
- शेतमजूर व गावातील गरीब व्यक्तींपैकी श्रमदान करणाऱ्यांचा सहभाग हा पैशात रूपांतरीत केल्यावर रोखवर्गणी देणाऱ्यांपेक्षा जर जास्त होत असेल तर जास्तीच्या श्रमदानाचे मूल्य मजुरी म्हणून त्यांना परत देण्यात यावे.
- कंत्राटदारांकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे लोकवर्गणी जमा करू नये. ही बाब योजनेच्या अंमलबजावणीच्या पूर्वी किंवा अंमलबजावणी काळात अथवा योजना पूर्ण झाल्यावर केव्हाही निदर्शनास आल्यास याला जबाबदार असणाऱ्या या सर्व व्यक्तींवर नाईलाजाने कार्यवाही करावी लागेल.
- ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती तसेच ग्राम सामाजिक लेखापरीक्षण समिती या दोन्हीही महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमच्या सुधारित कलम ४९ अन्वये घटित झालेल्या असल्या पाहिजेत. यामध्ये दोन्ही समित्यांतील सदस्य पूर्णत: वेगवेगळे असले पाहिजेत व त्यांची निवड ग्रामसभेतच झाली पाहिजे.
- ग्रामसभेने जेवढे अधिकार दिले असतील तेवढेच अधिकार ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती व ग्राम सामाजिक लेखापरीक्षण समितीने वापरले पाहिजेत.
- गावाने पाणी लेखापरीक्षण व पाणी अंदाजपत्रक सहभागी पद्धतीने करून घेणे आवश्यक आहे.
- गावाने ग्रामपंचायत योजनेसाठी पंचायत समिती उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग यांच्याकडे अर्ज सादर करताना ग्रामसभा घेऊन त्या ग्रामसभेत घेतलेल्या पुढील निर्णयांच्या ठरावाची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे:-

  अ) सिंचनासाठी गावठाणात विंधन विहीर घेण्यात येणार नाही.

  ब) गाव/वाडी/वस्ती १००% हागणदारीमुक्त करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल व योजनेचा दुसरा हप्ता मिळण्यापूर्वी गाव १००% हागणदारीमुक्त करण्यात येईल.

  क) राज्यशासनाने ठरवून दिलेल्या किमान दरापेक्षा कमी नसेल एवढी पाणीपट्टी लावून त्याची वसुली करून योजनेच्या देखभाल व दुरुस्तीचा १००% खर्च वसूल केला जाईल व योजनेचा शेवटचा हप्ता मिळण्यापूर्वी ३ महिन्यांची पाणीपट्टी लाभार्थ्यांकडून आगावू वसूल केली जाईल.

- प्राप्त होणारा निधी ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणीपुरवठा समितीच्या नावाने स्वतंत्र बँक खाते उघडून त्यातच ठेवला पाहिजे व यातून खर्च करताना व तो काढताना ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या किमान दोन सदस्यांच्या सहीने काढता येईल. परंतु, त्यापैकी किमान एक सदस्य महिला असणे अनिवार्य आहे.
- अंदाजपत्रक आराखड्याप्रमाणे देखभाल दुरुस्तीला येणाऱ्या खर्चाचा विचार करून जो पाणी पट्टीचा दर निश्चित होत असेल तो दर गावाने लावल्याचे आदेश काढले पाहिजेत. तो दर शासनाने ठरविलेल्या किमान दरापेक्षा खर्च जरी कमी येत असला तरी कमी करता कामा नये.
- गावातील योजनेच्या कामाचा अहवाल जिल्हा परिषदेकडे पाठविताना त्यावर ग्राम सामाजिक लेखापरीक्षण अहवाल ग्रामपंचायतीला सही शिक्क्यानिशी पाठविला पाहिजे.

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

## १) पार्श्वभूमी :

रोजगार हमी योजना राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. महाराष्ट्रात सन १९७२ मध्ये पडलेल्या भीषण दुष्काळामध्ये लोकांना रोजगारप्रधान कामांची उपलब्धता करून देण्यात आली होती. राज्यातील मजुरांना रोजगाराची शाश्वत हमी मिळावी व त्या माध्यमातून मत्ता निर्माण व्हावी या दृष्टिकोनातून महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ अन्वये महाराष्ट्रात 'रोजगार हमी योजना' कार्यान्वित करण्यात आली. राज्यात सदर योजनेतून ग्रामीण भागातील अकुशल व्यक्तींना मजूरप्रधान कामे उपलब्ध करून देणे तसेच वैयक्तिक स्वरूपाचा लाभाची कामे हाती घेण्यात आली होती. या योजनेला राज्य शासनाच्या निधीतून अर्थसाहाय्य केले जात होते.

तथापि केंद्र शासनाने सन २००५ पासून संपूर्ण देशात 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा' लागू केल्याने, महाराष्ट्र शासनाने पूर्वीच्या रोजगार हमी योजना कायदा १९७७ मध्ये सन २००६ मध्ये सुधारणा करून संपूर्ण राज्यात १ एप्रिल २००८ पासून सदरची योजना राबविण्यात येत आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामाची मागणी करणाऱ्या कुटुंबाला १०० दिवस केंद्र शासन निधीतून व उर्वरित दिवसासाठी राज्य निधीतून योजनेअंतर्गत अनुज्ञेय कामे उपलब्ध करून देण्यात येतात.

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ सुधारित १२ ई नुसार वैयक्तिक लाभाची जवाहर/धडक सिंचन विहीर योजना, फळबाग लागवड व त्याला शेततळे योजना राबविण्यात येत असून यास राज्य निधीतून खर्च करण्यात येतो.

## २) योजनेचा उद्देश :

१) ग्रामीण भागातील कामाची मागणी करणाऱ्या अकुशल मजुरांना रोजगार उपलब्ध करून देणे

२) ग्रामीण भागातील जास्तीत जास्त कुटुंबांना वैयक्तिक कामांचा लाभ देणे.

३) या कामांच्या माध्यमातून ग्रामीण भागात शाश्वत संसाधने निर्माण करणे.

## ३) योजनेअंतर्गत कामे :

योजने अंतर्गत २ प्रकारची कामे घेण्यात येतात.

**१) वैयक्तिक लाभाची कामे :** अहिल्यादेवी सिंचन विहीर, कल्पवृक्ष फळबाग लागवड, अमृतकुंड शेततळे, भूसंजीवनी नाडेप व व्हर्मी कंपोस्ट, निर्मल शौचालय, निर्मल शोषखड्डे, शेळी/कुक्कुटपालन/गाय गोठा शेड, मत्सव्यवसाय ओटे, तुती लागवड इ.

**२) सार्वजनिक स्वरूपाची कामे :** रस्ते, जलसंधारण कामे, समृद्ध गाव तलाव, पारंपरिक पाणीपुरवठयाचे नूतनीकरण कामे व गाळ काढणे, सार्वजनिक पाणीपुरवठा विहीर, वृक्षलागवड, ग्रामपंचायत भवन, स्मशानभूमी शेड व ओटा इत्यादी.

## ४) समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजना :

मनरेगा योजने अंतर्गत अनुज्ञेय वरील वैयक्तिक व सार्वजनिक स्वरूपाची कामे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर होण्याच्या दृष्टिकोनातून राज्य शासनाने १ ऑक्टोबर, २०१६ पासून राज्यात 'समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजना' मागणी व उदिष्ट आधारित, कार्यान्वित करण्यात आली आहे.

## ५) मनरेगा योजनेअंतर्गत कामचे स्वरूप :

१) योजने अंतर्गत हाती घ्यावयाच्या एकूण कामांच्या ६५% वार्षिक खर्चाची कामे जलसंधारणाची आणि ३५% इतर कामे होणे आवश्यक आहे.

२) तसेच सदर कामांवरील अकुशल मजुरीचा खर्च ६०% व कुशल मजुरीवरील खर्च ४०% या प्रमाणात जिल्हास्तरावर वार्षिक स्वरूपात होणे आवश्यक आहे.

३) वार्षिक लेबर बजेट मधील किमान ५०% कामे ग्राम पंचायतीने करणे बंधनकारक करण्यात आले आहेत.

## ६) कामाचे वार्षिक लेबर बजेट आराखडा :

योजने अंतर्गत वैयक्तिक व सार्वजनिक स्वरूपाची मागणी आणि आवश्यकता आधारित कामांचा पुढील वर्षाचा वार्षिक लेबर बजेट आराखडा ग्राम पंचायतीने तयार करून १५ ऑगस्टच्या ग्रामसभेत मंजूर करून त्यास पंचायत समिती व जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे बंधनकारक आहे.

## ७) वैयक्तिक कामांचा लाभ :

**लाभार्थी निवड व निकष**

योजने अंतर्गत वैयक्तिक कामांचा लाभ देण्यासाठी लाभार्थीची ग्रामसभेतून प्राधान्यक्रमाने खालील प्रवर्गातून निवड केली जाते.

१) अनुसूचित जाती

२) अनुसूचित जमाती

३) भटक्या जमाती

४) दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी

५) भूसुधार योजनेचे लाभार्थी

६) कृषी कर्जमाफी योजना २००४ नुसार अल्पभूधारक व सीमांत शेतकरी

७) अनुसूचित जमातीचे व अन्य परंपरागत वननिवासी अधिनियम २००६ नुसार पात्र व्यक्ती

८) शारीरिक विकलांग कुटुंब प्रमुख असलेले कुंटुंब

९) इंदिरा आवास योजना लाभार्थी

१०) स्त्री कुटुंब प्रमुख असलेली कुंटुंबे

## ८) जॉब कार्ड :

योजनेअंतर्गत कामाची मागणी करणाऱ्या कुटुंबाला /सदस्याला (मजूर) काम उपलब्ध करून देणे तसेच वैयक्तिक लाभाच्या योजनेचा लाभ मिळण्यासाठी सदर कुटुंबाकडे जॉब कार्ड असणे बंधनकारक आहे. वंचित व मागणी करणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला जॉब कार्ड देणे ग्रामसेवकास बंधनकारक आहे.

## ९) कामाचे ई – मस्टर

योजने अंतर्गत देण्यात येणारी कामे मजूर प्रधान अकुशल स्वरूपाची मोठ्या प्रमाणावर असल्याने मजुरांचे ई–मस्टर, मजूर कुटुंबाच्या कामाच्या मागणीनुसार ऑनलाइन नरेगा संकेत स्थळावरून काढून उपस्थिती नोंदविण्यात येते.

## १०) मजुरी :–

प्रत्यक्ष मजुरांनी केलेल्या कामाच्या प्रमाणात झालेल्या मूल्यांकनानुसार दर १५ दिवसांच्या आत मजुरी मजुरांच्या बँक / पोस्ट खातेवर अदा करणे बंधनकारक असून विलंब झाल्यास प्रतिदिन ०.०५ % दराने विलंब शुल्क अदा केले जाते. मजुरी दर रु. २०३/– आहे.

## ११) काम उपलब्ध करून देणे बंधनकारक/ कामाची हमी

कामाची मागणी करणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला १५ दिवसात काम उपलब्ध करून देणे बंधनकारक असून काम १५ दिवसांत उपलब्ध करून न दिल्यास संबंधित कुटुंबाला बेरोजगार भत्ता देणे बंधनकारक करण्यात आले आहे. परंतु असा दर वित्तीय वर्षात पहिल्या तीस दिवसांकरिता वेतनदराच्या एक चतुर्थांशापेक्षा कमी असणार नाही व उर्वरित कालावधीसाठी एक द्वितीयांशापेक्षा कमी असणार नाही .



## मनरेगा : ग्रामपंचायतीची भूमिका

या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीतून गावाचा विकास होण्यासाठी ग्रामपंचायतीने खालीलप्रमाणे भूमिका बजावणे आवश्यक आहे.

१) योजने अंतर्गत पुढील वर्षाचे लेबर बजेट तयार करून ग्रामसभेची मान्यता घेणे.

२) वार्षिक लेबर बजेट मधील किमान ५० % कामे ग्रामपंचायतीने करणे बंधनकारक आहे.

३) मागणी करणाऱ्या मजूर कुटुंबास १५ दिवसांत काम उपलब्ध करून देणे.

४) वंचित व मागणी करणाऱ्या कुटुंबास जॉब कार्ड देणे.

५) ग्रामपंचायत अंतर्गत घेण्यात आलेल्या कामांचे सनियंत्रण करणे.

६) प्रत्येक आर्थिक वर्षात दोन वेळा (६ महिन्याने) ग्रामपंचायत अंतर्गत घेण्यात आलेल्या सर्व कामांचे सामाजिक अंकेक्षण करणे.

७) योजनेशी संबंधित सर्व १ ते ७ व इतर आवश्यक नोंदवह्या /रजिस्टरमध्ये माहिती अद्ययावत ठेवणे.

८) कामाची मागणी मजुरांच्या यादीसह नोंदविणे व दर मस्टर प्राप्त करून कामे सुरू करणे व पूर्ण करणे. झालेल्या कामांची मजुरी १५ दिवसांत अदा करणे. विलंब झाल्यास ०.०५% दराने विलंब शुल्क अदा करणे

९) मजुराने मागणी केल्यास १५ दिवसांत काम उपलब्ध करून न दिल्यास, पहिल्या ३० दिवसासाठी २५% व उर्वरित दिवसांसाठी ५०% प्रतिदिन दराने बेरोजगार भत्ता देणे.

१०) मजूर दिवसाचे दरमहा आयोजन करणे (शासन परिपत्रक दि. ५/०९/२०१४)

११) ग्रामरोजगार सेवकाची ग्रामसभेतून निवड करणे व मानधन अदा करणे.



# राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान

राज्यात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना ही राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान या स्वरूपात राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर अभियान केंद्र शासन ७५% व राज्य शासन २५% पुरस्कृत आहे.

NRLP - केंद्र शासनाने राज्यातील १० जिल्ह्यातील ३६ तालुक्यांमध्ये जागतिक बँकेच्या कर्ज साहाय्यातुन NRLP हा कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला.

NRLM - उर्वरित तालुक्यांमध्ये हा कार्यक्रम केंद्र पुरस्कृत NRLM म्हणून राबविण्यात येणार आहे.

### अभियानाचा उद्देश

तळागाळातील गरीबांसाठी मजबूत अशा संस्थांची बांधणी करून त्याद्वारे लाभदायक स्वयंरोजगार व कुशल वेतनी रोजगाराची संधी मिळविणे गरीब कुटुंबांना शक्य व्हावे व त्याद्वारे दारिद्रय कमी करणे. परिणामी कायमस्वरूपी तत्त्वावर त्यांच्या उपजिविकेत उल्लेखनीय सुधारणा करणे.

### महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची वैशिष्ट्ये :

- संवेदनशील साहाय्य रचना
- सर्वसमावेशक सामाजिक सहभाग
- दारिद्र्य रेषेखालील स्वरोजगारींच्या संस्थांचे उन्नतीकरण
- मागणी आधारित पतपुरवठा
- प्रशिक्षण व क्षमता बळकटीकरण
- फिरता निधी
- सर्व समावेशक आर्थिक अंतर्भाव
- व्याजदरासाठी अनुदान
- मूलभूत सुविधा निर्मिती व विपणन साहाय्य
- अन्य योजनांचे एकत्रिकरण व समन्वय

राज्यामधील सर्वांत कमी मानवी विकास निर्देशांक असलेल्या (१) ठाणे,(२) रत्नागिरी, (३) नंदूरबार, (४) सोलापूर, (५) जालना, (६) यवतमाळ, (७) उस्मानाबाद, (८) वर्धा, (९) गडचिरोली (१०) गोंदिया या १० जिल्ह्यांतील ३६ तालुके प्रथम टप्प्यात निवडून तेथे राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान राबविण्यात येत आहे. उर्वरित तालुक्यांमध्ये सदर अभियान पुढील टप्प्यात राबविण्यात येणार आहे.

या योजनेअंतर्गत खालील १० जिल्ह्यांमधील ३६ तालुक्यांकरिता सदर योजना NRLP (Intensive) म्हणून राबविण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | निवडलेल्या तालुक्याचे नाव (NRLP) |
|---|---|---|
| १ | ठाणे | तलासरी, जव्हार, शहापूर, पालघर, भिवंडी |
| २ | रत्नागिरी | रत्नागिरी, संगमेश्वर, लांजा |
| ३ | सोलापूर | मोहोळ, सांगोला, माळशिरस, बार्शी |
| ४ | नंदूरबार | अक्कलकुवा, शहादा, धडगाव |
| ५ | उस्मानाबाद | उस्मानाबाद, तुळजापूर, लोहारा |
| ६ | जालना | जालना, भोकरदन, घनसावंगी |
| ७ | यवतमाळ | कळंब, घाटंजी, बाभुळगाव, राळेगाव, पांढरकवडा |
| ८ | वर्धा | देवळी, वर्धा, सेलू |
| ९ | गोंदिया | सालकेसा, अर्जुनी-मोरगाव, तिरोडा |
| १० | गडचिरोली | कुरखेडा, धानोरा, एटापल्ली, अहेरी |

**सदर योजनेची अधिक माहिती http://msrlm.org/mrlif/index.html या वेबसाइट वर उपलब्ध होईल.**



# दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना

राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचाच एक भाग म्हणून दीन दयाळ उपाध्याय - ग्रामीण कौशल्य योजना ही महत्त्वाकांक्षी योजना केंद्र शासनाने सुरू केली आहे. ग्रामीण भागातील १५ ते ३५ वर्षे वयोगटातील युवकांची मुळात असलेल्या कौशल्याची कार्यक्षमता वाढवून त्यांना विविध संघटित क्षेत्रात वेतनी रोजगार उपलब्ध करणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण युवकांना उपलब्ध असलेल्या किंवा होणाऱ्या संधीच्या दृष्टिकोनातून त्यांच्या कौशल्य क्षमतेचा विकास व्हावा यासाठी शासनाने सदर कार्यक्रम आखलेला आहे.

### सविस्तर माहिती

| अ.क्र. | योजना | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव : | दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना |
| २ | योजने बद्दलचा शासन निर्णय : | ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांची प्रकल्प मार्गदर्शक तत्त्वे |
| ३ | योजनेचा प्रकार : | कौशल्य विकास व रोजगार सृजन योजना |
| ४ | योजनेचा उद्देश : | ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील बेरोजगार युवक/युवतींना प्रशिक्षण देऊन रोजगाराची उपलब्धता करून देणे |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव : | ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील बेरोजगार युवक/युवती |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी : | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे<br>महाराष्ट्र राज्य जीवनोन्नत्ती अभियानाशी जोडलेल्या स्वयंसाहाय्यता समूहाच्या सदस्यांच्या कुटुंबातील युवक / युवती<br>महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे लाभार्थी<br>या योजनेतील लाभार्थी १५ ते ३५ वयोगटातील असले पाहिजेत |
| ७ | आवश्यक कागदपत्रे : | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची शिधापत्रिकेची प्रत<br>बचत गट प्रमुखाचे प्रमाणपत्र अथवा बचत गटाच्या बँक पासबुकची प्रत<br>मनरेगा - जॉब कार्डची प्रत<br>वयाच्या दाखल्याची प्रत<br>जातीच्या दाखल्याची प्रत<br>आधार कार्डची प्रत |

| अ.क्र. | योजना | | सविस्तर माहिती |
|---|---|---|---|
| ८ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | : | कौशल्य विकासासाठी निवासी प्रशिक्षण<br>प्रशिक्षण पात्र युवक/युवतींसाठी रोजगाराची उपलब्धता |
| ९ | अर्ज करण्याची पद्धत | : | विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह खालील ठिकाणी सादर करावा :<br>नजीकचे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे कार्यालय<br>नजीकचे दीन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेचे प्रशिक्षण केंद्र<br>दीन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेचे शिबिर |
| १० | अंदाजे प्रक्रियेला लागणारा वेळ | : | अर्ज केल्यापासून कौशल्य प्रशिक्षणाची किमान १० दिवस कमाल ३ महिने |
| ११ | संपर्क कार्यालयाचे नाव व पत्ता | : | सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालये |



# स्वच्छ भारत अभियान

## स्वच्छ भारत अभियान काय आहे ?

स्वच्छ भारत अभियान हा कार्यक्रम राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये राबविला जात असून सन २०१९ पर्यंत संपूर्ण देश स्वच्छ करणे हा मुख्य उद्‌देश आहे. हा प्रकल्प लोकसहभागातून राबवायचा असून त्याची अंमलबजावणीही त्यांनीच करावयाची आहे. लोकांमध्ये स्वच्छतेविषयी जागृती निर्माण व्हावी हा यामागील प्रमुख उद्‌देश आहे. निवडलेल्या गावांतील कुटुंबांनी शौचालय बांधून त्याचा वापर करणे आवश्यक आहे. २ ऑक्टोंबर २०१४ नंतर शौचालय बांधून त्याचा वापर करणाऱ्या कुटुंबांना रु. १२००० इतके, तर त्याआधी शौचालय बांधलेल्या कुटुंबांना ४६०० रु. अनुदान आहे. शौचालयासाठी दारिद्र्यरेषेखालील सर्व कुटुंबांना तर दारिद्र्यरेषेवरील SC, ST, भूमिहीन, शेतमजूर, अल्पभूधारक, स्त्री कुटुंबप्रमुख, अपंग यांना प्रोत्साहन अनुदान बक्षीस म्हणून देण्यात येत आहे.

उघड्यावर शौचाला जाण्याच्या सवयीमुळे पाणी दूषित होऊन अनेक साथीचे रोग होतात. त्यांचा परिणाम प्रत्येक व्यक्तीच्या दैनंदिन जीवनावर होतो. तसेच आर्थिक परिस्थिती ढासळते. या सर्व त्रासापासून ग्रामीण भागातील व्यक्तींची सुटका व्हावी म्हणून शासनाकडून ग्रामीण भागातील जनतेकरिता शौचालय, अंगणवाडी बालकांकरिता स्वच्छतागृह, शाळेतील विद्यार्थ्यांकरिता विद्यार्थीसंख्येनुसार शौचालय व मुताऱ्या, मुलींसाठी स्वतंत्र शौचालय व मुताऱ्या अशा प्रकारे बांधकाम केले जाते.

## स्वच्छ भारत अभियानाचे घटक

१) स्वच्छ व शुद्‌ध पाण्याची उपलब्धता

२) वैयक्तिक स्वच्छता

३) परिसर स्वच्छता/ गावाची स्वच्छता

४) घर व अन्न पदार्थांची स्वच्छता

५) सांडपाण्याची व्यवस्था

६) घनकचऱ्याचे योग्य व्यवस्थापन

७) मानवी विष्ठेचे व्यवस्थापन (वैयक्तिक शौचालय)

## वैयक्तिक शौचालय

- २ ऑक्टोबर २०१४ नंतर शौचालय बांधून त्याचा नियमित वापर करणाऱ्या पात्र कुटुंबांना रु. १२ हजार इतके प्रोत्साहन अनुदान.
- शौचालयाचा नियमित वापर, पाणी साठवणूक व्यवस्था व वॉश बेसिन उपलब्ध असणे आवश्यक.

- प्रोत्साहन अनुदान हे बांधकामासाठी नाही, तर स्वतः शौचालय बांधून त्याचा नियमित वापर केल्यावर देण्यात येते.
- सन २०१२ मध्ये केलेल्या पायाभूत सर्वेक्षणानुसार पात्र लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान अनुज्ञेय आहे.
- सदरचे अनुदानात राज्य शासनाचा रु. ३ हजार तर केंद्र शासनाचा रू. ९ हजार इतका हिस्सा आहे.

## घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन कार्यक्रम

- स्वच्छ भारत अभियानांतर्गत निर्मलग्राम दर्जा प्राप्त झालेल्या, किमान ८० टक्के शौचालय उपलब्ध असलेल्या ग्रामपंचायतींची शासनामार्फत तयार करण्यात आलेल्या गुणांकन प्रपत्रानुसार निवड करण्यात येते.
- या कार्यक्रमांतर्गत सांडपाणी व्यवस्थापनासाठी १५० कुटुंब संख्येपर्यंतच्या ग्रामपंचायतीला रु. ७ लक्ष, १५१ ते ३०० कुटुंब संख्येपर्यंतच्या ग्रामपंचायतीला रु. १२ लक्ष, ३०१ ते ५०० कुटुंब संख्येपर्यंतच्या ग्रामपंचायतीला रु. १५ लक्ष, ५०१ च्या पुढील कुटुंबसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीला रु. २० लक्ष रुपयांपर्यंतचा निधी देण्यात येतो.
- या निधीतून सांडपाणी व्यवस्थापनांतर्गत शोषखड्डे, पाणी शुद्धीकरणाच्या अंतिम प्रक्रियेसाठी (स्थिरीकरण तळे) निधी देण्यात येतो. तर घनकचरा व्यवस्थापनांतर्गत गांडूळ खत प्रकल्प, कंपोस्ट खत प्रकल्प, नाडेप खड्डे यासाठी निधी देण्यात येतो.

## सार्वजनिक शौचालय

स्वच्छ भारत अभियानांतर्गत सार्वजनिक शौचालयांसाठी १ लक्ष ८० हजार इतका निधी देण्यात येतो. तर १० टक्के लोकवर्गणी (रु. २० हजार) जमा करण्यात येते.

सदरचे शौचालय ज्या कुटुंबाकडे शौचालयासाठी जागा उपलब्ध नाही, त्यांच्यासाठीच तसेच यात्रास्थळ, आठवडेबाजार भरणाऱ्या ग्रामपंचायत यांच्यासाठीच प्राधान्याने देण्याच्या शासनाच्या सुचना आहेत.

## अभियानाची प्रमुख उद्दिष्टे

१) देशाच्या ग्रामीण भागातील जीवनमानाची गुणवत्ता उंचावणे

२) देशाच्या ग्रामीण भागात स्वच्छता कार्यक्रमाची व्यापकता वाढविणे

३) जाणीव जागृती आणि आरोग्य शिक्षण यातून स्वच्छतेच्या सुविधांची मागणी निर्माण करणे

४) देशाच्या ग्रामीण भागातील शाळा आणि अंगणवाड्यातून स्वच्छतेच्या सुविधा निर्माण करणे. तसेच विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक शिक्षण देणे व स्वच्छतेच्या सवयी लावणे.

५) स्वच्छतेच्या कमी खर्चाच्या सुविधा निर्माण करणे आणि योग्य प्रोत्साहन देणे.

६) पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे व अन्नपदार्थांचे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी उघड्यावर मलमूत्र विसर्जन करण्याच्या पद्धतीचे निर्मूलन करणे.

## अभियानाची भूमिका

१) हे अभियान लोकाभिमुख व लोकसहभागावर आधारित करणे.

२) मागणी आधारित अंमलबजावणी.

३) वरील दृष्टिकोन स्वीकारतांना जाणीव जागृती, शाळा व घरातील वापरासाठी स्वच्छतेच्या सोयी आणि स्वच्छ पर्यावरणावर भर.

४) प्रत्येक कुटुंबांसाठी शौचालयासाठी अनुदान देण्यापेक्षा गरिबातील गरीब कुटुंबाला प्रोत्साहनपर बक्षीस.

५) ग्रामीण भागात शालेय स्वच्छता कार्यक्रम हा महत्त्वाचा घटक.

६) लोकांच्या स्थानिक गरजेप्रमाणे तांत्रिक सुधारणा, माहिती शिक्षण प्रसारावर आधारित अभियानात पंचायत राज, सहकारी संस्था, महिला मंडळ, बचत गट आणि स्वयंसेवी संस्था यांचा समावेश.

७) स्वच्छता आणि आरोग्याच्या सवयी सुधारणे आणि त्या सवयींना अनुरूप असणाऱ्या, बांधकामास परवडणाऱ्या आणि उपलब्ध होऊ शकणाऱ्या सुविधा अनेक उपलब्ध तंत्रामधून निवडून सर्व ग्रामीण स्तरावर स्वच्छता सुविधांचा योग्य वापराबाबत योग्य बदल घडवून आणणे.

## शालेय स्वच्छता व आरोग्य शिक्षण – हेतू

१) शाळेतील वातावरण स्वच्छ व आरोग्यदायी होण्यास आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणे.

२) वैयक्तिक स्वच्छता व आरोग्य तपासणी करणे व प्राथमिक रोग निदानानंतर योग्य उपचारासाठी मार्गदर्शन करणे.

३) सत्वयुक्त, संतुलित आहाराची माहिती देणे.

४) आरोग्य शिक्षणांतर्गत वैयक्तिक स्वच्छता, आपल्या घराची तसेच गावाच्या स्वच्छतेविषयी विद्यार्थ्यांना अवगत करणे.

५) शालेय स्वच्छतागृहाची देखभाल व वापर.

६) शालेय स्वच्छता मंडळाची स्थापना.

## हागणदारीमुक्त गावांची संकल्पना

१) आपले उद्दिष्ट संडास बांधणे नाही तर उघड्यावर संडासाला जाण्याची सवय नष्ट करणे आहे. प्रश्न उघड्यावरील विष्ठेचा आहे.

२) एकेकाने संडास बांधत संपूर्ण समूहाने गाव हागणदारीमुक्त करण्याचे ठरविणे हा या संकल्पनेचा प्राण आहे.

३) शौचालयासाठी अनुदान नाही, हागणदारीमुक्ती नंतर ग्रामपंचायतीला सामूहिक बक्षीस जरूर आहे.

४) दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्य रेषेवरील (एससी, एसटी, अल्पभूधारक, महिला कुटुंबप्रमुख, भूमिहीन शेतमजूर, अपंग) पात्र कुटुंबांना केवळ बक्षीस, तेही शौचालय बांधून वापर झाल्यानंतर व त्याचा नित्य वापर केल्यास रुपये १२००० प्रोत्साहनपर अनुदान.

५) शौचालय हे काही घराचे भूषण नाही, तर घरातल्यांची सवय आहे. ते कुटुंबाने स्वखर्चाने कष्टपूर्वक बांधल्याशिवाय वापरले जाणार नाही

६) हागणदारीमुक्त गाव म्हणजे निर्मळगाव. हे गावाचे भूषण आहे.

वैयक्तिक शौचालय बांधकाम पूर्ण झाल्यानंतर व त्याचा वापर करत असल्याचे प्रस्ताव ग्रामपंचायत मार्फत पंचायत समितीला सादर केल्यानंतर रू. १२०००/– रक्कम लाभार्थ्याचे खातेवर प्रोत्साहनपर अनुदान म्हणून दिले जाते.

## निकष

१. लाभार्थी हा अनुसूचित जाती / जमाती/सिमांत शेतकरी / अल्पभूधारक / स्त्री कुटुंब प्रमुख/ दिव्यांग इ. प्रवर्गाचा असावा.

२. त्याने यापूर्वी शौचालय अनुदान / प्रोत्साहनपर अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा.

ग्रामीण भागत स्वच्छ भारत मिशन अंतर्गत अतिक्रमण बाधीत जमिनीवर वास्तव्यास राहत असणाऱ्यास शौचालयाचा लाभ देता येतो (संदर्भ : पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग क्र. स्वभामी २०१६/प्रक्र.१०८/पाणीपुरवठा– ०८ दि. १७ मे २०१६) .

# प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना

शेती हा व्यवसाय अधिक फायदेशीर व्हावा, शेतकऱ्यांची जोखीम कमी व्हावी तसेच आधुनिक कृषी तंत्राला प्रोत्साहन मिळण्यासाठी खात्रीपूर्वक व संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेमध्ये सन २०१५-१६ पासून 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना' या समाविष्ट केली आहे. प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतास पाण्याची उपलब्धता करणे आणि पाण्याची कार्यक्षमता वाढवून पाण्याच्या प्रत्येक थेंबातून जास्तीत जास्त पीक उत्पादन मिळविणे (more crop per drop) हा या योजनेचा उद्देश आहे.

### योजनेची व्याप्ती

राज्यातील सर्व ३४ जिल्ह्यांमध्ये पंतप्रधान कृषी सिंचन योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन योजना राबविण्यात येत आहे.

### योजनेची उद्दिष्टे

- आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सूक्ष्म सिंचनाखालील क्षेत्रात वाढ करणे.
- जलवापर कार्यक्षमतेत वाढ करणे.
- कृषी उत्पादन आणि पर्यायाने शेतकऱ्यांच्या एकूण उत्पन्नात वृद्धी करणे.
- समन्वयित पद्धतीने विविध योजनांची अंमलबजावणी करणे.
- आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कृषी व फलोद्यानाचा विकास करण्यासाठी सूक्ष्म सिंचन पद्धती विकसित करणे, त्याची वृद्धी व प्रसार करणे.
- कुशल व अर्धकुशल बेरोजगारांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

### योजनेत अंतर्भूत घटक

**ठिबक सिंचन:** इनलाईन, ऑनलाईन, सबसरफेस, मायक्रोजेट, फॅनजेटस.

**तुषार सिंचन:** मायक्रो स्प्रिंकलर, मिनी स्प्रिंकलर, पोर्टेबल स्प्रिंकलर व रेनगन.

### अनुदान मर्यादा

- अवर्षणप्रवण क्षेत्रातील अल्प व अत्यल्प भूधारक- ६० टक्के
- अवर्षणप्रवण क्षेत्रातील सर्वसाधारण भूधारक- ४५ टक्के
- अवर्षणप्रवण क्षेत्राबाहेरील अल्प व अत्यल्प भूधारक-४५ टक्के
- अवर्षणप्रवण क्षेत्राबाहेरील सर्वसाधारण भूधारक-३५ टक्के

# सांसद आदर्श ग्राम योजना

सांसद आदर्श ग्राम योजना (Sansad Adarsh Gram Yojana लघुरूप: SAGY) हा एक ग्रामीण विकास कार्यक्रम आहे. ज्याचे लक्ष्य खेड्यांना विकसित करणे आहे. त्यात, सामाजिक विकास, सांस्कृतिक, विकास व खेड्यातील समाजात जागरूकता आणणे याचा अंतर्भाव आहे.

हा कार्यक्रम दि.११ ऑक्टोबर २०१४ ला जयप्रकाश नारायण यांच्या वाढदिवशी सुरू करण्यात आला.

### या योजनेचे वैशिष्ट्ये म्हणजे ही:

(अ) मागणीनुसार सुरू होणारी

(ब) समाजातर्फे उद्युक्त

(क) लोकांच्या सहभागावर आधारित आहे.

### ध्येये

या योजनेची खालील प्रमाणे ध्येये आहेत:

१. सध्या अस्तित्वात असलेल्या योजना व स्थानिक संदर्भ प्राथम्य वापरून 'आदर्श ग्राम' म्हणून गावांचा विकास करणे, ज्यात गावागावाप्रमाणे बदल होऊ शकतो.

२. स्थानिक विकासाचा नमुना तयार करणे. ज्याचा वापर इतर खेड्यात होऊ शकतो.

### योजनेचे महत्त्वपूर्ण पैलू :

१. **व्यक्तिगत विकास :** दारूमुक्त समाज, नैतिक मूल्ये, स्वच्छ वर्तन, दररोज व्यायाम, श्रम, प्रतिष्ठा आणि प्रसार स्वयंसेवा, महिलांच्या बद्दल आदर, वैयक्तिक विकास.

२. **मानव विकास :** संतुलित स्त्री-पुरूष गुणोत्तर प्रमाण, कुपोषण मुक्ती, सर्वांना प्राथमिक शिक्षण आणि दहावीपर्यंत शिक्षणाची हमी, सर्वांसाठी आरोग्य सुविधा, स्मार्ट शाळा, आयटी वर्गखोल्या, ई-लायब्ररी, ई-साक्षरता

३. **सामाजिक विकास :** स्वयंसेवा, गावातील वडीलधारी मंडळी, स्वातंत्र्य सैनिक ह्यांचा सन्मान, हिंसा आणि गुन्हेगारी मुक्त गाव, अनुसूचित जाती/जमातीच्या गटांचे मुख्य समाज प्रवाहात समावेशन.

४. **आर्थिक विकास :** वैविध्यपूर्ण शेती, दुग्ध व्यवसाय व पशुधन, सेंद्रिय शेती, माती, आरोग्य कार्ड, सूक्ष्म सिंचन, ग्रामीण औद्योगिकरण, कापणी नंतरचे पीक तंत्रज्ञान, अन्न प्रक्रिया, इको-पर्यटन

५. **पर्यावरण विकास :** वृक्षारोपण, पावसाच्या पाण्याची साठवणूक, पाणलोट विकास, प्रत्येक कुटुंबासाठी शौचालय.

६. **पायाभूत सुविधा :** नळामार्फत पिण्याचे पाणी, मुख्य रस्ता, २४ X ७ दिवस सर्व घरांसाठी वीज पुरवठा, ब्रॉडबॅण्ड कनेक्शन, एटीएममुक्त मिनीबँक

७. **सुशासन :** ई-गव्हर्नन्स, ऑनलाईन प्रमाणपत्र, सर्व सहमतीने निवडणूका

# सर्व शिक्षा अभियान (SSA)

''शिक्षणाशिवाय माणूस म्हणजे निव्वळ पशू होय. उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस बलहीन होऊन अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो.''

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

## सर्वांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९

स्वातंत्र्यपूर्व काळात समाजातील अगदी तळागाळातील लोकांना शिक्षण मिळण्याचा आग्रह महात्मा फुल्यांनी धरला. शिक्षणाचे महत्त्व फार पूर्वीच समाजसुधारकांनी ओळखले होते. समाजातील शिक्षणाची गंगा वाहावी यासाठी अनंत अडचणी सोसून, पदरमोड करून त्यांनी प्रयत्न केले. हे कार्य स्वातंत्र्यानंतरही सुरूच राहिले. स्वातंत्र्यापूर्वी नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी सर्वप्रथम सर्वांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी कायदा करण्याची मागणी तत्कालीन ब्रिटिश सरकारकडे केली. स्वातंत्र्यापूर्वी सुरू झालेला हा शिक्षण हक्क कायद्याच्या मागणीचा प्रवास २००९ साली सुफळ झाला. भारत सरकारने २००९ साली शिक्षण हक्क कायदा संमत केला व एप्रिल २०१० पासून तो जम्मू काश्मीर वगळता सर्व देशभर लागू झाला. मुलांना कोणकोणत्या सुविधा मिळायला हव्यात, मुलांपर्यंत चांगले शिक्षण कसे पोहोचवावे याबाबत पुष्कळ तरतुदी या कायद्यात केल्या आहेत. त्यातील प्रमुख तरतुदी यामध्ये दिल्या आहेत, त्या समजून घेऊन या कायद्याच्या आधारे आपापल्या गावातील मुलांना दर्जेदार प्राथमिक शिक्षण मिळण्याचा आग्रह धरणे आता नागरिकांच्या हातात आहे.

शिक्षण हक्क कायदा अंमलात येण्यापूर्वी 'सर्व शिक्षा अभियान' या अत्यंत महत्वाकांक्षी योजनेद्वारे शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे काम भारत सरकारने २००१ पासून सुरु केले हाते. सर्व मुलांना शाळेत दाखल करणे, उच्च प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मुले शाळेत नियमित येत आहेत याची खात्री करणे, प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावरील मुलांच्या शिक्षणाचा दर्जा उंचावणे, शिक्षणामधील लैंगिक व सामाजिक भेद दूर करणे हे सर्व शिक्षा अभियानाचे प्रमुख उद्देश होते. शिक्षण हक्क कायदा अस्तित्वात आल्यानंतर आता शिक्षण हक्क कायदयामधील तरतुदींची पूर्तता करण्यासाठीचा निधी सर्व शिक्षा अभियानामार्फत उपलब्ध करून दिला जातो.

## बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ मधील काही महत्त्वाच्या तरतुदी

शिक्षण हा प्रत्येक माणसाचा मूलभूत अधिकार आहे ही आता जागतिक पातळीवर मान्य झालेली गोष्ट आहे. आंतरराष्ट्रीय संघटनांच्या, तसेच इतर अनेक देशांच्या विविध धोरणात्मक दस्ताऐवजांमध्ये शिक्षण अधिकाराचा अंतर्भाव आढळतो. भारतामध्येही आता या कायद्याद्वारे सर्व बालकांना शिक्षणाचा अधिकार आहे हे मुळातून मान्य केले गेले आहे.

१. इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतचे शिक्षण, ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत मिळेल. मात्र हे मोफत शिक्षण सर्व सरकारी शाळांमध्ये, तसेच खाजगी अनुदानित शाळांमध्येच मिळेल.

२. मोफत म्हणजे अ) कोणत्याही प्रकारचे शुल्क नाही आ) गणवेश, पाठ्यपुस्तके, लेखन साहित्य मोफत इ) इयत्ता आठवीपर्यंतचे शिक्षण घेण्यास अडथळा येईल अशा कोणत्याही खर्चापासून मुक्ती.

३. विनाअनुदानीत खाजगी शाळांमध्ये मोफत शिक्षणासाठी २५ % जागा राखीव असतील. या राखीव जागांवर वंचित व

दुर्बल समाज घटाकातील बालकांना प्रवेश मिळेल. या २५ % मध्ये प्रवेश घेतलेल्या बालकांचे शुल्क सरकार भरेल.

(वंचित गट म्हणजे अनुसूचित जाती व जमाती. दुर्बल गट म्हणजे, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, राज्य शासनाने असूचित केलेले धार्मिक अल्पसंख्य व ज्या बालकांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा कमी आहे असे समाजघटक)

४. कोणत्याही शाळेमधील प्रवेशासाठी देणगी घेता येणार नाही तसेच चाळणी पद्धत वापरता येणार नाही.

५. सक्ती ही शासनावर आहे, तर आपल्या मुलांना शाळेत दाखल करणे हे पालकांचे कर्तव्य आहे.

६. शासनावर सक्ती पुढील गोष्टींची

- प्रत्येक बालकास मोफत शिक्षण मिळत असल्याची खात्री करणे.
- बालकांच्या जवळच्या अंतरावर शाळा उपलब्ध करून देणे.
  - इयत्ता १ ते ५ मध्ये शिकणाऱ्या बालकांसाठी १ किमी च्या परिसरात, तसेच इयत्ता ६ ते ८ वी मध्ये शिकणाऱ्या बालकांसाठी ३ किमी च्या परिसरात अशी शाळा असणे आवश्यक.
  - विद्यार्थी संख्या पुरेशी नसल्याने (२० पेक्षा कमी बालके असतील तर) ज्या लहान वाड्यांमधील बालकांसाठी वरील अंतरात शाळा नसेल तर, अशा बालकांसाठी मोफत वाहतूक सुविधा, निवास सुविधा तसेच अन्य आवश्यक सुविधा शासन उपलब्ध करून देईल.
- शाळेमध्ये सोयी व सुविधा उपलब्ध करून देणे.
  - प्रत्येक शिक्षकामागे एक वर्गखोली उपलब्ध करून देणे.
  - विकलांग मुलामुलींना शाळेत येणे सुकर होण्यासाठी उतार (रॅम्प) व तत्सम सोयी करणे.
  - मुले व मुली यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छतागृह बांधणे.
  - स्वच्छ व पुरेशा पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देणे.
  - माध्यान्ह भोजन शिजविण्यासाठी स्वतंत्र स्वयंपाक खोली उपलब्ध करून देणे.
  - मैदान उपलब्ध करून देणे.
- शाळेमध्ये शिक्षक व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे.
- शिक्षकांना प्रशिक्षण देणे.
- अभ्यासक्रम वेळेत उपलब्ध करून देणे.
- ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकास शाळेत दाखल करून घेणे, त्यांच्या नियमित हजेरीची खातरजमा करणे आणि बालके शिक्षण पूर्ण करत आहेत हे पाहणे.
- वंचित व दुर्बल घटकातील बालकांच्या बाबतीत शाळेत व शिक्षण देण्यात भेदभाव होत नाही हे पाहणे.
- वयानुरूप दाखल झालेल्या मुलांना विशेष शिक्षण पुरविणे.

म्हणजेच जर एखादे ९ वर्षांचे बालक पूर्वी कधीच शाळेत गेले नसेल तरी त्यास त्याच्या वयास योग्य अशा तिसरीच्या वर्गात प्रवेश देणे व त्या बालकाला तिसरीच्या क्षमतेपर्यंत आणण्यासाठी विशेष शिक्षण देणे.

७. दाखला नाही, जन्म प्रमाणपत्र नाही, शैक्षणिक वर्ष सुरू झाले अशा कोणत्याही कारणाने बालकाचा शाळा प्रवेश थांबविता येणार नाही.

८. अंध, अस्थिव्यंग, मतिमंद, कर्णबधीर, बहुविकलांग अशा विशेष गरजा असलेल्या बालकांनाही जवळच्या शाळेत शिकण्याचा अधिकार आहे. या बालकांच्या शिक्षणासाठी सरकारने वाहन सोय, विद्यावेतन, लेखनिकाची सोय आणि आवश्यक अशा इतर सोयी करणे आवश्यक आहे.

९. बालकांना शारीरिक व मानसिक त्रास देता येणार नाही.

१०. बालकांना नापास करता येणार नाही तसेच कोणत्याही कारणास्तव शाळेतून काढून टाकता येणार नाही.

नापास करता येणार नाही याचा अर्थ, मुलांना तसेच पुढच्या इयत्तेत ढकलावे असा होत नाही, तर त्या त्या इयत्तेच्या क्षमतांपर्यंत बालकांना आणून मग पुढच्या इयत्तेत दाखल करण्याची जबाबदारी शाळा व शिक्षकांवर आहे.

शाळा उभारणी, शाळा इमारतीची दुरुस्ती, शाळेतील मुलांसाठीचे वाचनालय, इतर सुविधा, शिक्षक प्रशिक्षण, शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे प्रशिक्षण इत्यादी ज्या खर्चाच्या बाबी आहेत, त्याची तरतूद सर्व शिक्षा अभियानामार्फत होते.

**११. शिक्षकांची कर्तव्ये :**

- शाळेत नियमितपणे व वक्तशीरपणे हजर राहणे.
- प्रत्येक बालकाच्या अध्ययन क्षमतेचे मूल्यमापन करणे
- अभ्यासात मागे असणाऱ्या बालकांना जास्तीचे मार्गदर्शन करणे.
- पालकांसोबत नियमित सभा घेणे.
- बालकांची हजेरी, अध्ययन क्षमता, अध्ययनातील प्रगती याबाबतची माहिती पालकांना देणे.
- आनंददायी व नावीन्यपूर्ण पद्धतींचा अध्यापनात वापर करणे.
- शाळाबाह्य बालकांचा शोध घेऊन त्यांना शाळेत दाखल करणे व त्यांना विशेष प्रशिक्षण देणे.
- वर्षभरात केव्हाही शाळेत दाखल झालेल्या बालकांना वर्गात सामावून घेणे व त्यांचा अभ्यास भरून काढण्यासाठी प्रयत्न करणे.

**१२. शिक्षकांचे कामाचे तास :**

शिक्षकांनी आठवड्याला ४५ तास काम करायचे आहे. म्हणजे सोमवार ते शुक्रवार ८ तास व शनिवारी ५ तास असे ढोबळपणे तासांचे विभाजन होते. या ४५ तासांपैकी ३० तास वर्ग अध्यापन व १५ तास मुलांसाठी जास्तीचे वर्ग, मूल्यमापन नोंदी, पूर्वतयारी, टाचण काढणे या कामांचा समावेश होतो.

**१३. शाळा व्यवस्थापन समिती :**

आपल्या मुलांच्या चांगल्या शिक्षणसाठी पालक जागरूक असतात हे लक्षात घेऊन शाळेच्या कामकाजावर पालकांचे लक्ष असावे यासाठी प्रामुख्याने पालकांचा समावेश असलेली शाळा व्यवस्थापन समितीची तरतूद शिक्षण हक्क कायद्यात केली गेली आहे. विनाअनुदानीत खाजगी शाळा सोडून इतर सर्व प्रकारच्या शाळांसाठी ही शाळा व्यवस्थापन समिती घटित होईल. या समितीस काही अधिकार देण्यात आले आहेत.

### शाळा व्यवस्थापन समितीचे कार्य :

- शाळेच्या कामकाजावर देखरेख ठेवणे.
- शिक्षक नियमित, वेळेवर शाळेत येत आहेत ना, ते आपली कर्तव्ये पर पाडत आहेत ना याची खात्री करणे.
- शाळाबाह्य, विकलांग बालकांचा शोध घेऊन त्यांना शाळेत दाखल करण्यास शाळेस मदत करणे.
- शाळेच्या जमा-खर्चाचा वार्षिक लेखा तयार करण्याची व्यवस्था करणे.
- शाळा विकास आराखडा तयार करणे (ही अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे.)
- शिक्षक बालकांना त्या त्या वर्गाच्या अध्ययन क्षमतेपर्यंत आणत आहेत, आवश्यक तेथे जास्तीचे वर्ग घेत आहेत यावर लक्ष ठेवणे.
- शालेय विद्यार्थ्यांसाठी असलेली शालेय पोषण आहार योजना तसेच अनुदानाच्या इतर योजना यांची अंमजबजावणी सुरळीतपणे पार पडते आहे यावर देखरेख ठेवणे.

आपल्या गावातील शाळा दर्जेदार होण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती सर्व बाजूंनी प्रयत्न करू शकते.

- **राज्य बालहक्क संरक्षण आयोग:**

  मुलांना शाळेत दर्जेदार शिक्षण मिळत नसेल किंवा आठवीपर्यंतच्या शिक्षणाविषयी इतर काही तक्रारी असतील तर कोणतीही व्यक्ती, संस्था, मुले आणि शाळा व्यवस्थापन समिती थेट राज्य बालहक्क आयोगाकडे लेखी स्वरूपात तक्रार करू शकते. लेखी तक्रार पाठविण्यासाठी पत्ता **राज्य बालहक्क संरक्षण आयोग, तिसरा मजला, परिवहन भवन, सर पोचखानवाला रस्ता, वरळी, मुंबई ४०००३२.**

- **पंचायत समिती सदस्यांच्या माध्यमातून पंचायत समितीच्या मासिक बैठकीत :**

  आपापल्या विभागाचे पंचायत समिती सदस्य कोण आहे याची माहिती करून घ्यावी. आपले गाऱ्हाणे त्यांच्याकडे नेऊन त्या प्रश्नाचा सतत पाठपुरावा करावा. पंचायत समितीच्या मासिक बैठकीमध्ये पंचायत समिती सदस्य व सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित असतात. या सभेमध्ये प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार पंचायत समिती सदस्यांना असतो. आपल्या वतीने या सभेत ते प्रश्न विचारू शकतात, समस्या मांडू शकतात.

- **उच्च न्यायालयास थेट पत्र लिहून :**

  समस्या सुटण्यास जर उशीर लागत असेल, अथवा अडचणी येत असतील तर ती समस्या थेट उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींकडे पत्र लिहून पाठविता येते. पत्रासोबत आपण केलेल्या प्रयत्नांचे सर्व पुरावे, पत्रासोबत जोडावेत, संबंधित कागदपत्रांच्या प्रती जोडाव्यात आणि आपण ज्या उच्च न्यायालयाच्या कक्षेत येतो त्या न्यायालयास पाठवून द्यावे. पत्ते

पत्ते पुढीलप्रमाणे.

- मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर
- मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद
- मुख्य न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई ४०००३२

## समारोप :

शिक्षणाशिवाय सन्मानपूर्वक जगण्याच्या प्रत्येक नागरिकाच्या हक्काची पूर्तता होऊ शकत नाही, हे जाणून सर्वोच्च न्यायालयाने १९९३ साली एका ऐतिहासिक निकालाद्वारे शिक्षण जगण्याच्या अधिकाराशी जोडले. त्यानुसार राज्यघटना दुरुस्ती होऊन शिक्षणाचा मूलभूत अधिकारात समावेश झाला. आजच्या आधुनिक युगामध्ये शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. दर्जेदार शिक्षण सर्व मुलांपर्यंत पोहचून त्यांना सन्मानपूर्वक जगण्याचा अधिकार प्राप्त होण्यासाठी पालक या नात्याने तसेच नागरिक या नात्यानेही प्रयत्नशील राहणे हे आपले परम कर्तव्य आहे.

# राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM)

### राष्ट्रीय ग्रामीण आरोग्याची संकल्पना कशी तयार झाली ?

सर्वांना सहजसाध्य, परवडणारी, कार्यक्षम, उत्तरदायी आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात १२ एप्रिल २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरू केले आहे.

भारताने  मृत्यू दर कमी करण्यात यश मिळवले आहे. तसचे माता व अर्भक मृत्यू दरातही घट झाली आहे. ही प्रगती लक्षात घेतली तरीही ग्रामीण भागात नियंत्रण करता येण्यासारखे संसर्गजन्य किंवा साथीच्या आजारांचा फैलाव आणि मृत्यू, गुंतागुंतीच्या प्रसूती तसेच कुपोषणात वाढ अशा अनेक समस्या आजही भेडसावत आहेत. याशिवाय असंसर्गजन्य रोग उदाहरणार्थ हृदयरोग, मधुमेह, कर्करोग, मानसिक आजार, इ. अशा दुर्धर आजारांमुळे देशातील आरोग्य सेवेवर प्रचंड ताण पडत आहे. अर्भक मृत्यू आणि दुर्धर आजाराने मृत्यू यामुळे भारताची मोठी आर्थिक व मनुष्यबळाची हानी होत आहे.

आपल्या देशात खाजगी स्तरावरील आरोग्य सेवेचा खर्च जास्त आहे आणि तो सामान्य जनतेला न परवडणारा आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य सेवेचा उपचारात्मक सेवांवर म्हणजे रुग्णालयामधून रोग्यावर उपचारांसाठी होणारा खर्च जास्त असून प्रतिबंधात्मक सेवांवर होणारा खर्च कमी आहे. प्रतिबंधात्मक सेवा म्हणेजच आजार होऊ नयेत म्हणून उपाययोजना करणे. उदाहरणार्थ आरोग्य शिक्षण. आठवड्यातून एक दिवस पाण्याची भांडी कोरडी ठेवली असता डासांची पैदास होत नाही आणि त्यातून डासांमार्फत होणारे आजार टाळता येतात. सार्वजनिक आरोग्य सेवा सहज उपलब्ध असणे आणि त्या सेवा कार्यक्षम, उत्तरदायी व गुणवत्तापूर्ण करणे गरजेचे आहे या भावनेतून देशातील आरोग्य अभियान संकल्पनेचा विकास झाला. (**प्रतिबंधात्मक :** आजार होऊ नये म्हणून अगोदर करण्याच्या उपाययोजना. **उपचारात्मक :** आजार झाल्यावर केले जाणारे उपचार व त्यासाठी असलेल्या उपाययोजना )

### १. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान कशासाठी ?

- देशातील ग्रामीण भागातील जनतेस सहज उपलब्ध होतील अशी गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे.
- देशाच्या एकूण खर्चात आरोग्य क्षेत्रावरील खर्चात वाढ करणे.
- योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे व सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण करणे.
- देशातील ग्रामीण भागातील जनतेस विशेषत: स्त्रिया व बालके यांना सहजसाध्य, परवडण्याजोगी, कार्यक्षम उत्तरदायी व विश्वासार्ह प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे.
- प्रगतीच्या दृष्टीने उद्दिष्टे ठरविणे आणि तसा सार्वजनिक अहवाल सादर करणे.

### २. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत असलेले कार्यक्रम :

### २.१ मनुष्यबळ उपलब्ध करणे :

मनुष्यबळ उपलब्ध करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत काही नियुक्ती ठरविण्यात आल्या. त्यात गाव

पातळीवर आशा स्वयंसेविकेची योजना केली आहे तर प्राथमिक आरोग्य केंद्रात व उपकेंद्रात प्रत्येकी एक परिचारिका म्हणजेच ए. एन. एम. (Auxiliary Nurse Midwife) तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रात स्त्री परिचारिका (LHV Lady Health Visitor) नियुक्त केली आहे.

### २.१.१ आशा (ASHA):

आशा ही गावातील स्थानिक रहिवासी असल्याने, तिला स्थानिक भाषा येत असल्याने तिला गावच्या आरोग्य विषयक अडचणी समजून घेता येतील. विशषत: स्त्रिया आणि मुलांच्या आरोग्याबाबत अडचणी समजून त्यांना मदत करण्यामध्ये आशाचे महत्त्वपूर्ण योगदान अपेक्षित आहे. याकरिता योग्य व्यक्तींची आशा म्हणून निवड होणे आवश्यक असते. आशाची निवड ग्रामसभेच्या माध्यमातून होते. ग्रामसभेला योग्य व्यक्तीची निवड करता यावी यासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत काही नियम (निकष) ठरवून देण्यात आले आहेत. हे निकष पूर्ण करणारी व्यक्ती आशा स्वयंसेविका म्हणून निवडून येण्यास पात्र होते.

आशा स्वयंसेविकेची निवड प्रक्रिया अशी केली जाते –

- आशा स्वयंसेविका आदिवासी क्षेत्रात किमान आठवी उत्तीर्ण तर बिगर आदिवासी क्षेत्रात किमान १० वी उत्तीर्ण असलेली स्थानिक विवाहित महिला असावी. उच्च शिक्षित महिलांना प्राध्यान्य देण्यात यावे. तिचे वय आदिवासी क्षेत्रात साधारणत: २० ते ४५ असावे तर बिगर आदिवासी क्षेत्रात २५ ते ४५ असावे.
- आदिवासी क्षेत्रात ग्रामसभा किंवा ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीकडून ५ आशांची निवड करण्यात येते. त्यापैकी तालुका आरोग्य अधिकारी यांचेकडून एका आशा स्वयंसेविकेची निवड करण्यात येते व तालुका आरोग्य अधिकारी यांच्या स्वाक्षरीने निवडलेल्या आशा स्वयंसेविकेस नियुक्ती पत्र देण्यात येते.
- तसेच बिगर आदिवासी क्षेत्रात ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष, ग्रामसेवक, वैद्यकीय अधिकारी यांची समिती आशा स्वयंसेविका पदाकरिता प्राप्त अर्जांची छाननी करून ग्रामसभेत ३ अर्ज सादर करते व ग्रामसभा ३ अर्जांपैकी एका अर्जदार महिलेची निवड आशा स्वयंसेविका म्हणून करते. त्यानंतर ग्रामसभा सदर प्रस्ताव तालुका आरोग्य अधिकारी यांचेकडे पाठवते. तालुका आरोग्य अधिकारी त्या महिलेस आशा स्वयंसेविका म्हणून नियुक्ती पत्र देतात.
- आदिवासी क्षेत्रात १००० लोकसंख्येस १ तर बिगर आदिवासी क्षेत्रात १५०० लोकसंख्येस १ या प्रमाणात आशा स्वयंसेविकेची निवड करण्यात येते.

### आशा स्वयंसेविकेची भूमिका आणि जबाबदाऱ्या :

आशा स्वयंसेविका ही गावाची कार्यकर्ती या नात्याने काम करणे अपेक्षित आहे. प्रामुख्याने गावाची आरोग्य सेवांपर्यंत पोहोच वाढविण्यासाठी संदर्भसेवा देण्यात तिची महत्त्वाची भूमिका आहे. आरोग्य संस्थेतील प्रसूतींमध्ये वाढ करणे, कुटुंब नियोजनासाठी जागृती व गर्भनिरोधकांचे वाटप करणे तसेच माता व बाल आरोग्य विषयी प्रबोधन उदा. प्रसूतिपूर्व तपासणी, लसीकरण, स्तनपान, लोकयुक्त गोळ्या, आहार इत्यादी. याच बरोबर साध्या (किरकोळ) आजारावर उपचार उदा. ताप, खोकला, यावर औषधोपचार करणे तसेच मलेरिया, क्षयरोग, साथीचे रोग यांच्यावरील उपचारांमध्ये मदत करणे ही आशाची जबाबदारी आहे. जन्म व मृत्यू नोंदणीमध्ये तिचा महत्त्वाची

भूमिका आहे. तसेच ग्राम आरोग्य पोषण दिनामध्ये ए. एन. एम. ला मदत करणे या भूमिका अपेक्षित आहेत.

### २.१.२ नर्स ताई ANM (Auxiliary Nurse Midwife)

प्राथमिक आरोग्य केंद्राने २४ तास आरोग्य सेवा देण्याचे अपेक्षित आहे, विशेषत: स्त्रिया आणि मुलांना आरोग्य सेवा देणे अपेक्षित आहे. प्रत्येक जिल्ह्यातील काही प्राथमिक आरोग्य केंद्रे २४ तास (२४ X ७) कार्यरत असतात. अशा आरोग्य केंद्रात अतिरिक्त परिचारिका उपलब्ध करण्यात आली आहे.

## २.२ ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती (Commoditization of health care system: VHNSC):

या अभियाना अंतर्गत प्रत्येक गावातील ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे रूपांतर ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमध्ये करण्यात आले. या समितीचे अध्यक्ष आणि अंगणवाडी सेविका यांच्या नावे सयुंक्त खाते उघडण्यात येते. या समितीच्या कार्यक्षेत्रात त्या महसूली गावाच्या हद्दीतील सर्व गावे, वाड्या, वस्त्या, पाडे येतील. ही समिती गावातील नागरिकांच्या आरोग्यविषयी नियोजन, देखरेख, अंमलबजावणीच्या कामांसाठी कार्य करेल.

## २.३ मुक्त निधी (Untied Funds) (विशिष्ट लेखा शीर्षाचे बंधन नसलेला निधी)

या प्रकारच्या निधीला अबंधित म्हणजेच ज्यावर बंधन नसलेला असे म्हणता येईल. रुग्णालयाच्या किरकोळ स्वरूपाच्या दुरुस्ती, रुग्ण तपासणीसाठी पडद्याची आवश्यकता असल्यास खरेदी, पिण्याच्या पाण्यासाठी नळदुरुस्ती, ट्यूब, बल्ब इ. सारखी स्थानिकरित्या होणारी कामे. साधारणपणे प्रत्येक रुग्णालयाच्या गरजा वेगळ्या असतात. त्यानुसार या निधीचा वापर करता यावा यासाठी या निधीला अबंधित अनुदान म्हटले आहे. या निधीतून रुग्ण तपासणीसाठी लागणारे फर्निचर व साहित्याची दुरुस्ती- लाईट व टेलिफोनसाठी आवश्यक असल्यास तात्पुरती व्यवस्था तसेच बाळंतपणानंतर लेबर रूमच्या स्वच्छतेसाठी लागणाऱ्या किरकोळ गोष्टी, रुग्णास अतिदक्षतेच्या वेळेस वाहतूक खर्च (Referral Transport) किंवा किरकोळ स्वरूपाच्या वापरातील वस्तुंवरील खर्च.

## २.४ रुग्ण कल्याण समिती (RKS)

रुग्ण कल्याण समिती जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा, ग्रामीण रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी स्थापन करण्यात आली आहे. या समितीचा मुख्य उद्देश आरोग्य संस्थांना येत असलेल्या अडचणी दूर करणे व जास्तीत जास्त गुणवत्तापूर्ण सुविधा देणे असा आहे. या समित्या धर्मादाय आयुक्त कायद्यानुसार स्थापन झालेल्या आहेत. या समितीची रचना कशी असावी, त्याचे सदस्य कोण असतील हे प्रत्येक आरोग्य केंद्रासाठी ठरवून दिलेले आहे. उदाहणार्थ, त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या सामाजिक संस्थेचा प्रतिनिधी, वैद्यकीय अधिकारी, सरपंच किंवा ग्रामसेवक इ. अशा समित्या संदर्भसेवा रुग्णालये, सामान्य रुग्णालये, क्षयरोग रुग्णालये, कुष्ठरोग रुग्णालये, मनोरुग्णालये येथे समिती स्थापन केलेल्या आहेत. या समिती अंतर्गत असलेला निधी कसा खर्च करावा हे ही समिती ठरवते. तसेच हा निधी प्रत्येक संस्थेच्या गरजेनुसार, रुग्णांच्या कल्याणासाठी, रुग्णांना सुविधा पुरविण्यासाठी खर्च करण्यात येतो.

## २.५ वार्षिक देखभाल दुरुस्ती अनुदान (AMG - Annual Maintenance Grant) :

रुग्णालयाची इमारत तसेच निवासस्थाने, परिसर, रुग्णालयातील उपकरणे, फर्निचर, कार्यालयीन वस्तू यांच्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती यासाठी ह्या निधीचा विनियोग अपेक्षित आहे. आरोग्य सेवेसाठी दरमहा ठरावीक रक्कमेवर एक इलेक्ट्रीशियन, प्लंबर व सुतार यांना कंत्राट देऊन, त्यांनी महिन्यातून दोन वेळा आरोग्य संस्थेस भेट देऊन मुख्य इमारत, निवासस्थने इ. मधील आवश्यक गोष्टींची दुरुस्ती करावी. तसेच कार्यालयीन उपकरणे उदा. संगणक, प्रिंटर यांची देखभाल यासाठी हा निधी वापरला जाणे अपेक्षित आहे.

## २.६ महत्त्वाच्या सुविधांची तरतूद –दळण वळण सुविधा (Provision of important facilities-Mobility support)

या योजने अंतर्गत रुग्णांना योग्य वेळी योग्य ठिकाणी पाठविले जाते. तसेच लसीची वाहतूक व देखरेखही केली जाते. या सेवेचा उपयोग अतिदक्ष रुग्णांना हलविण्यासाठी, प्रसूतीच्या काळात महिलांना आरोग्य सेवेपर्यंत पोचविण्यासाठी तसेच नियमितपणे रुग्णांची ने– आण करण्यासाठी होतो. सध्या कार्यरत असणाऱ्या रुग्णवाहिकेची दुरुस्ती, पेट्रोल व देखभाल करण्यासाठी आणि ड्रायव्हरची उपलब्धता करण्यासाठी जर पुरेसा निधी उपलब्ध नसेल तर तो रुग्ण कल्याण समितीमधून उपलब्ध केला जातो. जेणेकरून २४ तास रुग्णवाहिका उपलब्ध व्हावी. तसेच जिथे अशी सोय नसेल तिथे रुग्णवाहिका पुरविणे.

## २.७ जननी सुरक्षा योजना (JSSK)

माता मृत्यू आणि अर्भक मृत्यू कमी करणे या उद्देशाने ही योजना तयार केली आहे. त्यासाठी प्रसूती पूर्वी, प्रसूती दरम्यान आणि प्रसूतीनंतर मोफत सेवा देणे तसेच नवजात बाळाला ३० दिवसांपर्यंत मोफत सेवा दिली तर हे उद्दिष्ट साध्य व्हायला मदत होईल. या योजनेअंतर्गत सर्व माता आणि अर्भकांना सरकारी रुग्णालयात मोफत सुविधा मिळतात. सिझेरियन शस्त्रक्रिया, औषधे, विविध तपासण्या, गरज पडल्यास रक्त पुरवठा, वाहन व्यवस्था, तसेच प्रसुतीनंतर मातेला आहार या सर्व गोष्टी शासनाकडून मोफत मिळतात. इतकेच नव्हे तर या योजनेअंतर्गत मातेला रुग्णालयातून घरी पोचविण्याची सुविधाही मोफत देणे अपेक्षित आहे. तसेच या योजनेअंतर्गत याच सर्व सेवासुविधा जन्मलेल्या बाळाला पहिल्या ३० दिवसांत मोफत मिळतात.

## २.८ शालेय आरोग्य कार्यक्रम (School Health Program) :

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रम राबविला जातो. यामध्ये ग्रामीण भागातील पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते. यामध्ये वस्ती शाळा, पर्यायी शिक्षण केंद्रात शिकणारी मुले, संस्थांच्या शाळा तसेच आश्रम शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांचीही तपासणी केली जाते. यामध्ये २ डॉक्टरांची (१ स्त्री व १ पुरुष) आणि एक फार्मासिस्ट यांची टीम असून त्यांना एक गाडी देण्यात आली आहे. यात प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक तपासणी उपलब्ध करण्यात आली आहे. या टीमला औषधे आणि उपकरणे उपलब्ध करून दिली आहेत.

उदा. बँडेज गॉज इ. ब्लिचिंग पावडर, स्वच्छतेसाठी आवश्यकता असल्यास साहित्य अशा प्रकारच्या आवश्यक त्या गरजांसाठी हा निधी ठेवण्यात आला आहे.

## २.९ प्रशिक्षण व क्षमता बांधणी (Training and Capacity Building):

बाल मृत्यू दर कमी करणे, माता मृत्यू दर कमी करणे अशी उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी आरोग्य व्यवस्थेत काम करणाऱ्यांचे प्रशिक्षण होणे गरजेचे असल्याने विविध स्तरावर प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येतात. यासाठी प्रशिक्षण केंद्रे सुस्थितीत असणे आणि त्यांची देखभाल करणे तसेच प्रशिक्षण देण्यासाठी लागणारे साहित्य उपलब्ध करणे यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

## २.१० आदिवासी भागासाठी सेवा तरतूदी (Services for tribal areas):

- **सिकल सेल रोग नियंत्रण (Sickle cell diseas control)**

  सिकलसेल आजार हा अनुवंशिक व गंभीर स्वरूपाचा असून यामध्ये लाल रक्तपेशी काही परिस्थितीत आपला गोल आकार बदलून कोयत्याच्या आकाराच्या होतात. साधारण रक्तपेशी, ह्या गोल आकाराच्या असतात आणि त्या

रक्तवाहिन्यांमधून शरीराच्या सर्व भागांपर्यंत सहज ऑक्सिजन वाहून नेतात. सिकलसेल असलेल्या रक्तपेशी रक्तवाहिन्यांमधून सहज वाहून जाऊ शकत नाहीत. त्या घट्ट आणि चिकट होतात. त्या रक्तवाहिन्यांमध्ये अडकून रक्त पुरवठ्यामध्ये अडथळा निर्माण करतात. लाल रक्तपेशींच्या नष्ट होण्यामुळे ॲनिमिया व कावीळ होतो.

या आजाराचे नियंत्रण करण्यासाठी काही उद्दिष्टे निश्चित केली:

- सिकल सेल विषयी वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांना समुपदेशन व उपचारासाठी प्रशिक्षित करणे.
- आजाराचे निदान व उपचार यासाठी लागणारी उपकरणे व औषधे उपलब्ध करून देणे.

- **माहेर योजना :**

बहुतांश आदिवासी लोकसंख्या ही डोंगराळ प्रदेशात पाड्यांमध्ये वास्तव्यास असते. आदिवासी पाड्यांमध्ये अनेक ठिकाणी पक्के रस्ते नाहीत. तसेच पक्के रस्ते असल्यास गर्भवती महिलांना जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात पोहचण्यासाठी सोयीस्कर वाहतूक व्यवस्था वेळेवर उपलब्ध होईल याची शाश्वती नसते. हे माता व बाल मृत्यूचे प्रमाण वाढण्यास महत्त्वाचे कारण आहे. प्रत्येक आदिवासी पाड्यास वाहतुकीची व्यवस्था उपलब्ध करून आर्थिकदृष्टया अशक्य, दुर्गम आदिवासी भागात खंडित दूरध्वनी व मोबाइल सेवा या अडचणी लक्षात घेऊन राज्य व शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत माहेर घर योजना सुरू केली आहे.

सुरक्षित व वैद्यकीय संस्थामध्ये बाळंतपण निश्चित करण्यासाठी गरोदर मातेला व तिच्या लहान मुलाला निवासाची सोय उपलब्ध करून देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजने अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आवारात एक खोली (माहेर घर) बांधण्यात आलेली आहे. माहेर घरामध्ये गर्भवती महिला प्रसूतीपूर्वी चार ते पाच दिवस अगोदर भरती करण्यात येते. गर्भवती महिलेची प्राथमिक  आरोग्य केंद्रातील डॉक्टरांकडून नियमित तपासणी करण्यात येते आणि तपासणी दरम्यान गुंतागुंत आढळल्यास तिला जवळच्या आरोग्य संस्थेत संदर्भीत करण्यात येते. माहेर घरामध्ये गर्भवती महिला, तिचे लहान मूल व एक नातेवाईक यांची राहण्याची सोय करण्यात आलेली आहे. माहेर घरांची देखभाल ठेवण्यासाठी व गर्भवती महिला, तिचे लहान मूल व एक नातेवाईक यांना भोजनाची सोय करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या रुग्णकल्याण समितीमार्फत महिला स्वयंसाहाय्यता बचत गट किंवा दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची निवड करण्यात आलेली आहे. निवड करण्यात आलेल्या बचत गटाला किंवा दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाला एका लाभार्थीमागे रु. ५००/- देण्यात येत आहेत.

माहेर घर ही योजना ठाणे, नाशिक, नंदूरबार, नांदेड, यवतमाळ, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली व अमरावती इ जिल्ह्यांत कार्यरत आहेत. माहेर घरामध्ये गर्भवती महिला, तिचे लहान मूल व एक नातेवाईक यांची राहण्याची सोय करण्यात आलेली आहे. माहेर घरांमध्ये खाटा, शौचालय आणि स्नानगृह, धुर विरहीत चुलीसह एक किचन ओटा व गरम पाण्यासाठी खोलीच्या छपरावर सोलर वॉटर सिस्टमची सोय उपलब्ध करण्यात आलेली आहे.

- **वैद्यकीय उपचाराकरिता दळणवळणाची सुविधा (Mobility support):**

गरोदर मातांना आणि गंभीर रुग्णांना आपत्कालीन प्रसंगी आरोग्य संस्थामध्ये आवश्यकतेप्रमाणे शस्त्रक्रिया विभागात आणण्यासाठी वाहतूक/दळणवळण सुविधा आहे. प्रसूतीपूर्व गरोदर मातांना ग्रामीण भागातून आरोग्य संस्थेपर्यंत वेळापत्रकानुसार दळणवळणाच्या सुविधेसाठी RCH अनुदानातून आपत्काल प्रसंगावेळी वाहतुकीसाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. राज्यातील आदिवासी भागातील सेवासुविधांच्या पर्यवेक्षणासाठी

अधिकाऱ्यांसाठी आवश्यकतेप्रमाणे वाहन वाहतूक व्यवस्था उपलब्ध आहे. राज्यात एकूण ७० आदिवासी तालुक्यांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राचे पर्यवेक्षण करण्यात आले आहे. आदिवासी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना आवश्यकतेप्रमाणे वाहन उपलब्ध करून देण्यात येते.

## २.११ नियोजन, सनियंत्रण व मूल्यमापन (Planning monitoring and evaluation : CBM)

या अभियानांतर्गत लोकाधारित देखरेख प्रकल्प प्रायोगिक तत्त्वांवर भारतात नऊ राज्यात सुरू करण्यात आला असून त्यात महाराष्ट्र राज्याचाही समावेश करण्यात आला आहे. जनतेला गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळाव्यात तसेच आरोग्य सेवांच्या गुणवत्तेत सुधारणा व्हावी व ठरावीक दर्जा राखावा यासाठी दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवेवर देखरेख ठेवून त्यातील येणाऱ्या त्रुटींवर तोडगा काढणे ही प्रमुख उद्दिष्टे समोर ठेवून लोकाधारित देखरेख प्रकल्प राबविण्यात येत आहे. यामध्ये उपलब्ध असलेल्या आरोग्य सेवांचे अधिकार याबद्दल जनतेमध्ये जागृती घडविणे अपेक्षित आहे. या उपक्रमाअंतर्गत स्थानिक पातळीवर आरोग्य सेवेसंबंधी त्रुटी शोधून त्या आरोग्य सेवेतील त्रुटी सुधारण्यासाठी उपाययोजना सूचविणेसाठी प्रयत्न केले जातात.

महाराष्ट्र राज्यात हा प्रकल्प आठ जिल्ह्यात चालू आहे : सोलापूर, बीड, औरंगाबाद, नाशिक, चंद्रपूर, कोल्हापूर, गडचिरोली, रायगड.

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना

**(संदर्भ : शासन निर्णय क्र.: एबावि-२००८/प्र.क्र.५९/का-५, दि.२४.८.२००९.)**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS) ही केंद्र पुरस्कृत योजना ग्रामीण, आदिवासी व नागरी भागातील सर्वसाधारण क्षेत्रातील लाभार्थ्यांकरिता राबविण्यात येते. ही योजना मुख्यत्वे करून बालकांच्या पोषण व आहार विषयक दर्जात सुधारणा करण्यासाठी तसेच बालमृत्यूचे व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने सन १९७५-७६ वर्षापासून टप्प्याटप्प्याने वाढ करून एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. राज्यामध्ये ५५३ (३६४ ग्रामीण +८५ आदिवासी + १०४ नागरी) प्रकल्प कार्यान्वीत आहेत.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुढील सेवा दिल्या जातात:-

| अ.क्र. | सेवा प्रकार | लाभधारक |
|---|---|---|
| १ | पूरक पोषण आहार | ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील मुले, गरोदर स्त्रिया व स्तन्यदा माता |
| २ | लसीकरण | ० ते ६ वर्षे मुले, गरोदर स्त्रिया व स्तन्यदा माता |
| ३ | आरोग्य तपासणी | ० ते ६ वर्षे मुले, गरोदर स्त्रिया व स्तन्यदा माता |
| ४ | संदर्भ आरोग्य सेवा | ० ते ६ वर्षे मुले, गरोदर स्त्रिया व स्तन्यदा माता |
| ५ | अनौपचारिक शिक्षण | ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुले |
| ६ | पोषण आहार व आरोग्य शिक्षण | १५ ते ४५ वर्षे वयोगटातील स्त्रिया |

## एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत आदिवासी नवसंजीवन योजना

राज्यातील अतिदुर्गम आदिवासी भागाचा पावसाळ्यामध्ये इतर भागाशी संपर्क तुटल्यामुळे विविध आजार उद्भवतात तसेच आदिवासींना योग्य प्रमाणत आहार मिळण्यास अडचणी निर्माण होतात व बाल मृत्यूसारख्या घटना घडतात. यावर मात करण्यासाठी व आदिवासी बालके आणि स्त्रियांना पूरक पोषण आहार उपलब्ध करून देण्याकरिता नवसंजीवन योजनेअंतर्गत सर्वसाधारण लाभार्थ्यांना वाढीव दराने वाढीव आहार देण्यात येतो.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडीतील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गर्भवती स्त्रिया व स्तन्यदा माता आणि ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील तीव्र कमी वजनाच्या लाभार्थ्यांना घरपोच आहार (THR) तसेच ३ वर्ष त ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना महिला बचत गटांमार्फत गरम ताजा आहार अंगणवाडीतच खाण्याकरिता पुरविण्यात येतो.

कुपोषणाला आळा घालण्याकरिता राज्यात राजमाता जिजाऊ कुपोषण मिशनची स्थापना करण्यात आलेली असून याद्वारे कुपोषणाला आळा घालण्यासंबंधी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

## एकात्मिक बाल विकास योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना

१) एकात्मिक बाल विकास योजनेअंतर्गत ग्रामीण, आदिवासी व नागरी क्षेत्रातील ४१६ प्रकल्पात "girl to girl approach" पद्धतीने किशोरी शक्ती योजनेची अंमलबजावणी करण्यास दिनांक १४.९.२००६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. (शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र. एबावि–२००८/ प्र.क्र.५९/ का–५, दि.२४.८.२००९)

२) एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत बीड, नांदेड, मुंबई, नाशिक, गडचिरोली, बुलढाणा, कोल्हापूर, सातारा, अमरावती, नागपूर आणि गोंदिया या ११ जिल्ह्यात किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणासाठी राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण – सबला योजना ही केंद्र पुरस्कृत नवीन योजना दि.३०.०४.२०११ च्या शासन निर्णयान्वये राज्यात सुरू करण्यात आली आहे.

३) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत गरोदर स्त्रिया आणि स्तन्यदा माता यांना त्यांच्या गरोदर आणि स्तन्यपान कालावधीमध्ये बुडीत मजुरीपोटी नुकसान भरपाई म्हणून रोख रक्कम देऊन त्यांचे आरोग्य व आहाराचा दर्जा सुधारावा या उद्देशाने राज्यातील भंडारा व अमरावती या दोन जिल्ह्यांमध्ये इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना (IGMSY) प्रसूती लाभ योजना राबविण्यास दि.३०.७.२०११ च्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आली आहे.

# आमचं गाव आमचा विकास

'आमचं गाव आमचा विकास' म्हणजे थोडक्यात, आमच्या गावाचा आम्ही आमच्या पद्धतीने ठरवून केलेला विकास असे म्हटले तर वावगे ठरू नये. GPDP मध्ये आपण सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षांचे आराखडे तयार केलेले आहेत. ते तयार करत असताना लोकसहभागाच्या नियोजन प्रक्रियेचा अवलंब करण्यात आलेला आहे. या लोकसहभागाच्या नियोजन प्रक्रियेमुळे आपणास गावाच्या वेगवेगळ्या प्रकारच्या गरजा व विविध क्षेत्रांतील गरजा निश्चित करून त्यांचा प्राधान्यक्रम ठरवणे शक्य झाले आहे. म्हणूनच या आराखड्यामध्ये विविध उपक्रमांचा गरजांवर आधारित समावेश करण्यात आलेला आहे. सुरुवातीला ४ वर्षाचे नियोजन केल्यानंतर त्यातील प्रत्येक वर्षी आराखड्याप्रमाणे विकास कामे करावयाची आहेत.

### आवश्यकता:

आता हा चार वर्षाचा आराखडा व नंतर प्रत्येक वर्षी राबविला जाणारा आराखडा व त्याची पद्धती पाहिली, तर निश्चितच असा प्रश्न उभा राहतो की, या कार्यक्रमाची आवश्यकता काय? या आगोदर ग्रामपंचायतीमध्ये विकास कामांचे नियोजन व अंमलबजावणी होत नव्हती काय? तर त्याचे उत्तर होय असे आहे. परंतु लोकसहभागाच्या नियोजन प्रक्रियेमधून काही गोष्टी अधोरेखित करण्यात आल्या त्या आपण पाहू.

- ग्रामपंचायत स्तरावर मानवी हक्कांवर आधारित विकास प्रक्रिया राबविणे.
- ग्रामपंचायत स्तरावर अत्यावश्यक बाबींच्या कामांचे सुयोग्य नियोजन करणे.
- ग्रामपंचायतमधील विकासाची प्रक्रिया ही एकात्मिक व सर्वसमावेशक करणे.
- गावातील नागरिकांचा व गावाचा शाश्वत विकास करणे.
- लोकसहभागातून मर्यादित संसाधनाद्वारे ग्रामपंचायतीमधील समस्या सोडविणे.
- नागरीक, प्रतिनिधी व प्रशासन यांच्या समन्वयातून विकास साध्य करणे.
- **पंचवार्षिक बृहद् विकास आराखडा–** ग्रामसभेने पुढील पाच वर्षात घ्यायचे उपक्रम निहाय आवश्यक व अंदाजित रक्कम दर्शविण्यात येईल. आराखडा मंजुरीनंतर त्यात बदल करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा असेल. ग्रामपंचायतीला पुढील काळात अपेक्षित प्राप्त होणाऱ्या निधीच्या दुप्पट रकमेचा आराखडा तयार करता येईल.
- **वार्षिक विकास आराखडा –** पंचवार्षिक विकास आराखड्यामध्ये समावेश असलेल्या त्या त्या वर्षी प्राधान्याने हाती घ्यायच्या उपक्रमांचा समावेश याच्यामध्ये असेल. हा आराखडा अपेक्षित निधीच्या जास्तीत जास्त दीडपट रकमेचा आराखडा तयार करता येईल.

२. कामाचा प्राधान्यक्रम बदलायचा असल्यास ग्रामसभेची मंजुरी आवश्यक आहे.

### निधीचे नियोजन खालीलप्रमाणे :

अ) महिला व बालकल्याण १०%

ब) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात

क) आरोग्य, शिक्षण व उपजीविका– २५%

ड) उर्वरीत कामे शिल्लक निधीतून आवश्यकतेनुसार

वार्षिक आराखड्यातील काम इतर योजनेत असल्यास, ते आराखड्यातून कमी करावे. आराखड्यामध्ये लोकसहभागातील कामांचा समावेश करावा. वैयक्तिक लाभ देऊ नये.

**प्रकल्प अहवाल तयार करणे–** वार्षिक आराखडा तयार झाल्यानंतर विशेष कृती दल (सरपंच, ग्रामसेवक, दोन तज्ज्ञ) प्रकल्प आराखडे तयार करतील. विकास आराखडा अंतिम करून ग्रामसभेची मंजुरी घेऊन तांत्रिक मान्यता प्रशासकीय मान्यता घेऊन एप्रिल मध्ये काम हाती घेता येईल.

**छाननी समिती:–** तालुका स्तरावर गट विकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती असेल.

**समितीची रचना:–**

१) गट विकास अधिकारी– अध्यक्ष

२) उपअभियंता बांधकाम– सदस्य

३) उपअभियंता पाणीपुरवठा– सदस्य

४) बालविकास प्रकल्प अधिकारी– सदस्य

५) गट शिक्षण अधिकारी– सदस्य

६) तालुका आरोग्य अधिकारी– सदस्य

७) विस्तार अधिकारी (पंचायत) सदस्य सचिव

वरील समिती कामाची तांत्रिक छाननी करून ग्रामपंचायतीकडे सुपूर्द करेल. ग्रामसभेने मान्यता दिल्यानंतर जिल्हा समितीकडे पाठविले जाते.

**प्रशासकीय मान्यता:–**

गट स्तरीय छाननी समितीने केलेल्या तपासणीनंतर ग्रामपंचायत अंतिम मान्यता देईल.

**अंदाज पत्रक व तांत्रिक मान्यता:–**

- आराखड्यात समावेश असलेल्या कामाचे ग्रामपंचायत अंदाजपत्रक तयार करेल व त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेईल.
- ग्रामपंचायत विकास आराखड्यासाठी उपलब्ध होणाऱ्या निधीचा तपशील.

  १) स्वनिधी

  २) वित्त आयोग

  ३) नरेगा

  ४) स्वच्छ भारत मिशन

  ५) इतर निधी

**अंमलबजावणीतील लोकसहभाग :**

१) **सामाजिक लेखा परीक्षण:** विकास आराखड्यातील कामाची पाहणी, गुणवत्ता, नियंत्रण व मूल्यमापनासाठी लेखा परीक्षण आवश्यक आहे. या समितीमध्ये सर्व स्तरातील लोकांचा समावेश असेल. निवृत्त व माहितगार लोकांना प्राधान्य दिले जाईल.

२) **कार्यगट:** ग्रामसभा एक कार्यगट स्थापन करेल. त्यामध्ये सेवा निवृत्त तांत्रिक तज्ज्ञ, अनुभवी व्यक्ती, बचत गट, युवक मंडळे, सेवाभावी संस्था यांचा समावेश असेल. हा कार्यगट नियमित सूचना व पाठपुरावा करेल.

३) **सूचना व तक्रार पुस्तिका:** सदर प्रक्रिया ही योग्य प्रकारे चालत नसेल तर ग्रामपंचायत व तालुका स्तरावर या पुस्तिकेमध्ये तक्रार करता येईल. तक्रारीवर तात्काळ निर्णय घेण्याचे संबंधितावर बंधन असेल.

४) **वार्ड व ग्रामसभा:** ग्रामसभा, महिला ग्रामसभा, वार्डसभा या विकास आराखड्याबाबत सनियंत्रण करून अंमलबजावणीबाबत ग्रामपंचायत कार्यगट, प्रभारी अधिकारी व संबंधितांना मार्गदर्शन करेल.

५) **लेखांकन पद्धतीवर लेखा परीक्षण:** योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ग्रामपंचायत आवश्यक कारवाई करेल.

६) **माहिती तंत्रज्ञानाचा वापर:** शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार आज्ञावलीमध्ये ग्रामपंचायत सर्व माहिती अद्ययावतपणे मांडेल.

७) **उपयोगिता प्रमाणपत्र व पूर्णत्वाचे दाखले:** सर्व कामे मुदतीमध्ये पूर्ण करून उपयोगिता प्रमाणपत्र ग्रामपंचायत सादर करेल. तसेच काम पूर्णत्वाचे दाखले संबंधित अधिकाऱ्याकडून प्राप्त करून घेऊन ग्रामपंचायतने ऑनलाइन (online) करील.

**अधिक अभ्यासासाठी संदर्भ :**


१) आमचं गाव आमचा विकास, ग्राम विकास विभाग. शासन निर्णय दि. २१/१२/२०१५

२) आमचं गाव आमचा विकास, ग्रामविकास विभाग. शासन निर्णय दि. ४/११/२०१५

३) आमचं गाव आमचा विकास, ग्रामविकास विभाग. शासन निर्णय दि. १८/२/२०१८

४) आमचं गाव आमचा विकास उपक्रमांतर्गत सन २०१९-२० ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) अंतिम करणेबाबत शासन निर्णय दि. ६ सप्टेंबर २०१८

५) किमान ५ ग्रामपंचायतींनी बनविलेला वार्षिक व पंचवार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडे

६) ग्रामपंचायतीत उपलब्ध असलेल्या, भरलेल्या कुटुंब पुस्तिका व महसुली गाव पुस्तिका

७) ग्रामनिधी अंदाजपत्रक नमुना

८) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना – माहिती पुस्तिका/मार्गदर्शक सूचना

# राष्ट्रीय बायोगॅस कार्यक्रम (National Biogas Programme)

### राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम

राष्ट्रीय बायोगॅस विकास योजनेची सुरुवात देशामध्ये सन १९८२-८३ पासून झालेली असून ही योजना केंद्र शासनाच्या वीस कलमी कार्यक्रमामध्ये समाविष्ट आहे.

### योजनेची उद्दिष्टे :

१. स्वयंपाकासाठी व इतर घरगुती उपयोगासाठी बायोगॅसचा वापर करणे.

२. ग्रामीण भागातील स्त्रीयांचे धुरापासून संरक्षण करणे व सरपणासाठी पडणाऱ्या कष्टापासून सुटका करणे.

३. सरपणासाठी आवश्यक असलेली लाकूडतोड थांबवून वनांचे संरक्षण करणे.

४. बायोगॅस प्रकल्पापासून निर्माण होणाऱ्या शेणखताचा वापर शेतीसाठी करून रासायनिक खतांचा वापर कमी करणे

५. शौचालयाची जोडणी बायोगॅस सयंत्रास करून गाव व परिसर स्वच्छ करणे.

६. बायोगॅसचा वापर गॅस चलित इंजिन व रेफ्रिजरेटरमध्ये करून डिझेल व पेट्रोलचा वापर कमी करणे

### योजने अंतर्गत लाभार्थ्यास मिळणारे अनुदान :

१. १ घनमीटर क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प :- रु. ५५००/-

२. २ ते ६ घनमीटर क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प :- रु. ९०००/-

३. बायोगॅस सयंत्रास शौचालय जोडणी केल्यास जादाचे अनुदान :- रु.१२००/-

४. टर्न कि फी रक्कम प्रति सयंत्र रु. १५००/- एकूण प्रति सयंत्र अनुदान रु. १०,५००/-

### अनुदान मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे :

१) गट विकास अधिकारी यांचे नावे विहीत नमुन्यात अर्ज.

२) लाभार्थींच्या नावे शेतीचा ७/१२ व ८ अ चा उतारा.

३) लाभार्थी भूमिहीन शेतमजूर असल्यास तलाठ्यांचा दाखला

४) लाभार्थ्याचा पूर्ण केलेल्या सयंत्रासह फोटो

५) ग्रामसेवकांचा ५ ते ६ जनावरे असल्याचा दाखला. लाभार्थीने सयंत्र स्वखर्चाने बांधून पंचायत समितीमध्ये अर्ज दाखल करावा

### बायोगॅस संबंधी सर्व साधारण संकीर्ण माहिती :


१) गोठ्यामध्ये बांधून असणाऱ्या एका दुभत्या जनावरापासून २४ तासांत सरासरी १० ते १५ किलो शेण मिळू शकते व बाहेरून चरून येणाऱ्या जनावरापासून सरासरी ७ ते १० किलो शेण मिळू शकते तसेच लहान वासरापासून दिवसाला २ ते ३ किलो शेण मिळू शकते .

२) एक किलो शेणापासून सुमारे ४० लि. बायोगॅस निर्माण होतो तसेच १ किलो खरकटेपासून सुमारे ८० लि. गॅसची निर्मिती होते.

३) एका व्यक्तीच्या दैनंदिन गरजेसाठी सुमारे २५० लि. बायोगॅसची आवश्यकता असते.

४) एक घनमीटर बायोगॅस म्हणजे १००० लि. गॅस

५) पाच लिटरच्या डब्यामध्ये सर्वसाधारणपणे १८ ते २० किलो शेण बसते.




## बायोगॅस सयंत्राचे प्रकार व मॉडेल

१) **गोबर/ के.व्ही.आय.सी. गॅस सयंत्र :–** या प्लँटची बांधणी विहिरीप्रमाणे असते या प्रकारात लोखंडी टाकीचा वापर केला जातो मात्र लोखंडी टाकी ५ ते १० वर्षात गंजून निकामी होत असल्याने सध्याच्या काळात या प्रकारचा गॅस प्लँन्टचा वापर कमी झाल्याचे दिसून येते.

२) **वॉटर जॅकेट (पाणकड्याचा) गॅस प्लँट :–** या प्रकारच्या प्लँटमध्ये लोखंडी टाकीच्या कडेने बांधकाम करून जॅकेट तयार करून त्यामध्ये पाणी भरलेले असते यामुळे या प्लँटमध्ये गॅस गळती होत नाही. या प्लँन्टमध्ये शेण अगर मैला पूर्णपणे टाकीच्या आतच राहतो त्यामुळे प्लँटमधून जास्तीत जास्त गॅस मिळतो. हा प्लँट फक्त मैल्यावर चालवला तरी थोडीसुद्धा घाण येत नाही . वॉटर जॅकेटमध्ये पाण्यात मधून मधून जळके तेल (वेस्ट ऑईल) टाकल्यास तेल लोखंडी टाकीला लागून टाकी गंजत नाही.

३) **गणेश गॅस प्लँट :–** या प्रकारात लोखंडी टाकीचा वापर करण्यात येत असून पाचक यंत्र व गॅस टाकी तयार मिळते. पाचक यंत्र लोखंडी पट्ट्या व बांबूच्या कामट्याचे बनवतात. लोखंडी पट्ट्या गंजून या प्रकारच्या प्लँटचे आयुष्य कमी होण्याचा संभव आहे.

४) **दिनबंधू गॅस सयंत्र:–** या प्रकारचे सयंत्र घुमटाकार असून संपूर्ण सयंत्र जमिनीखाली असते. या सयंत्राचे बांधकाम विटांपासून किंवा आर.सी.सी. पद्धतीने करता येते. या प्रकारचे मॉडेल पूर्णपणे जमिनीखाली असल्याने अंगणात ही करता येते. या प्रकारच्या सयंत्रात इन लेट व आउट लेट मोठ्या आकाराचे असल्याने शेणा शिवाय इतर सडणारे व कुजणाऱ्या पदार्थाचा तसेच लहान मृत जनावरे (कुत्रे, मांजर, उंदीर,कोंबडी) याचा वापर करून गॅस व खत मिळवता येते. प्लँटची खोली कमी व घुमटावर मातीचा भराव असल्यामुळे उबदारपणा राहतो व गॅस निर्मिती जास्त होते. सध्याच्या काळात या प्लॅन्टचा वापर जास्त होताना

दिसून येत आहे. ३ घ. मि. गॅस प्लॅन्ट बांधण्यासाठी आवश्यक मटेरिअल – खोदकाम मोजमापा प्रमाणे, सिमेंट १६ पोती, खडी (१/२" ¾") ३० घ. फू. , विटा लहान साईज १६०० नग, वाळू १.२५ ब्रास व इतर आवश्यक मटेरिअल.

५) **जनता गॅस प्लॅन्ट :–** लोखंडाशिवाय हा प्लँट बनत असल्याने दीर्घायुषी आहे. इनलेट व आउट लेट मोठ्या आकाराचे असल्याने शेणाशिवाय इतरही सडणारे व कुजणारे पदार्थ प्लँटमध्ये टाकून गॅस व खत निर्मिती करता येते.

६) **मलप्रभा गॅस प्लॅन्ट :–** मानवी मलाचा उपयोग करून गॅस निर्मिती या प्लँटद्वारे करण्यात येते. सार्वजनिक संडास, मोठ्या सोसायट्यांमधील सेफ्टी टँक ऐवजी या प्रकारचा गॅस प्लॅन्ट बांधल्यास सार्वजनिक ठिकाणी गॅस निर्मिती करून तिचा वापर वीजनिर्मितीसाठी करण्यात येऊ शकतो. १ घ. मि. गॅस प्लॅन्ट बांधण्यासाठी आवश्यक मटेरिअल – खोदकाम– ८'X ६' ५' सिमेंट १५ पोती, खडी (१/२ ३/४) ५० घ. फु., विटा लहान साईज २००० नग, दगड (८" १०") १/२ ब्रास, रेती १.५ ब्रास व इतर आवश्यक मटेरिअल

७) **प्रि फॅब्रीकेटेड FRP Biogas Plant: –** या प्रकारच्या सयंत्रामध्ये तयार टाकी असते. ही टाकी जमिनीच्या वर असते. या प्रकारचे मॉडेल पूर्णत: खडकाळ जमीन खोदणे शक्य नसेल त्या जागी तसेच काळी जमीन असलेल्या भागात जास्त उपयोगी पडते. कारण काळ्या जमिनीत इतर सयंत्रांना तडे जाण्याची शक्यता अधिक असते. ती अडचण या प्रकारच्या मॉडेलमध्ये येत नाही. या प्रकारच्या सयंत्रात इनलेट व आऊटलेट हे टाकीच्या दोन्ही बाजूला असतात. यामध्ये शेण, खरकटे व इतर लवकर कुजणारे पदार्थ वापरता येतात. सयंत्रे तातडीने उभी करणे गरजेचे असल्यास याप्रकारची सयंत्रे वापरण्यात येतात.

# प्रधानमंत्री ग्रामसडक योजना

केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने प्रधानमंत्री ग्रामसडक योजना सन २००० मध्ये कार्यान्वित केली.

**निकष (प्रधान ग्रामसडक योजना–१) :**

- देशातील ग्रामीण भागातील ७०० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली गावे/वाड्या/वस्त्या बारमाही टप्पात जोडणे.
- आदिवासी क्षेत्रातील २५० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली न जोडलेली गावे वाड्या वस्त्या बारमाही टप्पाने जोडणे.
- वरील प्रमाणे सर्व गावे बारमाही टप्पाने जोडली गेल्यानंतर अस्तित्वातील थेट ग्रामीण रस्ते यांची सुधारणा करणे.

**निकष (प्रधान ग्रामसडक योजना–२) :**

- वरील प्रमाणे प्रधानमंत्री ग्राम सडक योजना–१ च्या पूर्णत्वानंतर केंद्र शासनाने २०१३–१४ पासून प्रधानमंत्री ग्राम सडक योजना–२ सुरु केली आहे. त्यानुसार अस्तित्वातील रस्त्यांची सुधारणा करण्याचे काम प्राधान्यक्रमाने हाती घेण्यात येते.
- ज्या प्रत्येक तालुक्यातील सर्व रस्त्यांचे काम सविस्तर सर्वेक्षण करण्यात येते. ज्या रस्त्यांवर बाजारगावे (Market Center) दवाखाने, शाळा, कॉलेज, पशुवैद्यकीय केंद्र आदी सुविधा आहेत. अशा गावांची त्यांच्या सुविधानुसार मार्क देऊन त्यानुसार रस्त्यांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात येतो.
- यामध्ये रस्त्यावर भविष्यात सुरू होणाऱ्या बाजार सुविधा, शैक्षणिक केंद्र यांचाही विचार करण्यात येतो. त्या दृष्टीने रस्त्यांचा प्रधान्यक्रम ६ प्रकियेत येतो. त्यानुसार नकाशातील सुविधांनुसार दिलेल्या गुणाप्रमाणे मानंकन करण्यात येते. व रस्त्यांचा प्राधान्यक्रम यादी करण्यात येते.

  प्रत्येक तालुक्याचे नकाशे तयार करण्यात आलेले आहे. त्यामध्ये थेट रस्ते व लिंक रस्ते यांचा अंतर्भाव आहे.

**प्रस्ताव मंजुरी**

वरील प्रमाणे रस्त्यांचा प्राधान्यक्रम निश्चित केल्यानंतर ग्रामीण दर्जाचे रस्ते सदर योजनेत प्राधान्यक्रमानुसार प्रस्तावित करण्यात येतात व त्यांची सविस्तर अंदाजपत्रके खाजगी सल्लागारांकडून तयार करून राज्य शासनामार्फत केंद शासनाकडे सादर करण्यात येतात. त्यानंतर केंद्र शासन निधीच्या आधीन राहून राज्याच्या प्रस्तावास मंजुरी देते.

**निविदा मंजुरी**

रस्त्यांचे प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर जिल्हा स्तरावर प्रत्येक जिल्ह्यामार्फत ई–निविदा कार्यवाही पूर्ण करून कामाचे कार्यात्मक आदेश दिले जातात. सदर कामाची मुदत सर्वसाधारणत: १२ महिने असते.

**गुणवत्ता तपासाणी**

सदर कामाची एजन्सी निश्चित केल्यानंतर काम करण्यासाठी कार्यकारी अभियंता यांचेकडील यंत्रणेमार्फत प्रधानमंत्री ग्रामसडक योजना सुरू करण्यात येतात. सदर कामे कार्यकारी अभियंता स्तरावर राज्य गुणवत्ता निरीक्षकाकडून व केंद्र स्तरावर

राष्ट्रीय गुणवत्ता अत्यंत उच्च राखली जाते. प्रत्येक कामावर प्रयोगशाळा व जिल्हा स्तरावर ही एक प्रयोगशाळा करून त्यामध्ये प्रस्तावावरील साहित्याच्या चाचण्या घेण्यात येतात.

## काम पूर्णत्वानंतर दोषदायित्व कालावधी :

काम पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदाराने पाच वर्षापर्यंत रस्त्यांची देखभाल दुरुस्ती करावयाची त्यांचेवर बंधनकारक आहे. ५ वर्षानंतर सदर रस्त्यांची देखभाल दुरुस्ती खाते मार्फत करण्यात येते.

## निधी उपलब्धता :

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना –२ साठी केंद्र शासनामार्फत ७५ टक्के व राज्य शासनमार्फत २५ टक्के निधी उपलब्ध करून देणेत येतो.

### ग्रामपंचायत स्तरावर करण्याची कार्यवाही

- ग्रामपंचायत स्तरावर ज्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात सदर काम सुरू आहे, त्या ठिकाणी सदर काम शासकीय निकषानुसार सुरू आहे किंवा कसे? कामावर कंत्राटदाराने प्रयोगशाळा उभारली आहे किंवा नाही? तसेच सदर कामाच्या ठिकाणी जो माहितीदर्शक फलक लावलेला असतो त्यामधील परिणामांनुसार रस्त्यांचे काम होत आहे किंवा नाही ? यावर लक्ष ठेवावे.
- सदर काम गुणवत्तापूवर्क होईल याकडे लक्ष द्यावे.
- तसेच रस्त्यास सर्व ठिकाणी आवश्यक त्या रुंदीने जागा उपलब्ध होत आहे किंवा कसे ? तसे होत नसल्यास जागा उपलब्ध करून देण्याकडे विशेष लक्ष द्यावे.
- तसेच रस्त्याचे गटर्स स्थानिक शेतकऱ्यांकडून बुजविले जाणार नाहीत व रस्त्यांस अनधिकृत पाईप लाईन क्रॉसिंग होत नाही याकडे लक्ष द्यावे.

# राष्ट्रीय सामाजिक साहाय्य कार्यक्रम (NSAP)

## प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना

- एक वर्षाचे विमा संरक्षण असणारी ही एक आयुर्विमा योजना आहे. दरवर्षी नूतनीकरण आवश्यक. बँका व भारतीय आयुर्विमा महामंडळ यांच्या सहयोगाने या योजनेचे परिचालन केले जाईल.
- १८ ते ५० वयोगटातील सर्व बचत बँक खातेधारक या योजनेत सहभागी होऊ शकतील. एकाच व्यक्तीची अनेक बचत खाती असतील तर अशी व्यक्ती कुठल्याही एका बचत खात्याद्वारे हा विमा उतरवू शकेल. विमा उतरविणाऱ्या व्यक्तीचा आधार क्रमांक पायाभूत मानला जाईल.
- योजनेचा कालावधी दरवर्षी १ जून ते ३१ मे असा राहील व विमा हप्ता बँक खात्यात परस्पर नावे टाकला जाईल. पुढील वर्षाच्या नूतनीकरणाचा अर्ज ३१ मे पर्यंत देणे आवश्यक राहील. योजनेत सहभागी होण्यासाठीचा काळ सरकार सुरुवातीला तीन महिन्यांपर्यंत (३०.११.२०१५) वाढवू शकते.
- विमाधारकाचा कुठल्याही कारणाने मृत्यू झाला तर वारसास दोन लाख रुपये भरपाई मिळेल.
- विमा हप्ता ३३० रुपये प्रती व्यक्ती प्रती वर्ष राहील व बँक बचत खात्यात परस्पर नाव टाकले जाईल.
- विमाधारकाने वय वर्षे ५५ पूर्ण केल्यावर/बँकेच्या बचत खात्यात विमा हप्ता नावे टाकण्यास पुरेशी शिल्लक नसेल तर बँक खाते बंद केले तर विमा संरक्षण संपुष्टात येईल.
- तांत्रिक अडचणींमुळे संपुष्टात आलेली विमा पॉलिसी काही अटींची पूर्तता केल्यावर पुन्हा चालू करता येईल.

  **Official Website: http://www.jansuraksha.gov.in**

## प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना

- एक वर्षाचे विमा संरक्षण असणारी ही एक अपघात विमा योजना आहे. दरवर्षी नूतनीकरण आवश्यक. बँका व सार्वजनिक क्षेत्रातील इन्शुरन्स कंपन्या यांच्या सहयोगाने या योजनेचे परिचालन केले जाईल.
- १८ ते ७० वयोगटातील सर्व बचत बँक खातेधारक या योजनेत सहभागी होऊ शकतील. एकाच व्यक्तीची अनेक बचत खाती असतील तर अशी व्यक्ती कुठल्याही एका बचत खात्याद्वारे हा विमा उतरवू शकेल. विमा उतरविणाऱ्या व्यक्तीचा आधार क्रमांक पायाभूत मानला जाईल.
- योजनेचा कालावधी दरवर्षी १ जून ते ३१ मे असा राहील व विमा हप्ता बँक खात्यात परस्पर नावे टाकला जाईल. पुढील वर्षाच्या नूतनीकरणाचा अर्ज ३१ मे पर्यंत देणे आवश्यक राहील. योजनेत सहभागी होण्यासाठीचा काळ सरकार सुरुवातीला तीन महिन्यांपर्यंत (३०.११.२०१५) वाढवू शकते.

अपघात विमा भरपाई पुढीलप्रमाणे मिळेल :-

| | |
|---|---|
| मृत्यू | दोन लाख रुपये |
| दोन्ही डोळ्यांची संपूर्ण आणि बरी न होणारी हानी /दोन्ही हात किंवा | |
| दोन्ही पाय निकामी होणे / एक डोळा आणि एक हात किंवा एक पाय निकामी होणे | दोन लाख रुपये |
| एका डोळ्यांची संपूर्ण आणि बरी न होणारी किंवा एक हात किंवा एक पाय निकामी होणे | दोन लाख रुपये |

विमा हफ्ता १२ रुपये प्रती व्यक्ती प्रती वर्ष राहील व बँक बचत खात्यात परस्पर नावे टाकला जाईल.

- विमाधारकाने वय वर्षे ७० पूर्ण केल्यावर/बँकेच्या बचत खात्यात विमा हप्ता नावे टाकण्यास पुरेशी शिल्लक नसेल तर बँक खाते बंद केले तर विमा संरक्षण संपुष्टात येईल.
- तांत्रिक अडचणींमुळे संपुष्टात आलेली विमा पॉलिसी काही अटींची पूर्तता केल्यावर पुन्हा चालू करता येईल.
  **Official Website: http://www.jansuraksha.gov.in**

## अटल पेन्शन योजना

अटल पेन्शन योजना ही निवृत्तीनंतर दरमहा ठरावीक परतावा देणारी एक सरकारी पेन्शन योजना आहे. ही योजना ज्यांच्यासाठी कुठलीही पेन्शन योजना उपलब्ध नाही, अशा नागरिकांसाठी लाभदायक आहे.

- १८ ते ४० वयोगटातील सर्व बचत बँक खातेधारक या योजनेत सहभागी होऊ शकतात.
- या योजनेत सहभागी होण्यासाठी १८ वर्षे वयाच्या व्यक्तीला बँकेत या योजनेअंतर्गत दरमहा ४२ रुपये भरावे लागतील. त्यानंतर सदर व्यक्तीला वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर एक हजार रुपये दरमहा पेन्शन मिळू शकेल. याच धर्तीवर दरमहा २१० रुपये भरल्यास पाच हजार रुपये दरमहा पेन्शन मिळू शकेल.
- या योजनेत ग्राहकाच्या बरोबरच पहिली पाच वर्षे सरकारचेही योगदान असणार आहे. हे योगदान ग्राहकाच्या एकूण योगदानाच्या ५० टक्के (एक हजारपेक्षा कमी रक्कम असल्यास त्याप्रमाणे असेल)आहे. ज्या ग्राहकांसाठी कुठलीही वैधानिक सामाजिक सुरक्षा योजना उपलब्ध नाही आणि जे ग्राहक आयकर दाते नाहीत अशाच ग्राहकांना हे योगदान मिळणार आहे.
- ग्राहकाचा मृत्यू झाल्यास त्याच्या पत्नी किंवा पतीस ही पेन्शन चालू राहील. दोघांचाही मृत्यू झाल्यास त्यांनी नामांकित केलेल्या व्यक्तीस सर्व जमा रक्कम एकरकमी परत करण्यात येईल.
- दररोज जगण्यासाठी संघर्ष करत असताना सुरक्षित भविष्याचा विचार करणे प्रत्येकालाच जमते असे नाही. असुरक्षित उत्पन्न आणि असंघटित रोजगाराच्या क्षेत्रात काम करणाऱ्या आणि कोणत्याही पेन्शन योजनेचा लाभ मिळत नसलेल्या व्यक्तींसाठी 'अटल पेन्शन योजना' ही एक प्रकारे म्हातारपणी आर्थिक आणि सामाजिक संरक्षण देणारी योजना आहे.

## सुकन्या समृद्धी योजना

सुकन्या समृद्धी योजना अंतर्गत मुलीच्या आई-वडिलांनी अथवा कायदेशीर पालकांनी (वय वर्षे १० च्या आत कधीही) कमीत कमी १००० रुपयांच्या डीपॉजीट सह कुठल्याही पोस्ट ऑफिसमध्ये अथवा औद्योगिक किंवा राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये सेव्हिंग अकौंट उघडायचे. भारतात सर्व पोस्ट ऑफिसमध्ये सुकन्या समृद्धीचे अकाउंट उघडण्यास परवानगी आहे.

उा. जर समजा आज ५ वय वर्षे असलेल्या मुलीच्या पालकांनी मुलीच्या नावाने सुकन्या समृद्धीच्या अंतर्गत दरमहा १००० असे प्रतिवर्षी १२०००/- रुपये जमा केले, तर एकूण १४ वर्षांत खात्यात १,६८,०००/- रुपये जमा होतील व खात्याची मुदत संपल्यानंतर व्याजासहित रक्कम रुपये ६,३१,२६१/- मिळतील.

### लागणारी कागदपत्रे-

१. मुलीचा जन्मदाखला

२. रहिवासी पुरावा (जी व्यक्ती मुलीच्या वतीने अकाउंट उघडतेय त्या व्यक्तीचे)

३. ओळखीचा पुरावा (जी व्यक्ती मुलीच्या वतीने अकाउंट उघडतेय त्या व्यक्तीचे)

४. पालकांचे ३ फोटो आणि मुलीचे ३ फोटो.

५. PAN कार्ड आणि आधार कार्ड (जी व्यक्ती मुलीच्या वतीने अकाउंट उघडतेय त्या व्यक्तीचे)

### अकाउंट चालू राहण्याचा कालावधी-

मुलीच्या लग्नापर्यंत अथवा तिच्या वयाच्या २१ व्या वर्षीपर्यंत हे सुकन्या समृद्धी हे अकाउंट चालू ठेवू शकतो. समजा काही कारणास्तव खाते खंडित झाल्यास पुन्हा ५० रुपये भरून पुनरुज्जीवित करू शकतो.

### पैसे कसे काढायचे-

ह्या योजने अंतर्गत आपण आंशिक स्वरूपात पैसे काढू शकतो. उदाहरणार्थ; ५०% सुकन्या समृद्धी योजनेच्या अंतर्गत येणाऱ्या खात्यामधून आपण ५०% रक्कम आपण मुलीच्या १८ वर्षानंतर काढू शकतो पण फक्त तिच्या उच्च शिक्षणासाठी.

### सुकन्या समृद्धीची वैशिष्ट्ये आणि त्याबद्दल महत्त्वाची माहिती-

१. एका मुलीसाठी फक्त एकाच बँक अकाउंट उघडू शकता. त्याप्रमाणे ही योजना फक्त २ मुलींपर्यंत सिमीत असेल. जर समजा पहिल्यांदा जुळ्या मुली झाल्या आणि नंतर पुन्हा एकदा मुलगी जन्माला आली तर ही योजना ३ मुलींसाठी सुद्धा असेल.

२. कमीत कमी १००० रुपये तुम्ही सुकन्या समृद्धीच्या योजनेमध्ये गुंतवू शकता आणि जास्तीत जास्त १,५०,००० पर्यंत.

३. एकदा पैसे गुंतवल्यानंतर ते पुढे कमीत कमी १४ वर्षापर्यंत गुंतवावे लागतील.

४. सुकन्या समृद्धी योजनेंतर्गत पासबुक सुविधा उपलब्ध असेल.
**Official Website: http://www.nsiindia.gov.in**

## इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजना

या योजनेमध्ये ग्रामीण भागाकरिता सन २००२ च्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या सर्वेक्षणानुसार व शहरी भागासाठी नगर विकास विभागाने दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या घेतलेल्या सर्वेक्षणानुसार फक्त दारिद्र्य रेषेखालील ६५ व ६५ वर्षावरील सर्व व्यक्ती पात्र होतात. या लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रु.२००/- प्रतिमहा प्रतिलाभार्थी निवृत्तीवेतन देण्यात येते. याच लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेमधून गट (अ) रु.४००/- प्रतिमहा निवृत्तिवेतन मिळते. यामुळे या लाभार्थ्यांना राज्य शासनाकडून रुपये ४००/- प्रतिमहा व केंद्र शासनाकडून रूपये २००/- प्रतिमहा असे एकूण रुपये ६००/- प्रतिमहा प्रति लाभार्थी निवृत्तिवेतन मिळते.

**केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तिवेतन योजना राज्य शासनाने शासन निर्णय दि.१३ जुलै, २०१० नुसार राज्यात लागू केलेल्या आहेत.**

## इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तिवेतन योजना

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नोंद असलेल्या ४० ते ६५ वर्षाखालील वयोगटातील विधवा, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तिवेतन योजनेअंतर्गत निवृत्तिवेतन मिळण्यास पात्र असतात. पात्र लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रु. २००/- प्रतिमहा व राज्य शासनाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत रु. ४००/- प्रतिमहा असे एकूण रु. ६००/- प्रतिमहा निवृत्तिवेतन अनुज्ञेय आहे.

## इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नोंद असलेल्या अपंग लाभार्थ्यांपैकी फक्त १८ ते ६५ वर्षाखालील वयोगटातील ८०% हून जास्त अपंगत्व असलेले किंवा एक किंवा एकापेक्षा जास्त अपंगत्व असलेले किंवा बहु अपंगत्व असलेले (दोन किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेले) लाभार्थी इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेंतर्गत निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र असतात. पात्र लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रू.२००/- प्रतिमहा व राज्य शासनाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत रू.४००/- प्रतिमहा असे एकूण रू.६००/- प्रतिमहा निवृत्तीवेतन अनुज्ञेय आहे.

## राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील १८ ते ५९ वयोगटातील कमावत्या व्यक्तीचा अपघाती अथवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयास एक रकमी रक्कम रु.२०,०००/- चे अर्थसाहाय्य देण्यात येते.

संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवाराज्य निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजनेखालील पात्र अर्जदाराची माहिती व अर्ज छाननीसह तहसीलदार किंवा अन्य संबंधित अधिकाऱ्यांनी तयार करून ती माहिती व अर्ज संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीसमोर ठेवण्यात येते. सदर समितीला त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

## आम आदमी विमा योजना

ग्रामीण भागातील १८ ते ५९ वयोगटातील भूमीहीन शेतमजुरांना तसेच २.५ एकर पेक्षा कमी बागायती व ५ एकर पेक्षा कमी जिरायती शेतजमीन धारण करणाऱ्यांना या योजनेंतर्गत लाभ देण्याात येतो. वार्षिक विम्याचा हप्ता रू. २००/– इतका असून केंद्र शासनामार्फत रू. २००/–व राज्य शासनामार्फत रू. १००/– इतका विम्याचा हप्ता भारतीय आयुर्विमा महामंडळाला देण्यात येतो.

या योजनेंतर्गत लाभार्थ्याच्या नववी ते बारावी इयत्तेत शिकणाऱ्या दोन मुलांना रू. १००/– प्रतिमहा प्रतिविद्यार्थी शिष्यवृत्ती देण्यात येते.

# दीनदयाळ उपाध्याय पंचायत सशक्तीकरण पुरस्कार (DDUPSP)

ग्रामपंचायतीने आपल्या कार्यक्षेत्रात केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली, ग्रामसभा बळकट करून गावाच्या विकासाच्या निर्णयप्रक्रियेत व अंमलबजावणीत लोकसहभाग वाढविला आणि ग्रामस्थांना दिल्या जाणाऱ्या नागरी सेवा सुविधांची गुणवत्ता राखली तर ग्रामपंचायतीला राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांमध्ये भाग घेऊन विविध पुरस्कार मिळविण्याची सुवर्णसंधी प्राप्त होते.

यापैकी एक अत्यंत महत्त्वाचा व मानाचा असा पुरस्कार म्हणजे केंद्र शासनाच्या पंचायतीराज मंत्रालयातर्फे दिला जाणारा दीन दयाळ उपाध्याय पंचायत सशक्तीकरण पुरस्कार. हा पुरस्कार सन २०११-१२ पासून ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या प्रत्येक पातळीवर दिला जात आहे. अत्युत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पंचायत राज संस्थांची याद्वारे दखल घेऊन त्याच्या कामाची पावती दिली जाते. प्रत्येक वर्षी राष्ट्रीय पंचायती राज दिवस २४ एप्रिल रोजी हे पुरस्कार प्रदान केले जातात.

ग्रामपंचायतींना पुढील ९ थिमॅटिक प्रवर्गात पुरस्कार मिळवण्याची संधी आहे.

१) स्वच्छता (Sanitation)

२) नागरी सेवा (Civic Services)
उदा. पिण्याचे पाणी, पथ दिवे, मुलभूत सुविधा

३) नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन
(Natural Resource Management)

४) दुर्बल सिमांत घटक (Marginalized Section) जसे महिला, अनुसूचित जाती/जमाती, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक

५) सामाजिक क्षेत्र कामगिरी (Social Sector Performance)

६) आपत्ती व्यवस्थापन (Disaster Management)

७) समुदायाधारित संघटना/ग्रामपंचायतीला सहाय्यकारी कार्य करणाऱ्या व्यक्ती (Individuals taking voluntary action to support Gram Panchayat)

८) महसूल निर्मितीसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम (Innovation in Revenue Generation)

९) ई-शासन (e-Governance)

### नानाजी देशमुख राष्ट्रीय गौरव ग्रामसभा पुरस्कार (NDRGGSP):-

प्रत्येक राज्यातून एका ग्रामपंचायतीची निवड या पुरस्कारासाठी केली जाते.

गावाच्या सामाजिक - आर्थिक प्रगतीसाठी (Socio-economic development) ग्रामसभेला सहभागी करून घेऊन अत्युत्कृष्ट योगदान देणाऱ्या ग्रामपंचायतींना हा विशेष पुरस्कार दिला जातो.

### ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) पुरस्कार –

२०१७–१८ पासून या नविन पुरस्काराचा समावेश केला गेला आहे. देशभरातून ३ अत्युत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती यासाठी निवडल्या जातात. भारत सरकारच्या पंचायती राज मंत्रालयाने प्रसारीत केलेल्या आदर्श मार्गदर्शक सूचनांशी सुसंगत अशा राज्य शासनाने बनविलेल्या विशिष्ट मार्गदर्शक सूचनांशी सुसंगत अशा राज्य राज्य शासनाने बनविलेल्या विशिष्ट मागदर्शक सूचनांनुसार ग्रामपंचायत विकास आराखडा बनविणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने हा पुरस्कार दिला जातो.

# दीन दयाळ उपाध्याय पंचायत सशक्तीकरण पुरस्कार वक्षिसासाठी ग्रामपंचायतीची प्रश्नावली

१. प्रश्नाखाली रिकाम्या रकान्यात उत्तर नमूद करावे .

२. उत्तराच्या समर्थनासाठी आवश्यक असलेले फोटो व कागदपत्रे सोबत जोडावेत.

| अनु.क्र | प्रश्न | कमाल गुण |
|---|---|---|
| १. | ग्रामसभा बैठकांचे रेकॉर्ड अद्ययावत किती ? आहे का? हो असेल तर ग्रामसभेसाठी<br>☐ होय<br>☐ नाही<br>उपस्थितीतचा तपशील –<br>अ.क्र. दिनांक व वेळ एकूण लोकसंख्या उपस्थित ग्रामस्थ संख्या<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| २. | ग्रामसभा सामाजिक लेखापरीक्षण करतात का?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| ३. | आर्थिक वर्षात बंधनकारक असणाऱ्या ग्रामसभांची संख्या किती?<br>पुढील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |

| अनु.क्र | प्रश्न | कमाल गुण |
|---|---|---|
| ४. | सन २०१७-१८ मध्ये घेण्यात आलेल्या ग्रामसभांची संख्या किती ?<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| ५. | सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात बंधनकारक असणाऱ्या ग्रामसभांची संख्या किती ?<br>☐ २ पेक्षा अधिक सभा<br>☐ २ पेक्षा कमी सभा<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| ६. | ग्रामपंचायतमध्ये होणाऱ्या सभांचे इतिवृत्त घेतले जाते का ?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | १.० |
| | | |
| ७. | पंचायत मध्ये नियमितपणे सभा घेतल्या जातात का होय असल्यास खालील मुद्दाबद्दल माहिती द्या-<br>पाणी , सिंचन, शिक्षण, आरोग्य व पोषण, अनुसूचित जाती जमातीचे प्रश्न, स्वच्छता ग्रामीण रस्ते दळणवळणाची साधने, रस्त्यावरील दिवे, रोजगार इ.<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | ४.० |

| अनु.क्र | प्रश्न | कमाल गुण |
|---|---|---|
| ८. | सन २०१६-२०१७ मध्ये अनियमितता किंवा अवैधतेमुळे ग्रामपंचायतीचे अधिकार काढून घेण्यात आले होते का?<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | १.० |
| | | |
| ९. | आरोग्य व स्वच्छता, महिला व बालविकास, पाणीपुरवठा व स्वच्छ समितीच्या सभांना ग्रामपंचायत सदस्य उपस्थित राहतात का?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | २.० |
| | | |
| १०. | केंद्र शासन, राज्य शासन किंवा पंचयतराजच्या कोणत्या योजनेसाठी ग्रामसभा लाभार्थ्यांची निवड करतात का?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| ११. | ग्रामपंचायतीतील कर्मचारी पंचयतिच्या सभांना उपस्थित राहतात का याबाबत अभिप्राय व्यक्त करा<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |

| अनु.क्र | प्रश्न | कमाल गुण |
|---|---|---|
| १२. | **पंचायत कर्मचाऱ्यांच्या कामाची पडताळणी करतात का?**<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| १३. | **शेतकरी, महिला गट, युवा गट हे लक्षगट पंचायतीशी सल्लामसलत करतात का? त्यांच्या सुचानांचा विचार केला जातो का?**<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| १४. | **वार्षिक आरखडा तयार करताना अन्य विभागांच्या योजनांचा समावेष केला जातो का?**<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| १५. | **वार्षिक आराखड्यात समाविष्ट करावयाच्या विषयांची चर्चा ग्राम सभेमध्ये केली जाती का?**<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |

| अनु.क्र | प्रश्न | कमाल गुण |
|---|---|---|
| १६. | सन २०१६-१७ च्या आर्थिक वर्षीचा वार्षिक आरखडा तयार करणात आला होता का?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| १७. | ग्रामपंचायतीने स्वत: पुढाकार घेऊन चालू केलेल्या उपक्रमातून पंचायतीच्या उत्पन्नात वाढ झाली का?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| १८. | थकीत कर तसेच चालू कर वसुलीचे प्रमाण किती टक्के आहे?<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| १९. | नागरी साधन सुविधांमध्ये ग्रामपंचायतीने खालीलपैकी सुधारणा करणेसाठी खालीलपैकी कोणता उपक्रम हाती घेतला?<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| २०. | पंचायत शाळेतील खालील सुविधांच्या कार्यप्रणालीचे सनियंत्रण वेळोवेळी करते का?<br>शाळेतील मुलांची उपस्थिती ,शाळेतील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, स्वच्छता गृहाची उभारणी इ.<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |

| अनु.क्र | प्रश्न | कमाल गुण |
|---|---|---|
| २१. | **महिला व बालकांचे आरोग्य, पोषण सुधारण्यासाठी व त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी पंचयतीकडून काही उपक्रम सुरु केले होते का ?**<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| २२. | **पर्यावरण संवर्धन घन व द्रव कचरा संवर्धनासाठी पंचायतीने पुढाकार घेतला का?**<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| २३. | **थकीत कर तसेच चालू कर वसुलीचे प्रमाण किती टक्के आहे?**<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| २४. | **वेगवेगळ्या सामाजिक व स्थानिक प्रश्नाबाबत ग्रामस्थामध्ये जाणीव जनजागृती साठी पंचायतीने २०१६-२०१७ च्या आर्थिक वर्षात पुढाकार घेतला होता का?**<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| २५. | **ग्रामपंचायत आपले आर्थिक व्यवहार शासनाने विहित केलेल्या स्वरुपात करतात का?**<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |

| अनु.क्र | प्रश्न | कमाल गुण |
|---|---|---|
| | | |
| २६. | सन २०१६-१७ मधील आर्थिक लेखे अद्यावत व प्रमाणिकृत करून घेण्यात आले आहे का?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| २७. | ग्रामपंचायतीमध्ये तक्रार पुस्तिका आहे का?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| २८. | ग्रामपंचायतीमध्ये तक्रार निवारणबाबत प्रक्रियेची माहिती दया.<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| २९. | माहिती अधिकार कायद्यांतील तरतुदी नुसार ग्रामपंचायत खालील माहिती ग्रामपंचायत कार्यालय व सार्वजनिक ठिकाणी स्वयंप्रेरणेने लावते का?<br>१.दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींची यादी<br>२. निवृत्ती वेतन धारक व विविध योजनचे लाभार्थी<br>३. ग्रामपंचायतीचे उत्पन्न व खर्च<br>४. तक्रार निवारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |

| अनु.क्र | प्रश्न | कमाल गुण |
|---|---|---|
| ३०. | **माहिती अधिकारातील अर्जाच्या पूर्ततेबाबत माहिती द्या.**<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| ३१. | **सन २०१६–१७ मधील ग्रामपंचायतीचे खर्चाचे लेखापरीक्षण सक्षम अधिकाऱ्यांकडून करण्यात आले आहे का?**<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| ३२. | **ग्रामपंचायत लेखा परीक्षनातील लेखा परिच्छद पूर्तता केली जाते का?**<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |

# दीन दयाळ उपाध्याय पंचायत सशक्तीकरण पुरस्कार २०१६-१७
# (ग्रामपंचायत उत्पन्न वाढीबाबत गावासाठी प्रश्नावली)

१. प्रश्नाखाली रिकाम्या रकान्यात उत्तर नमूद करावे .

२. उत्तराच्या समर्थनासाठी आवश्यक असलेले फोटो व कागदपत्रे सोबत जोडावेत. (एकूण गुण -२०)

| अनु.क्र | प्रश्न | कमाल गुण |
|---|---|---|
| १. | ग्रामपंचायतीनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर वसुलीसाठी प्रयत्न केले आहेत का ?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | १.० |
| | | |
| २. | ग्रामपंचायतीनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर वसुलीसाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्याबरोबर लोकप्रतिनिधी प्रयत्न करतात काय ?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | १.० |
| | | |
| ३. | ग्रामपंचायत कर वाढ व्हावी यासाठी या विषयाची जनजागृती करण्यासाठी ग्रामसभेमध्ये चर्चा करण्यात येते का ?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | १.० |

| अनु.क्र | प्रश्न | कमाल गुण |
| --- | --- | --- |
| | | |
| ४. | ग्रामपंचायत कराची वसुली होण्यासाठी विविध प्रोत्साहन पर पद्धतीचा वापर केला जातो का ?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | १.० |
| | | |
| ५. | ग्रामपंचायत कर आकारणी नवीन/सुधारीत दराने वेळोवेळी करण्यात येते का?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | १.० |
| | | |
| ६. | ग्रामपंचायत उत्पन्न वाढीसाठी ग्रामपंचायती सबंधित नोंदवह्या वेळोवेळी अद्यावत ठेवल्या आहेत काय?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | २.० |
| | | |

| अनु.क्र | प्रश्न | कमाल गुण |
|---|---|---|
| ७. | ग्रामपंचायत कराची वसुली वेळेवर व्हावी म्हणून ग्रामपंचायती मार्फत कर दात्यामध्ये जागृती करण्यात येते का?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | १.० |
| | | |
| ८. | विविध करांची वसुली करण्यासाठी वसुली करणाऱ्या कर्मचाऱ्याना प्रोत्साहन देण्यात येते का?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | १.० |
| | | |
| ९. | कार्यालयात ग्रामपंचायत कर वसुली करण्याबरोबर इतर कोणत्या पद्धतीचा कर वसुली करण्यासाठी वापर केला जातो का?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | १.० |
| | | |
| १०. | एकूण मागणी च्या कमीत कमी ६० टक्के कराची वसुली ग्रामपंचायतीनी मागील तीन वर्षात केली आहे का?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | १.० |

| अनु.क्र | प्रश्न | कमाल गुण |
|---|---|---|
| ११ | ग्रामपंचायत स्तरावर महसूल मिळवून देणाऱ्या सर्व सार्वजनिक मालमत्तांची यादी तयार करण्यासाठी ग्रामपंचायत पुढाकार घेते का?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | ४.० |
| | | |
| १२ | ग्रामपंचायत कराची वसुली केल्यानंतर त्याबाबत करदात्यांना पोच पावती देण्यात येते का?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | १.० |
| | | |
| १३ | वेळेवर कर भरणाऱ्या कर दात्यांची यादी ग्रामपंचायत फलकावर प्रसिद्ध केली जाते का?<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | १.० |
| | | |
| १४ | करदात्यांकडून कर वसुली करण्यासाठी शासनाने केलेल्या निर्णय/नियमांचा ग्रामपंचायत पुरेपूर वापर करीत आहेत काय?<br>☐ होय<br>☐ नाही | २.० |


| अनु.क्र | प्रश्न | कमाल गुण |
|---|---|---|
| | खालील रकान्यात शेरा नमूद करावा | |
| | | |
| १५. | **ग्रामपंचायत करदात्यांनी नियमाप्रमाणे वेळेत कर भरण्यासाठी जनजागृती करण्यात येते का?**<br>☐ होय<br>☐ नाही<br>खालील रकान्यात शेरा नमूद करावा | १.० |
| | | |

# ३. राज्य शासनाच्या योजना

# ग्रामविकास विभागाशी सबंधित योजना

## वार्षिक योजना

राज्याच्या सर्वसाधारण आर्थिक विकास साधनांमध्ये पंचवार्षिक व वार्षिक योजना आखणे व त्या अंमलात आणणे हे एक महत्त्वाचे साधन आहे. नियोजनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे रोजगारांच्या संधी निर्माण करणे, दारिद्र्य रेषेखाली असलेल्या लोकसंख्येचे जीवनमान उंचावणे आणि स्वयंनिर्भरता आणि पायाभूत सोयी निर्माण करणे हे होय.




वार्षिक योजनेमधून आदिवासी उपयोजना, अनुसूचित जाती उपयोजनेकारिता निधी उपलब्ध करून देण्यात येतो. सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात वार्षिक योजनेच्या आकारमानाच्या ११.८% निधी अनुसूचित जाती उप योजनेसाठी व ९.४% निधी आदिवासी उपयोजनेसाठी उपलब्ध करून देण्यात येतो.

**जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण):** जिल्हा योजनांसाठी उपलब्ध होणारा निधी पुढील सूत्राच्या आधारे जिल्ह्यांना वितरीत करण्यात येतो:

| अ.क्र. | बाब | एकूण वाटपातील % |
|---|---|---|
| १ | जिल्ह्याची एकूण सर्वसाधारण लोकसंख्या | ३० |
| २ | जिल्ह्याची ग्रामीण सर्वसाधारण लोकसंख्या | २० |
| ३ | जिल्ह्याचे क्षेत्रफळ | ३० |
| ४ | मानव विकास निर्देशांक | २० |
| | एकूण | १०० |

**अनुसूचित जाती उपयोजना –** अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत व्यक्तिगत लाभाच्या योजनांचा अनुसूचित जातींना प्रत्यक्ष लाभ देणे, पायाभूत सेवा व सुविधा पुरवून वस्त्यांच्या विकासाचा कार्यक्रम, शैक्षणिक विकासाचा कार्यक्रम, अस्वच्छ कामाचे निर्मूलन, आरोग्यात सुधारणा करण्याचा कल्याणकारी कार्यक्रम व किमान गरजा भागविण्याचा कार्यक्रम हे विशिष्ट धोरण आहे. अनुसूचित जाती उपयोजना ही सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत राबविण्यात येते.

**आदिवासी उप योजना –** राज्यातील ५०,७५८ चौ.कि.मी. म्हणजे १६.५ टक्के क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली आहे. राज्यातील एकूण ४७ अनुसूचित जमाती आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील आदिवासींची एकूण लोकसंख्या १०५.१० लक्ष आहे व ती राज्याच्या १,१२३.७४ लक्ष या एकूण लोकसंख्येच्या ९.४ टक्के आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, माडा, मिनिमाडा क्षेत्रात पायाभूत सोयी सुविधा करून देणे, तसेच आदिवासी क्षेत्रातील व आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी यांच्यासाठी वैयक्तिक लाभाच्या योजना राबविणे इत्यादींचा आदिवासी उपयोजनेत समावेश आहे. आदिवासी लोकांना एकत्रित तसेच व्यक्तिगत फायदेशीर ठरतील अशा योजना आदिवासी उपाययोजनेत घेण्यात येतात. ग्रामीण विकास, आदिवासी उप योजना जिल्ह्यातील डोंगरी भागाचा विकास, लघुपटबंधारे, रस्ते विकास, शिक्षण, आरोग्य आणि पाणीपुरवठा इत्यादीसाठी पुरेशा प्रमाणात नियतव्यय ठेवण्यात येतो. वार्षिक योजनेत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निधीपैकी ६० टक्के निधी जिल्हा राज्य योजना व ४० टक्के निधी राज्य योजनांना देण्यात येतो.

वार्षिक योजनेच्या नियतव्ययाचे वाटप खालीलप्रमाणे क्षेत्रनिहाय केले जाते:–

१. कृषि व संलग्न सेवा

२. ग्रामीण विकास

३. विशेष क्षेत्र विकास कार्यक्रम

४. जलसंपदा व पूरनियंत्रण

५. ऊर्जा विकास

६. उद्योग व खनिकर्म

७. परिवहन व दळणवळण

८. विज्ञान व तंत्रज्ञान व पर्यावरण

९. सामान्य आर्थिक सेवा

१०. सामाजिक व सामूहिक सेवा

११. सर्वसाधारण सेवा

पंचवार्षिक व वार्षिक योजना तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये योजनेसाठी उपलब्ध असलेल्या साधनसंपत्ती मूल्यमापन करण्यासंदर्भात वित्त विभागाचाही अत्यंत निकटचा सहभाग असतो. खालील बाबींच्या आधारे साधनसंपत्तीचे मूल्यमापन केले जाते.

- चालू महसुलातील शिल्लक.

- सार्वजनिक उपक्रमाद्वारे अंशदान.
- राज्य भविष्यनिर्वाह निधी.
- अल्पबचतीवरील कर्ज.
- संकीर्ण भांडवली आवक (निव्वळ).
- अतिरिक्त अर्थबळ उभारणी.
- बाँड/कर्जरोखे.
- सुरवातीच्या शिलकीचे समायोजन.
- खुल्या बाजारातील कर्ज.
- करारानुसार कर्ज (एलआयसी, जिआयसी, नाबार्ड, हुडको इ.)
- केंद्रीय साहाय्य- अ) सर्वसाधारण, ब) बाह्य सहाय्यिक प्रकल्प, क) एक वेळ केंद्रीय अर्थसाहाय्य.

## जलयुक्त शिवार अभियान

महाराष्ट्र राज्यात पिकाच्या ऐन वाढीच्या काळात पावसाची अनियमितता व पावसातील खंड यामुळे निर्माण होणारी पाणी टंचाई, दुष्काळसदृष्य परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी व सिंचन आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता शाश्वत स्वरूपात होण्याच्या दृष्टिकोनातून सर्व विभागांच्या समन्वयाने जलसंधारणाच्या सर्व योजना एकात्मिक स्वरूपात राबविण्याच्या हेतूने, महाराष्ट्र शासनाने 'सर्वांसाठी पाणीटंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९' करण्यासाठी व टंचाई परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी नियोजनबद्ध कृती आराखडा तयार करून पाण्याची उपलब्धता ग्रामीण परिसरात वाढविण्यासाठी 'जलयुक्त शिवार अभियान' डिसेंबर २०१४ पासून सुरू केले आहे.

### अभियानाचा उद्देश :

१) पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाचे शिवारातच अडविणे .

२) गावाच्या भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे.

३) राज्याच्या सिंचन क्षेत्रात वाढ करणे.

४) शेतीसाठी संरक्षित सिंचन व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे.

५) ग्रामीण भागातील बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजनाचे पुनर्जिविकरण करून पाणी पुरवठ्यात वाढ करणे.

६) भूजल अधिनियमाची अंमलबजावणी करणे.

७) विकेंद्रित पाणीसाठे निर्माण करणे.

८) पाणी साठवण क्षमता निर्माण करणारी नवीन कामे हाती घेणे.

९) अस्तित्वात असलेल्या व निकामी झालेल्या जलस्त्रोतांची पाणी साठवण क्षमता वाढविणे.

१०) अस्तित्वातील जलस्त्रोतातील गाळ लोक सहभागातून काढून पाणी साठवण क्षमता वाढविणे.

११) वृक्षलागवडीस प्रोत्साहन देऊन वृक्षलागवड करणे.

१२) पाण्याच्या ताळेबंदाबाबत जनतेत जाणीव जागृती निर्माण करणे

१३) शेतीसाठी पाण्याचा कार्यक्षम / काटकसरीने वापर करण्यास प्रोत्साहन देणे व जनजागृती करणे.

१४) पाणी अडविणे/ जिरवणे बाबत लोकांना प्रोत्साहित करून लोक सहभाग वाढविणे.

१५) माथा ते पायथा कामे घेऊन गावाचा पाणलोट समद्ध करणे.

## अभियानाची व्याप्ती :

सदर अभियानात शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था, लोकसहभाग व खाजगी उद्योजक (CSR) इ. कडील उपलब्ध निधीतून राज्यातील टंचाई सदृश्य तालुक्यात व उर्वरित भागात भविष्यात टंचाई भासू नये यासाठी जलसंधारणाच्या योजना मोठ्या प्रमाणात राबविण्यावर भर देण्यात आला आहे.

## अभियानांतर्गत हाती घ्यावयाची कामे :

१) पाणलोट विकासाची कामे

२) साखळी सिमेंट बंधाऱ्याची कामे, नाला खोलीकरण व रुंदीकरणासह करणे.

३) जुन्या जलस्त्रोताचे पुनरुज्जीवन करणे

४) अस्तित्वातील लघुपाटबंधारे केटी वेअर/ साठवण बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे.

५) पाझर तलाव, लघुसिंचन तलाव दुरुस्ती व नूतनीकरण करणे.

६) पाझर तलाव, गाव तलाव, साठवण तलाव, शिवकालीन तलाव, ब्रिटिश व निजाम कालीन तलाव, माती नालाबांधा यातील गाळ काढणे

७) मध्यम व मोठ्या प्रकल्पांचा सिंचन क्षमतेनुसार प्रत्यक्ष वापर होण्यासाठी उपाययोजना करणे.

८) छोटे ओढे/नाले जोड प्रकल्प राबविणे

९) उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे

१०) पाणी वापर संस्था बळकट करणे

११) कालवा दुरुस्त करणे.

१२) विहीर पुनर्भरण करणे.

### अभियान कालावधी :

सदर अभियान जानेवारी २०१५ पासून सुरू करण्यात आले असून सन २०१९ पर्यंत अभियानाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

### निधीची उपलब्धता :

सदर अभियान राबविण्यासाठी विविध योजनांतर्गत उपलब्ध असलेला निधी, लोकसहभाग, खाजगी उद्योजक यांचेकडील CSR निधीतून कामे होणे आवश्यक आहे.

### अभियानाचा आराखडा तयार करणे :

जलयुक्त शिवार अभियान राबविणेसाठी गाव, तालुका आणि जिल्ह्याच्या एकत्रित आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

१) अस्तित्वात असलेली जलसंधारणाची कामे पूर्ण करणे.

२) नव्याने घ्यावयाची कामे

३) अस्तित्वात असलेल्या कामांची दुरुस्ती व गाळ काढणे इ. चा समावेश करण्यात आलेला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार आराखडा तयार करावा. गाव स्तरावरील विविध कामे हाती घेताना 'व्हिलेज पोटेंशियल मॅप' मध्ये दर्शविण्यात आलेली कामे घेणे अत्यंत आवश्यक आहे. सदर एकूण कामात ७०% कामे क्षेत्र उपचाराची व ३०% इतर कामे घेण्यात यावीत. आराखडा तयार करण्यापूर्वी गाव शिवार फेरी करून कामे निश्चित होतात त्यानुसार तयार आराखड्यास ग्रामसभा, तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय व विभागस्तरीय समितीची मान्यता आवश्यक आहे. तसेच, गावाचे पाण्याचे अंदाज पत्रक/ ताळेबंद तयार करून त्या प्रमाणे आवश्यक त्या उपाययोजना करणे.

## पालकमंत्री शेत/पाणंद योजना

## पर्यावरण स्मार्ट ग्राम योजना

(**संदर्भ :** १) ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र. स्माग्रायो-२०१५/प्र.क्र.१५१-अ/योजना-१ दि. २१ नोव्हेंबर २०१६
२) ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र. स्माग्रायो-२०१५/प्र.क्र.१५१ अ/योजना-११ दि.१६/०४/२०१८)

- राज्यातील गावांचा शाश्वत विकास घडवून आणण्याकरिता पर्यावरणाचे संवर्धन, जतन व संरक्षण करून समृद्ध व संपन्न गावाची निर्मिती करण्याकरिता ही योजना राबविली जाते.
- उद्दिष्ट साध्य केलेल्या ग्रामपंचायतीला निधीच्या स्वरूपात पुरस्कार दिला जातो.
- या योजने अंतर्गत ग्रामपंचायतीची निवड करण्याकरिता खालील निकष व गुणांकनाचा विचार केला जातो.

१. स्वच्छता – २५ गुण

२. व्यवस्थापन – २५ गुण

३. दायित्व – २० गुण

४. अपारंपरिक उर्जा व पर्यावरण – २० गुण

५. पारदर्शकता व तंत्रज्ञान – १५ गुण

- प्रत्येक तालुक्यातून एक गाव स्मार्टग्राम म्हणून निवड झालेनंतर रु. १०: ०० लाख निधी स्वरूपात पुरस्कार दिला जातो.
- सर्व तालुक्यांची स्मार्ट ग्राम निवड झाल्यानंतर जिल्ह्यातून एका ग्रामपंचायतीची जिल्हा स्मार्ट ग्राम म्हणून निवड करण्यात येते व त्यास रु. ४० लाख निधी स्वरूपात पुरस्कार दिला जातो.
- पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींना जिल्हा स्तरावर मा.पालकमंत्री व सर्व अधिकारी यांचे हस्ते सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात येतो.
- स्मार्ट ग्राम पुरस्कार निवडीसाठी तालुकास्तरावरील तालुका तपासणी समिती पुढील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| गटविकास अधिकारी | – | समिती अध्यक्ष |
| विस्तार अधिकारी (आरोग्य) | – | सदस्य |
| विस्तार अधिकारी (कृषी) | – | सदस्य |
| कनिष्ठ अभियंता (पाणीपुरवठा) | – | सदस्य |
| साहाय्यक लेखा अधिकारी | – | सदस्य |
| तालुका विस्तार अधिकारी | – | सदस्य सचिव |

- पुरस्कार निवडीसाठी जिल्हास्तरावर जिल्हा तपासणी समिती तथा स्थानिक देखरेख समिती पुढील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. | – | समिती अध्यक्ष |
| जिल्हा आरोग्य अधिकारी | – | सदस्य |
| जिल्हा कृषी विकास अधिकारी | – | सदस्य |
| कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) | – | सदस्य |
| कार्यकारी अभियंता (बांधकाम) | – | सदस्य |
| मुख्य लेखा व वित्त अधिकारी | – | सदस्य |
| उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) | – | सदस्य सचिव |

- स्मार्ट ग्राम पुरस्काराच्या निधीतून खालील नावीन्यपूर्ण कामे करता येतात.

१. अपारंपरिक ऊर्जा संबंधी अभिनव प्रकल्प

२. स्वच्छता

३. महिला सक्षमीकरण आणि मुलांना अनुकूल प्रकल्प

४. स्वच्छ पाणी वितरण

५. औद्योगीक माहिती प्रणाली बसविणे

६. आतरराष्ट्रीय मानदंड, मार्गदर्शक तत्त्वे, संकलन तपासणी सूची तयार करून दर्जा वाढविण्यासाठी प्रकल्प दाखविणे.

## अस्मिता योजना

(संदर्भ : ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्र. अस्मिता २०१८/प्र.क्र.३३/ योजना-३ दिनांक १ मार्च २०१८)

### १) योजनेचा उद्देश

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील महिला व किशोरवयीन मुलींमध्ये सॅनिटरी नॅपकिन (Sanitary Napkin) व वैयक्तिक स्वच्छतेबाबत जाणीव जागृती निर्माण करणे व त्यांना माफक दरात सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करून देणे.

### २) लाभार्थी

- ग्रामीण भागातील महिला
- जिल्हा परिषद शाळेतील ११ ते १९ वर्षे वयोगटातील मुली

### ३) अंमलबजावणी

- जिल्हा परिषद शाळेतील ११ ते १९ वर्षे वयोगटातील मुलींसाठी ही योजना प्राथमिक शिक्षण विभागाच्या (जिल्हा परिषद) मदतीने राबविण्यात येते.
- ग्रामीण भागातील महिलांसाठी ही योजना उमेद पुरस्कृत महिला स्वयंसाहाय्यता बचत गट यांचेमार्फत राबविण्यात येते.

### ४) गटाची नोंदणी प्रक्रिया

- सर्वप्रथम गटांनी नोंदणीसाठी अस्मिता मोबाइल ॲप डाउनलोड करावे.
- अस्मिता ॲपद्वारे स्वयंसाहाय्यता समूह /बचत गट यांनी गटाचा एन आय सी कोड (NIC code) वापरून नोंदणी करावी.
- नोंदणी अगोदर स्वयंसाहाय्यता समूहाने मोबाइल नंबर अद्ययावत करावा. जेणेकरून नोंदणीसाठी आवश्यक असलेला ओ.टी. पी. (OTP) मोबाइलवर येईल व नोंदणी प्रक्रिया पूर्ण होईल.

### ५) जिल्हा परिषद शाळेतील किशोरवयीन मुलींची नोंदणी प्रक्रिया

- जिल्हा परिषद शाळेतील ११ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुलींच्या यादींची प्रमाणित प्रत मुख्याध्यापक यांनी

ग्रामपंचायतीच्या आपले सरकार सेवा केंद्रात (ASSK) जमा करावे.

- प्रत्येक किशोरवयीन मुलींची अस्मिता योजनेत नोंदणी अद्ययावत करावी.
- नोंदणी झालेल्या मुलींना अस्मिता कार्ड देण्यात येईल.

### ६) सॅनिटरी नॅपकिनची किंमत

- जिल्हा परिषद शाळेतील मुलींना ८ पॅडचे पॅकेट रु. ५ या अनुदानित किमतीत देण्यात येईल.
- ग्रामीण भागातील महिलांना २४० मीमी पॅडचे पॅकेट चोवीस रुपये (रु.२४/-) व २८० मीमी पॅडचे पॅकेट एकोणतीस रुपये (रु.२९/-) दराने विक्री करण्यात येईल.

## सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना

(संदर्भ: महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र. मजिअ-२०१६/प्र.क्र.३१/योजना-३, दि. १४ ऑक्टोबर, २०१६)

### योजनेची पार्श्वभूमी:

राष्ट्रीय राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या व केंद्र शासनाकडून व्याज अनुदान प्राप्त झालेल्या पात्र महिला स्वयंसाहाय्यता समूहांना सवलतीच्या व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी शासन निर्णयान्वये सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना राबविण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

### पात्र स्वयंसाहाय्यता समूह:

१. नियमित कर्जफेड करणाऱ्या व केंद्रशासनाकडून व्याज अनुदानास पात्र असलेल्या NRLM Compliant महिला स्वयंसाहाय्यता समूहाकरिता ही योजना लागू आहे.

२. सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना ही महिला स्वयंसाहाय्यता समूहांना प्रभावी शून्य % व्याजदराने कर्ज पुरवठा करण्याकरिता सुरू करण्यात आलेली आहे.

### व्याज अनुदान वितरण कार्यपद्धती :

व्याज अनुदानाच्या परिगणनेसाठी रिजर्व्ह बँक ऑफ इंडियाद्वारे विहित कार्यपद्धती / मार्गदर्शक सूचनांना अनुरूप कार्यपद्धती खालीलप्रमाणे प्रसारीत करण्यात येत आहे.

**अ) प्रवर्ग १ (Category -1)** यामध्ये पुढील १४ जिल्ह्यांचा समावेश होतो.

१. गोंदिया, २. गडचिरोली, ३. नंदूरबार, ४. यवतमाळ, ५. उस्मानाबाद, ६. जालना ७. सोलापूर, ८. रत्नागिरी ९. बीड, १०. ठाणे, ११. पालघर, १२. सिंधुदुर्ग १३. चंद्रपूर, १४. वर्धा या जिल्ह्यांमधील महिला स्वयंसाहाय्यता समूहांना बँकेमार्फत ७% व्याजदर आकारण्यात येतो. नियमित परतफेड करणाऱ्या स्वयंसाहाय्यता समूहांना केंद्रशासनाकडून ३% व्याज अनुदान प्राप्त होते. अशा स्वयंसाहाय्यता समूहाला ४% व्याज अनुदान राज्यशासनाकडून देण्यात येईल.

**ब) प्रवर्ग २ (Category - 2) मधील जिल्ह्यांकरिता –** प्रवर्ग १ मधील जिल्हे वगळता उर्वरित २० जिल्ह्यांकरिता महिला स्वयंसाहाय्यता समूहांना बँकेमार्फत सर्वसाधारणतः १२.५% व्याजदर आकारण्यात येतो. नियमित कर्जफेड करणाऱ्यांना महिला स्वयंसाहाय्यता समूहाला अभियानाकडून ५.५% व्याज अनुदान देण्यात येते. अशा स्वयंसाहाय्यता समूहाला ७% पर्यंत व्याज अनुदान राज्यशासनाकडून देण्यात येईल.

**अंमलबजावणी :**

या योजनेची अंमलबजावणी राज्यस्तरावर महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत आणि तालुका स्तरावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांचेमार्फत करण्यात येणार आहे. इंटेन्सिव्ह जिल्ह्यांमध्ये, इंटेन्सिव्ह ब्लॉकसाठी अंमलबजावणीकरीता जिल्हा अभियान व्यवस्थापक कक्षामार्फ़त करण्यात येत आहे.

## संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान

(संदर्भ : शासन निर्णय क्र : अभियान १००८/प्र.क्र.१७७/पापु- १६,दि.१५.९.२००८)

सन २०१८-१९ या वर्षासाठी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत घेण्यात येणाऱ्या स्पर्धेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सर्वसमावेशक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत :

### १. अभियान पूर्वतयारी, ग्रामपंचायती तपासणीसाठी तयारी व तपासणी कार्यक्रम:

**(i) दिनांक ०१ ते ते १५ मे :–**

या अभियानाची सुरुवात दिनांक मे १ पासून करावी. दिनांक १ मे रोजी अभियानाची घोषणा झाल्यानंतर त्यापुढील कालावधीमध्ये मंत्री (पाणीपुरवठा व स्वच्छता) हे राज्यस्तरावर आणि पालकमंत्री हे जिल्हास्तरावर बैठका घेऊन अभियानाची अंमलबजावणी यशस्वीपणे करण्याचे आवाहन करतील.

या कालावधीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मार्गदर्शनानुसार गट विकास अधिकारी हे तालुक्यातील ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी व सर्व संबंधितांची सभा तालुका स्तरावर आयोजित करतील. सदर सभेस संबंधित खासदार/आमदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समितीचे सभापती, उपसभापती, पंचायत समिती सदस्य, सेवाभावी संस्था, महाविद्यालयाचे प्राध्यापक, स्वातंत्र्य सैनिक इत्यादी मान्यवरांना निमंत्रित करण्यात यावे व सर्वांना अभियानात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन करावे.

**(ii) दिनांक १६ मे ते ३१ मे :–**

या कालावधीदरम्यान प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये सरपंच ग्रामसभा घेतील. ग्रामस्तरावर अभियान यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत पातळीवर सरपंच त्यांच्या अध्यक्षतेखाली समिती घटित करतील. या समितीमध्ये सर्व संबंधित स्थानिक लोकप्रतिनिधी व अधिकारी/कर्मचारी सदस्य असतील. समितीच्या बैठकीमध्ये अभियानामध्ये सक्रिय काम करण्यासाठी कृती कार्यक्रम ठरविण्यात यावा. पूर्ण गावाचा अभ्यास करून वैयक्तिक शौचालयाच्या स्थितीबद्दल माहिती एकत्रित करून त्याप्रमाणे संपूर्ण स्वच्छतेबाबतच्या बाबी (वैयक्तिक स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, मासिक पाळी व्यवस्थापन, पाणीपुरवठा आणि परिसर स्वच्छता) कृती कार्यक्रमामध्ये समाविष्ट कराव्यात.

### (iii) दिनांक ०१ जून ते ३० सप्टेंबर :–

या कालावधीमध्ये राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमधील प्रत्येक प्रभाग (Ward) हा उत्कृष्ट प्रभाग या स्पर्धेकरिता परिशिष्ट १ मधील निकषाप्रमाणे जास्तीत जास्त गुण मिळवण्यासाठी तयारी करेल.

### (iv) दिनांक १ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर :–

या कालावधीमध्ये प्रत्येक ग्रामपंचायतीने उत्कृष्ट प्रभाग या स्पर्धेचे अयोजन करावे. या स्पर्धेच्या तपासणीकरिता गट विकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत स्तरावर तपासणी समिती घटित करावी. या समितीने सोबतच्या परिशिष्ट १ मधील निकषाप्रमाणे तपासणी करून ग्रामपंचायत प्रभागाची निवड करावी. या स्पर्धेमध्ये निवडलेल्या उत्कृष्ट प्रभागा साठी रुपये/– (रुपये दहा हजार फक्त) इतके बक्षीस देण्यात येईल. तसेच उत्कृष्ट प्रभागातील प्रत्येक कुटुंब प्रमुखाला एक लॅमिनेटेड प्रशस्तिपत्रक देण्यात येईल.या प्रशस्तिपत्रकामध्ये – ग्रामपंचायत/ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत सन २०१८–१९ या वर्षामध्ये निवडलेल्या उत्कृष्ट प्रभागामधील मी रहिवाशी आहे. या बाबीचा ठळकपणे उल्लेख करुन आवश्यक त्या बाबींचा समावेश करण्यात यावा. सदरचे प्रशस्तिपत्रक सभापती व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या स्वाक्षरीने देण्यात यावे.

या प्रक्रियेचे संपूर्ण नियंत्रण व संपूर्ण जबाबदारी जिल्हा स्तरावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांची व तालुका स्तरावर गट विकास अधिकारी यांची राहील. उत्कृष्ट प्रभाग करिता मिळणारे बक्षीस रुपये १०,०००/– (रुपये दहा हजार फक्त) चा विनियोग संबंधित ग्रामपंचायतीने बक्षीस प्राप्त उत्कृष्ट प्रभागामधील विकास कामाकरिता करावा.

### v) दिनांक १ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर :–

गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी तालुकास्तरावर उत्कृष्ट प्रभाग स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकावर अलेल्या उत्कृष्ट प्रभागाचा सत्कार सोहळा व पुरस्कार वितरण कार्यक्रम अयोजित करावा. या कार्यक्रमामध्ये जास्तीत जास्त ग्रामस्थांचा व लोकप्रतिनिधींचा सहभाग सुनिश्चित करावा, जेणेकरून इतर प्रभागामधील ग्रामस्थांनादेखील प्रेरणा मिळेल.

### vi) दिनांक १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर:–

जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद गटातील समाविष्ट ग्रामपंचायतींमध्ये स्पर्धा अयोजितत करण्यात यावी. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर गटातील ग्रामपंचायतींच्या तपासणीसाठी संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या अध्यक्षतेखाली समित्या घटित कराव्यात. या समित्यांनी सोबतच्या परिशिष्ट २ मधील निकषानुसार तपासणी करावी व गटातील सर्वोच्च गुण प्राप्त करणाऱ्या ग्रामपंचायतीची निवड करावी. त्यानंतर प्रत्येक गटातील प्रथम क्रमांक प्राप्त ग्रामपंचायतीचे नाव ३१ जानेवारी पूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सादर करावे.

### vii) दिनांक १ जानेवारी ते ३१ जानेवारी :–

या कालावधीत गट स्पर्धेमध्ये सर्वात जास्त गुण प्राप्त करणाऱ्या ग्रामपंचायती जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट – २ मध्ये नमूद केलेल्या निकषाप्रमाणे तयारी करतील.

**viii) दिनांक १ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी: –**

जिल्हा परिषद गट स्तरावरील प्रथम क्रमांकावर आलेल्या ग्रामपंचायती व जिल्हास्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर आलेल्या ग्रामपंचायतींचा एकत्रित सत्कार सोहळा व बक्षीस वितरण कार्यक्रम जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आयोजित करावा.

**ix) दिनांक ०१ मार्च ते ३१ मार्च: –**

स्पर्धेतील जिल्हास्तरावरील प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त ग्रामपंचायतींची विभागस्तरीय स्पर्धेसाठी या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट– २ मध्ये नमूद केलेल्या निकषाप्रमाणे तपासणी करावी व विभागस्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी ग्रामपंचायतींची निवड करून, याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा. याकरिता विभागीय स्तरावर तपासणी समित्या घटित करण्याची कार्यवाही आयुक्त यांनी करावी.

**x) दिनांक १ एप्रिल ते ३० एप्रिल :–**

विभाग स्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर आलेल्या ग्रामपंचायतीचा सत्कार सोहळा व बक्षीस वितरण कार्यक्रम विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली विभागस्तरावर अयोजित करावा.

**xi) दिनांक १ मे ते ३० जून: –**

स्पर्धेतील विभाग स्तरावरील प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त ग्रामपंचायतींची या शासन निर्णया सोबतच्या परिशिष्ट– २ मध्ये नमूद केलेल्या निकषाप्रमाणे राज्यस्तरीय तपासणी समितीने तपासणी करावी व गुणांकनाच्या अधारे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर आलेल्या ग्रामपंचायतींचा एकत्रित अहवाल अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, यांना सादर करावा.

**xii) दिनांक ०१ जुलै ते ३१ऑगष्ट : –**

राज्यस्तरीय तपासणी समितीकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर, अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, आवश्यकता वाटल्यास प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर आलेल्या ग्रामपंचायतीला युनिसेफ व इतर संबंधित अधिकारी यांच्यासह भेट देऊन अंतिम निकाल घोषित करतील.

**xiii) दिनांक २ ऑक्टोबर २०१९: –**

राज्यस्तरावरील बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करावे.

**२. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे नियम :–**

i) प्रत्येक स्तरावरील तपासणी समित्यांनी त्यांना नेमून दिलेल्या कार्य क्षेत्रातील ग्रामपंचायतींची तपासणी कधी व कोणत्या कालावधीत केली याची नोंद ग्रामपंचायतींच्या शेरेबुकात करावी.

ii) तपासणी समितीच्या प्रत्येक सदस्याने काटेकोर तपासणी करून मूल्यांकन नि:पक्षपातीपणे करावे.

iii) प्रत्येक स्तरावरील समितीने दिलेला निर्णय हा अंतिम राहील.

iv) प्रत्येक स्तरावरील तपासणी समितीने त्यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रामध्ये तपासणी अंती गुणपत्रिका तयार करावी व सदस्यांनी गुणपत्रिकेवर स्वाक्षरी करावी.

v) राज्यस्तरावर प्रथम पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतीला पुढील १० वर्षे या अभियानांतर्गत भाग घेता येणार नाही. तथापि राज्यस्तरावरील द्वितीय व तृतीय पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींना या अभियानांतर्गत दर्जा उंचावण्यासाठी त्यापुढील ५ वर्षामधील फक्त दोन स्पर्धांमध्ये भाग घेता येईल. राज्यस्तरावरील द्वितीय व तृतीय पुरस्कार प्राप्त व या व्यतिरिक्त इतर स्तरावरील पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतीस पुन:त्याच स्तरावर व क्रमांकावर बक्षीस पात्र झाल्यास त्यांना पुरस्कार रक्कम देय राहणार नाही. परंतु त्यांना प्रमाणपत्र देय असेल. त्या क्रमांकाचे पुरस्कार व क्रमांक गुणानुक्रमे त्यानंतरच्या ग्रामपंचायतीला देय असेल.

जर पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायत वरच्या स्तरावरील पुरस्कारासाठी पात्र ठरली तर त्या ग्रामपंचायतीला दोन्ही पुरस्कारातील फरकाची रक्कम देय असेल.

vi) या अभियानास जनतेचा प्रतिसाद व लोकसहभाग कायम रहावा किंबहुना आणखी वाढावा तसेच स्वच्छतेस/विकास कामास आलेली गती कायम रहावी यास्तव ग्रामपंचायतींनी केलेल्या कामाचे मूल्यांकन नि:पक्षपातीपणे होणे आवश्यक आहे. या संदर्भात प्रत्येक स्तरावरील तपासणी समितीतील अधिकारी व पदाधिकारी यांची जबाबदारी महत्त्वाची आहे. तपासणी समितीतील किमान दोन–तृतीयांश सदस्यांनी तपासणीसाठी हजर राहणे आवश्यक आहे.

vii) जर दोन किंवा त्यापेक्षा जास्त ग्रामपंचायतींना समसमान गुण प्राप्त झाले तर अशावेळी या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट २ मध्ये नमूद केलेल्या घटकांपैकी सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन व शौचालय व्यवस्थापन या घटकांमध्ये एकूण गुण ज्या ग्रामपंचायतीला जास्त प्राप्त झाले असतील त्या ग्रामपंचायतीला वरचा क्रमांक देण्यात यावा.

viii) प्रत्येक ग्रामपंचायत/पंचायत समिती/जिल्हा परिषद यांनी या अभियानांतर्गत प्राप्त होणाऱ्या बक्षिसांच्या रकमांचा विनियोग स्वच्छतेशी निगडित उपक्रमांवर करावा तसेच स्वच्छतेच्या अनुषंगाने ज्या सफाई कामगारांनी उत्कृष्ट काम केले आहे, अशा उत्कृष्ट सफाई कामगारांची निवड करण्यात येऊन, बक्षिसाच्या रकमेपैकी काही रक्कम सफाई कामगारांच्या आरोग्य संबंधी बाबींवर खर्च करावी.

### ३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धांतर्गत पुरस्कारांच्या रकमा:–

| | | |
|---|---|---|
| १. | उत्कृष्ट प्रभाग | प्रत्येक ग्रामपंचायतीमधील सर्व प्रभांगापैकी सर्वांत जास्त गुण मिळविणाऱ्या प्रत्येक उत्कृष्ट प्रभागास रु. १०,०००/– बक्षीस. |
| २. | गट स्पर्धा | जिल्ह्यातील प्रत्येक जिल्हा परिषद गटातील प्रथम क्रमांकावर आलेल्या ग्रामपंचायतीस रु. ५०,०००/– |
| ३. | जिल्हास्तरावर प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांकावर आलेल्या ग्रामपंचायती | प्रथम – रुपये ५लाख<br>द्वितीय – रुपये ३ लाख.<br>तृतीय – रुपये २ लाख |
| ४. | विभागस्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर आलेल्या ग्रामपंचायती | प्रथम – रुपये १० लाख<br>द्वितीय – रुपये ८ लाख.<br>तृतीय – रुपये ६ लाख |

| | | |
|---|---|---|
| ५. | राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर आलेल्या ग्रामपंचायती | प्रथम – रुपये २५ लाख<br>द्वितीय – रुपये २० लाख<br>तृतीय – रुपये १५ लाख |

## ४. राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ पंचायत समिती व जिल्हा परिषद स्पर्धा :–

गट विकास अधिकारी यांनी पंचायत समितीच्या अखत्यारितील सर्व ग्रामपंचायतींना परिशिष्ट २ प्रमाणे मिळालेल्या गुणांची बेरीज करावी. मिळालेल्या एकूण गुणांच्या ३५% गुण विचारात घेऊन, त्यास ग्रामपंचायतींच्या एकूण संख्येने भागून जे गुण येतील ते जिल्हा परिषदेकडे सादर करावे. जिल्हा परिषदेने पंचायत समिती निहाय माहिती जिल्ह्याच्या सरासरी गुणासह तसेच परिच्छेद–७ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती निहाय माहिती ३१ मार्चपर्यंत शासनास सादर करावी.

## ५. राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हा व पंचायत समिती स्पर्धा गुणांकन व निकष :–

उपरोक्त परिच्छेद – ६ नुसार प्राप्त होणाऱ्या गुणांमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना खालील प्रमाणे ३० गुणांपैकी देण्यात यावेत. सदर गुण परिगणित करताना खालील कोष्टकातील विषयांमध्ये नमूद बाबींच्या अनुषंगाने जिल्हा व पंचायत समिती मधील संख्या विचारात घेण्यात यावी :–

| क्र. | विषय | निकष | गुण |
|---|---|---|---|
| १) | बंद असलेल्या पाणीपुरवठा योजनांची टक्केवारी | एकूण संख्येपैकी १% पेक्षा कमी असल्यास | १० |
| | | १ ते २% असल्यास | ५ |
| | | २ % क्षा जास्त असल्यास | 0 |
| २) | पाणी पट्टी मिळणाऱ्या उत्पन्नातून काही रक्कम योजनेच्या विशेष दुरुस्तीसाठी अन्य खात्यामध्ये जमा केली असल्यास | एकूण योजनांच्या संख्येपैकी २५ % वा त्यापेक्षा जास्त | ५ |
| | | २५% पेक्षा कमी असल्यास | 0 |
| ३) | पाणीपुरवठा योजनेच्या पाण्याच्या नमुन्यांची संख्या व तपासणी अंती पाणी पिण्यास अयोग्य असल्याबाबत प्राप्त झालेला प्रयोगशाळेचा अहवाल | एकूण नमुन्यांच्या संख्यपैकी १० % वा त्यापेक्षा कमी असल्यास | ५ |
| | | १० % पेक्षा जास्त असल्यास | 0 |
| ४) | एकूण शौचालयांची संख्या व प्रत्यक्षात वापरात असलेल्या शौचालयांच्या संख्येमधील फरक (स्वतंत्र यंत्रणेद्वारे केलेल्या सर्वेक्षणानुसार) | एकण शौचालयांच्या संख्येपैकी ५ % वा त्यापेक्षा कमी | ५ |
| | | ५% पेक्षा जास्त असल्यास | 0 |

| क्र. | विषय | निकष | गुण |
|---|---|---|---|
| ५) | गोबरधन योजनेच्या प्रगतीबाबत | योजनेसंदर्भातील कागदपत्रांच्या तपासणीअंती कारणमीमांसेसह गुणांकन देण्यात यावे | ५ |
| | एकूण | | ३० |

सदर ३० गुणांच्या अनुषंगाने राज्यस्तरीय तपासणी समितीमार्फत तपासणी करण्यात येईल.

६. राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हा व स्वच्छ पंचायत समिती स्पर्धेत निवडलेल्या जिल्हा व पंचायत समित्यांना खालील प्रमाणे बक्षिसे देण्यात येतील.

| | | |
|---|---|---|
| १ | राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हा परिषद | प्रथम क्रमांक –रु. १००.०० लाख<br>द्वितीय क्रमांक–रु. ७५०० लाख<br>तृतीय क्रमांक– रु. २०.०० लाख |
| २ | राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ पंचायत समिती | प्रथम क्रमांक – रु.५०.०० लाख<br>द्वितीय क्रमांक– रु.३०.०० लाख<br>तृतीय क्रमांक– रु .२०.०० लाख |

## परिशिष्ट – १

उत्कृष्ट प्रभाग स्पर्धेअंतर्गत केलेल्या कामगिरीच्या मूल्यमापनाचे निकष व त्या अनुषंगाने द्यावयाचे गुण

| क्र | विषय | गुण | एकूण |
|---|---|---|---|
| १. | **पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन** | | २० |
| | **प्रभागामधील पाणीपट्टी वसुली**<br>९१ ते १००% असल्यास – २० गुण<br>७६ ते ९० % असल्यास – १६ गुण<br>५१ ते ७५% असल्यास – १२ गुण<br>५० % व त्यापेक्षा कमी – ८ गुण<br>२५– ते ४९% असल्यास – ४ गुण<br>०– ते २४% असल्यास – ० गुण | २० | |

| क्र | विषय | गुण | एकूण |
|---|---|---|---|
| २. | **शौचालय व्यवस्थापन** | | २० |
| | **i) प्रभागातील कुटुंबाकडील शौचालयाची संख्या**<br>९६ ते१०० % असल्यास - १० गुण<br>९१ ते९५ % असल्यास - ५ गुण<br>व त्यापेक्षा कमी - ० गुण | १० | |
| | **ii) कुटुंबातील सदस्यांकडून शौचालयाचा वापर**<br>९६ ते१०० % असल्यास - १० गुण<br>९१ ते९५ % असल्यास - ५ गुण<br>व त्यापेक्षा कमी - ० गुण | १० | |
| ३. | **घनकचरा व्यवस्थापन** | | १० |
| | घरोघरी कचरापेट्या व सार्वजनिक ठिकाणी कचरापेट्या पुरेशा संख्येने असून त्याचा नियमित वापर होत असून कचरा गोळा करण्यापूर्वी प्रत्येक घरात कचऱ्याचा ओला, सुका व धोकादायक असे वर्गीकरण होत असल्यास - | | १० |
| ४. | **सांडपाणी व्यवस्थापन** | | १० |
| | प्रभागातील सांडपाण्याच्या व्यवस्थापनाकरिता १००% शोषखड्डे असल्यास | १० | |
| ५. | **परिसर स्वच्छता** | | १० |
| | प्रभागातील रस्ते, गल्ल्या, घरासमोरील अंगणे, परसदारे यांची रचना, स्वच्छता व सजावट, गाव व परिसरात फुल झाडे, वृक्ष संवर्धन तसेच प्रभागातील घरांची व घरांच्या कुंपण भिंती (Compound Wall) यांची रंगरंगोटी व सुशोभीकरण. | १०<br>. | |
| ६. | **वैयक्तिक स्वच्छता** | | १० |
| | प्रभागातील ग्रामस्थ, मुला-मुलींची नखे, केस, गणवेश ,कपडे इत्यादीचा स्तर तसेच, अंघोळ, मलमूत्र विसर्जन, हात धुण्याच्या सवयी योग्य असल्यास व प्रभागा मध्ये कोठेही थुंकणे, पिचकारणे असे प्रकार न दिसणे- | १० | |
| ७. | **लोकसहभाग आणि वैयक्तिक व सामूहिक पुढाकारातून प्रभाग विकासासाठी राबविण्यात आलेले नावीन्यपूर्ण उपक्रम.** | | २० |
| | i) प्रभागामध्ये मागील ५ वर्षात एकही धार्मिक/जातीय दंगल/तेढ झाली नसल्यास- | ५ | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ii) प्रभागाने विकासाची कामे लोकसहभागातून, लोकवर्गणीतून केली असल्यास (पुनर्भरण/शाळा /रस्ते/जलसंधारण व इतर कामे)-- | १० | |
| | iii) प्रभागाने स्वच्छता, पर्यावरण, सामाजिक एकता या अनुषंगाने प्रबोधनात्मक चर्चा सत्र व अन्य सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन असल्यास | ५ | |
| | **एकूण गुण** | | **१००** |

## परिशिष्ट -२

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा

**ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत केलेल्या कामगिरीच्या मूल्यमापनाचे निकष व त्या अनुषंगाने द्यावयाचे गुण.**

| क्र | विषय | गुण | एकूण |
|---|---|---|---|
| १. | **पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन** | | ४० |
| | (i) पाणी पट्टी वसुलीचे प्रमाण ९०-१००% असल्यास - ८ गुण<br>७५ - ८८९ % सल्यास - ६ गुण<br>५१ - ७४ % सल्यास - ४ गुण<br>५० % व त्यापेक्षा कमी - 0 गुण | ८ | |
| | (ii) उशिरा पाणीपट्टी अदा करण्याकरिता २% प्रतिमाह दंड अकारले असल्यास | ४ | |
| | (iii) गावामधील पाणीपुरवठ्याच्या सुविधांमधून कुठेही पाणी वाहत नसणे/गळत नसणे. | २ | |
| | (iv) घरगुती नळ जोडणीकरिता नळधारकांनी स्वत: पाणी मीटर बसविला अल्यास | | ३ |
| | (v) पाण्याचा स्त्रोत, साठवण, पाणी वहन मार्ग, सार्वजनिक वितरणाच्या जागा इत्यादी ठिकाणी स्वच्छता व परिसराचे सुशोभीकरण. | ४ | |
| | (vi) टी.सी.एल. पावडरचा नियमित वापर, पाणी नमुन्याची प्रयोग शाळेत १००% नियमित तपासणी (रासायनिक तसेच जैविक प्रदूषण) व तपासणीत १००% पाणी नमुने शुद्ध आढळल्या बाबतचा जिल्हा प्रयोग शाळेचा अहवाल. | ४ | |
| | (vii) गेल्या ३ वर्षात गावात कोणतीही साथ आली नसल्यास व कोणताही<br>जलजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला नसल्यास - ३ वर्षे- ५ गुण<br>२ वर्षे- ३ गुण | ५ | |

| क्र | | विषय | गुण | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | १ वर्षे– २ गुण<br>१ वर्षापेक्षा कमी– १ गुण | | |
| | (viii) | पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे स्वच्छता सर्वेक्षण करून त्यात आढळलेल्या त्रुटींची पूर्तता केली असल्याबाबतचा वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचा दाखला. | ५ | |
| | (ix) | पाणीपुरवठा आनुषंगिक बाबी<br>अ) पाणी सुरक्षितता आराखडा उपलब्ध आहे. – २ गुण<br>आ) प्रशिक्षित जलसुरक्षक कार्यरत असल्यास – १ गुण<br>आ) ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती कार्यरत असल्यास – २ गुण | ५ | |
| २. | | **शौचालय व्यवस्थापन** | **७०** | |
| | i) | गावातील १००% कुटुंबांना शौचालयाची सुविधा असल्यास आणि १००% वापर असल्यास | १० | |
| | ii) | गावातील अंगणवाडीत स्वच्छतागृह असल्यास तसेच हात धुण्यासाठी व्यवस्था असल्यास याबाबत प्रत्यक्ष तपासणी अंती गुण देणे. ३० पट संख्येकरिता किमान एक स्वच्छतागृह असणे आवश्यक आहे. | ५ | |
| | iii) | गावातील शाळा, महाविद्यालय व इतर शैक्षणिक संस्थेत स्वच्छतागृह (मुलांमुलींसाठी स्वतंत्र) असल्यास तसेच हात धुण्यासाठी व्यवस्था असल्या बाबत प्रत्यक्ष तपासणी अंती गुण देणे. (२० पटसंख्येकरिता एक स्वच्छतागृह व हात धुण्यासाठी व्यवस्था असणे आवश्यक). | ५ | |
| | iv) | मासिक पाळी व्यववस्थापनाच्या नियमाप्रमाणे मुलींकरिता स्वतंत्र शौचालय असल्यास | ५ | |
| | v) | गावातील शासकीय, निमशासकीय इमारती, कार्यालय, सहाकारी संस्था, महिला मंडळ, युवक मंडळ अशा संस्थात्मक ठिकाणी पुरेशी शौचालये व मुतारींची व्यवस्था व वापर हात धुण्यासाठी व्यवस्था असल्यास (पुरुष महिलांकरिता स्वतंत्र) | | |
| | vi) | गावात लग्नसमारंभासारख्या प्रसंगी तसेच बाजार, एस. टी. स्टॅण्ड, यात्रास्थळे, पर्यटनस्थळे अशा जादा व्यक्ती येणाऱ्या सार्वजनिक ठिकाणी पुरेशी शौचालये व मुतारींची व्यवस्था वापर व नियमित साफसफाई तसेच हात धुण्यासाठी व्यवस्था असल्यास (पुरुष महिलांकरिता स्वतंत्र) | १० | |
| | vii) | पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतापासून शौचालये योग्य अंतरावर आणि तांत्रिकष्ट्या योग्य असल्यास | १० | |

| क्र | विषय | गुण | एकूण |
|---|---|---|---|
| | viii) पूर्ण भरलेल्या सेप्टिक टाक्या, लीट, पिट संडास, टाकी भरल्यास रिकामी करण्यासाठी व्यवस्थेबाबतची संपूर्ण माहिती ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असल्यास | ५ | |
| | ix) शौचालय दुरुस्तीसाठी आवश्यक साहित्य व प्रशिक्षित मनुष्यबळ संबंधी संपूर्ण माहिती ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असल्यास | ५ | |
| | x) शौचालय वापर आणि देखभाल या अनुषंगाने ग्रामस्थांचे नियमित प्रबोधन होत असल्यास | ५ | |
| ३. | **घनकचरा व्यवस्थापन** | | ३० |
| | i) घरोघरी व सार्वजनिक ठिकाणी कचरापेट्या पुरेशा संख्येने असून त्याचा नियमित वापर होत असणे, कचरा गोळा करण्यापूर्वी प्रत्येक घरात कचऱ्याचे ओला, सुका व धोकादायक असे रोज वर्गीकरण होत असल्यास | १० | |
| | ii) त्याप्रमाणे गावात नियमित कचरा उचलला जात असल्यास व कचरा वाहून नेण्यासाठी सातत्यपूर्ण व स्वतंत्र व्यवस्था केली असल्यास | ५ | |
| | iii) गावातील १००% ओल्या कचऱ्याचे भूनॅडेप/नॅडॅप/गांडूळखत/कंखतपोष्ट खत इत्यादी मार्गाने खतात रूपांतर करण्यात येत असल्यास तसेच आरोग्य केंद्र, दवाखाने व रुग्णालये येथून निर्माण होणारा इतरांच्या आरोग्यास घातक ठरणाऱ्या कचऱ्याचे शास्त्रशुद्ध पद्धतीने विल्हेवाट लावली जात असल्यास | १० | |
| | iv) कचऱ्यापासून आर्थिक उत्पन्न घेण्यात येत असल्यास वा कचऱ्यापासून खत निर्मिती करुन खताचा वापर गावातील वृक्ष, बाग बगीचा मधील झाडांकरिता करीत असल्यास व त्याची नियमित नोंद ग्राम पंचायतीमधील उपलब्ध दस्तऐवजामध्ये असल्यास | ५ | |
| ४. | **सांडपाणी व्यवस्थापन** | | ३० |
| | i) गावातील सांडपाण्याचे शोषखड्डे/परसबाग, बंदिस्त गटारे व परसबाग इत्यादीद्वारे शास्त्रशुद्ध विल्हेवाट. | १० | |
| | ii) ५०% पेक्षा जास्त कुटुंबाकडे सांडपाण्यासाठी शोषखड्डा/परसबाग असल्यास | १० | |
| | iii) मानवी विष्ठा मिश्रित पाणी कुठेही सांडपाण्यामध्ये मिसळणार नाही अशा व्यवस्था असल्यास | ५ | |
| | iv) पाण्याचा नियंत्रित वापर, सांडपाणी धोके व व्यवस्थापन पद्धती याबद्दल ग्रामस्थांचे प्रबोधन नियमित होत असल्यास– | ५ | |
| ५ | **घर, गाव,परिसर स्वच्छता** | | २० |
| | i) गावातील रस्ते, गल्ल्या, घरासमोरील अंगणे, परसदारे यांची रचना, स्वच्छता | ४ | |

| क्र | | विषय | गुण | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | व सजावट, गाव व परिसरात फुलझाडे, वृक्षसंवर्धन, गावात/ घरात /शाळेत/ सरकारी कार्यालये कुठेही थुंकणे, पिचकारी असे प्रकार न दिसणे. | | |
| | ii) | गावातील जनावरांच्या मलमुत्राची शास्त्रशुद्ध पद्धतीने व्यवस्थापन व असलेल्या गोठ्यांची/खुराड्यांची शास्त्रशुद्ध पद्धतीने व्यवस्थापन व असलेल्या गोठ्यांची/ खुराड्यांची शास्त्रशुद्ध व्यवस्था, | | ४ |
| | iii) | गावात कोठेही माशा, चिलटे व डासांसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना व या किटकांचा प्रादुर्भाव नसणे, याकरिता गप्पी मासे पाळणे, गाव परिसरातील मोकळ्या जागा/मैदानांवरील पाणी साठ्यावरील अनावश्यक गवत व इतर रानटी वनस्पती यांची वेळोवेळी छाटणी करणे (चाऱ्यासाठी असलेले गवत सोडून) | २ | |
| | iv) | गावातील सर्व घरे, सार्वजनिक इमारती, कुंपण (Compound Wall) ची रंगरंगोटी व सुशोभीकरण | १० | |
| ६ | | **वैयक्तिक स्वच्छता** | | **१०** |
| | i) | शाळकरी अंगणवाडीतील मुला-मुलींची नखे, केस, गणवेश, कपडे इत्यादींचा स्तर तसेच, अंघोळ, मलमूत्र विसर्जन, हात धुण्याच्या सवयी (Random Sampling) पद्धतीने योग्य असल्यास | ५ | |
| | ii) | गावातील महिला, युवक, युवती, विद्यार्थी, वृद्ध गृहस्थ यांच्या पिण्याच्या पाणी घेण्याच्या सवयी व शौचानंतर, जेवणापूर्वी, जेवणानंतर हात धुण्याच्या सवयी (प्रत्यक्ष निरीक्षण, मुलाखती इत्यादीद्वारे तपासून गुण द्यावेत) | ५ | |
| | | **एकूण गुण** | | **२००** |

## यशवंत पंचायत राज अभियान

**(पंचायत सबलीकरण आणि उत्तरदायित्व प्रोत्साहन योजना)**

### १. अभियानाची सुरुवात :-

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे मोठे योगदान आहे. राज्यात पंचायत राज संस्थांमधून प्रशासकीय व्यवस्थापन व विकास कार्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींसाठी सन २००५-२००६ या वर्षापासून विभाग व राज्य अशा दोन्ही स्तरांवर यशवंत पंचायत राज अभियान सुरू करण्यात आले आहे. राज्यात सुरू असलेल्या यशवंत पंचायत राज अभियानाच्या धर्तीवर देशपातळीवर पंचायत राज मंत्रालयाने पंचायत राज व्यवस्थेच्या सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या राज्यांना तसेच राज्यातील पंचायत राज संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी सन २०११-१२ पासून पंचायत सबलीकरण आणि उत्तरदायित्त्व प्रोत्साहन योजना सुरू केली आहे. ग्राम विकास विभागाने सुरू केलेले यशवंत

पंचायत राज अभियान व केंद्र शासनाने सुरू केलेली पंचायत सबलीकरण आणि उत्तरदायित्त्व प्रोत्साहन योजना यांचा उद्येश एकच असल्याने दोन्ही योजना एकत्रितपणे राबविण्यात येते आहे.

## २. अभियानाचा उद्‌देश :–

- संविधानाच्या (घटनेच्या) ९व्या भागातील कलम २४३ ऋनुसार, पंचायत राज संस्थाना प्रदानीकरणाद्वारे निधी (Funds) कार्य (Functions), मनुष्यब (Functionaries) सक्षम करण्यासाठी राज्यांना प्रोत्साहन देणे.
- पंचायत राज संस्थांच्या कार्यपद्‌धतीमध्ये पारदर्शकता आणि कार्यक्षमतेसाठी उत्तरदायी पद्‌धती अंमलात आणण्यासाठी प्रोत्साहन देणे.

## ३. अभियानातील महत्त्वाचे उपक्रम :–

यशवंत पंचायत राज तथा पंचायत सबलीकरण आणि उत्तरदायित्व प्रोत्साहन योजनेअंतर्गत पंचायत राज संस्थांचे अचूकपणे मूल्यांकन केले जात आहे. जिल्हा परिषदेच्या मूल्यमापनासाठी मुख्य विषय ८ व उपविषय ३५ असून त्यांतील मुद्‌दे ५६, पंचायत समितीच्या मूल्यमापनासाठी मुख्य विषय ७ व उपविषय ३१ असून त्यातील मुद्‌दे ५९ आणि ग्राम पंचायतीच्या मूल्यमापनासाठी मुख्य विषय १७ उपविषय ७२ असून त्यातील मुद्‌दे ४५ यांचा समावेश असल्यामुळे मूल्यमापन करताना पंचायत राज संस्थांची कामगिरी सूक्ष्मपणे तपासली जाते.

## ४. अभियानांतर्गत पुरस्काराचे स्वरूप :–

यशवंत पंचायत राज अभियानामध्ये राज्यातील अत्युत्कृष्ट तीन जिल्हा परिषदा, तीन पंचायत समित्या व तीन ग्रामपंचायतींना राज्यस्तरावर आणि तीन पंचायत समित्या व तीन ग्रामपंचायतींना विभागस्तरावर पुरस्कार देण्यात येतात.

### अ. राज्यस्तरीय पुरस्कार

| पंचायतराज स्तर | पारितोषिक | पारितोषिकाचा तपशील |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | प्रथम पारितोषिक | रुपये २५ लाख रोख रक्कम व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| | द्वितीय पारितोषिक | रुपये १५ लाख रोख रक्कम व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| | प्रथम पारितोषिक | रुपये १० लाख रोख रक्कम व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| पंचायत समिती | प्रथम पारितोषिक | रुपये १५ लाख रोख रक्कम व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| | द्वितीय पारितोषिक | रुपये १२ लाख रोख रक्कम व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| | प्रथम पारितोषिक | रुपये १० लाख रोख रक्कम व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| ग्रामपंचायती | प्रथम पारितोषिक | रुपये ७ लाख रोख रक्कम व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| | द्वितीय पारितोषिक | रुपये ५ लाख रोख रक्कम व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| | प्रथम पारितोषिक | रुपये ३ लाख रोख रक्कम व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |

### ब) विभागस्तरीय पुरस्कार

| पंचायतराज स्तर | पारितोषिक | पारितोषिकाचा तपशिल |
|---|---|---|
| पंचायत समिती | प्रथम पारितोषिक | रुपये १० लाख रोख रक्कम व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| | द्वितीय पारितोषिक | रुपये ७ लाख रोख रक्कम व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| | प्रथम पारितोषिक | रुपये ५ लाख रोख रक्कम व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| ग्रामपंचायती | प्रथम पारितोषिक | रुपये ३ लाख रोख रक्कम व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| | द्वितीय पारितोषिक | रुपये २ लाख रोख रक्कम व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| | प्रथम पारितोषिक | रुपये १ लाख रोख रक्कम व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |

५. या योजने अंतर्गत ग्राम पंचायत खालील कामे करु शकतात.

- पंचायतराज संस्थांच्या शाळांसाठी शाळा इमारती, क्रीडांगणे, काटेरी ताराशिवाय कुंपणे
- अंगणवाडी इमारती
- ग्रामपंचायत कार्यालय (सर्व शासकीय कर्मचाऱ्यांच्या कार्यालयसहीत)
- गावांतर्गत रस्ते व गटारे
- दहन व दफन भूमी
- बस थांबा शेड
- गाव व वाड्यांच्या रस्त्यांवरील विद्युतीकरणाची कामे
- वाचनालय, व्यायामशाळा, सार्वजनिक सभागृहे
- लघुसिंचन कामे
- होड्या व वाहतूक माध्यमे खरेदी
- पाळणा घरे व डे केअर सेंटर्स
- दुरुस्ती व देखभाल
- अन्य कोणतेही काम

## तीर्थक्षेत्र विकास योजना

(संदर्भ : शासन निर्णय दि. १६ नोव्हेंबर २०१२)

### १. योजनेची सुरुवात :–

ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी दिवसेंदिवस देवदर्शनासाठी भाविकांची संख्या मोठया प्रमाणात वाढत आहे. अशा ठिकाणी भाविक किंवा यात्रेकरूंना विविध सोयी सुविधा संबधित स्थानिक स्वराज्य संस्थांना (उदा. ग्रामपंचायत) त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नामुळे पुरविणे शक्य होत नाही. म्हणून शासनाने ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देण्याची योजना सुरू केली.

### २. योजनेचा उद्‌देश :–

या योजनेंतर्गत गावातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मंदिरापर्यंत पोहचरस्ते, पाणीपुरवठ्याची व्यवस्था करणे, स्वच्छतागृह, शौचालय, वाहनतळ, भक्तनिवास, पोहच रस्त्यावरील दिवे आणि संरक्षक भिंत इत्यादी सुविधा निर्माण केल्या जातात.

### ३. योजनेचे निकष :–

- ग्रामीण तीर्थक्षेत्रांची वर्गवारी अ,ब, आणि क या तीन प्रकारांत करण्यात आली आहे.

  वर्ग अ:– राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्त्वाची ठिकाणे आणि ज्यासाठी केंद्र शासनाकडून तसेच इतर राष्ट्रांकडून सहायक अनुदान प्राप्त होत.

  वर्ग ब :– राज्यस्तरावरून तीर्थक्षेत्रांना ब वर्ग दर्जा देण्यासाठी प्रधान सचिव (ग्रामविकास) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

  वर्ग क :– स्थानिक पातळीवर प्रसिद्ध असलेली तीर्थक्षेत्र. या तीर्थक्षेत्रास जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन व विकास समिती निधी मंजूर . सदर निधी नियोजनामार्फत जिल्हा योजनेत जिल्हा परिषदांना उपलब्ध करून दिला जातो.

  तीर्थक्षेतांना ब वर्ग दर्जा देण्यासाठी खालील प्रमाणे निकष ठरविण्यात आले आहेत :–

- विहित प्रपत्रात, तिर्थक्षत्राचे माहात्म व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी वर्षभरात साजरे करण्यात येणारे उत्सव, सण कार्यक्रम इत्यादी.
- तिर्थक्षेत्रास भेट देणाऱ्या भाविकांच्या उपस्थितीबाबतचे विहित नमुन्यातील पोलीस अधीक्षक, यांचे प्रमाणपत्र (सही शिक्क्यासह) (शासनाच्या दि. १९/११/२०११ च्या पत्रासोबत विहित नमुन्यातील प्रमाणपत्र)
- सदर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करावयाच्या कामांसाठी जागा ग्रामपंचायत/जिल्हा परिषदेच्या नांवे असल्याचा ७/१२ उतारा किंवा नमुना ८ (मूळ प्रत) तसेच देवस्थानच्या नावे जागा असल्यास रुपये १०० स्टॅम्प पेपरवर सदर जागा ग्रामपंचायत/जिल्हा परिषदांच्या नावे हस्तांतरित केल्याबाबतचे संमतीपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
- देवस्थान व कामाचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेला कामाचा स्थळदर्शक नकाशा (Site Plan) मूळ प्रत.
- सद्य:स्थितीत तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी असलेल्या पायाभूत सुविधा जसे शौचालय, पार्कींग इ.माहिती देण्यात यावी.

- विकास कामांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली जमीन वनक्षेत्रात येत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.
- विकास कामांची देखभाल-दुरुस्ती देवस्थानमार्फत/ग्रामपंचायतमार्फत करण्यात येणार असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.
- सदर तीर्थक्षेत्रास क वर्ग दर्जा असल्याचा पुरावा (जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत)
- अंदाजपत्रकानुसार घेण्यात येणारी कामं कोणत्याही अन्य योजनेतून मंजूर अथवा प्रस्तावित नसल्याचे प्रमाणपत्र.

  वरील कागदपत्रांसह मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत प्रस्ताव शासनास सादर करावा लागतो.

## शालेय पोषण आहार (Mid Day Meal)

(संदर्भ : शासन निर्णय क्रं. पूप्राशा१०९५/२१३४/प्राशि-२, दि. २२ नोव्हेंबर, १९९५.)

केंद्र शासनाने जाहीर केलेली शालेय पोषण आहार योजना आणि राज्य शासनाच्या कृती कार्यक्रमानुसार प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीरण करणे तसेच विद्यार्थ्यांच्या पटनोंदणीचे व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने ही केंद्र पुरस्कृत योजना सुरू करण्यात आली. रिट याचिका क्रमांक १९६/२००१(Peoples Union for Civil Liverties (PUCL) विरुद्ध भारत सरकार) मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ नोव्हेंबर २००१ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदर योजनेअंतर्गत सन २००२ पासून शिजविलेले अन्न देण्यास सुरुवात झाली. राज्य व केंद्र शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळा या ठिकाणी इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे विद्यार्थी शालेय पोषण आहार योजनेचे लाभार्थी आहेत. सन २००८ पासून ही योजना इयत्ता ८ वी पर्यंत वाढविण्यात आली आहे.

आहाराचे मानक (Norms of Food) - केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या योजनेअंतर्गत इयत्ता १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी ४५० उष्मांक (Calories) आणि १२ ग्रॅम प्रथिने (Proteins) युक्त दुपारचे भोजन (Mid Day Meal) लाभार्थ्यांना देण्यात येते. तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक (Calories) आणि २० ग्रॅम प्रथिने (Proteins) युक्त दुपारचे भोजन (Mid Day Meal) देण्यात येते. या योजनेमध्ये आहार शिजवून देण्याचे काम महिला बचत गट, महिला मंडळ, गरजू महिला अथवा सेवाभावी संस्था यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. शालेय पोषण आहार योजनेसाठी लागणाऱ्या खर्चाची विभागणी केंद्र व राज्यामध्ये ७५:२५ या प्रमाणात करण्यात येते.

शहरी भागामध्ये शालेय पोषण आहार पुरवठा खालील पद्धतीने करण्यात येतो:-

१) शहरी भागामध्ये महानगरपालिका, नगरपालिका कटक मंडळे यांचा समावेश आहे.

२) शहरी भागात शाळेमध्ये जागेची अडचण असल्याने तयार आहाराचा (Ready to Eat) पुरवठा करण्यासाठी महिला संस्था/ बचतगट/ महिलामंडळ/ खानावळवाले यांची नियुक्ती करण्यात येते.

३) शहरी भागातील शाळांपैकी महानगरपालिका, नगरपालिका यांच्या शाळांसाठी महानगरपालिका, नगरपालिका यांचेमार्फत तयार आहाराचा पुरवठा करण्यासाठी पुरवठादाराची नेमणूक करण्यात येते.

४) शहरी भागातील खाजगी संस्थांच्या शाळांसाठी खाजगी शाळेच्या व्यवथापनामार्फत तयार आहाराचा पुरवठा करण्यासाठी पुरवठादाराची नेमणूक करण्यात येते.

स्वयंपाकी तथा मदतनीसांच्या नेमणुकीसाठी मानधन - शालेय पोषण आहार योजनेमध्ये अन् शिजविण्याचे काम करण्यासाठी स्वयंपाकी तथा मदतनीस या कामासाठी स्वतंत्र मानधन अदा करण्यास मान्यता दिली आहे.

ग्रामीण भागासाठी स्वयंपाकी तथा मदतनिसांच्या नेमणुकीसाठी प्रतिमाह २५ विद्यार्थ्यांपर्यंत रु. १०००/-, २६ ते १९९ विद्यार्थ्यांसाठी रु. २०००/- व त्यानंतर प्रत्येक १०० विद्यार्थ्यांमागे रु. १०,०००/- पर्यंतचा निधी १० महिन्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे. स्वयंपाकी तथा मदतनीसासाठी प्रतिवर्ष २३० कोटी खर्च करण्यात येतो.

# महिला व बालविकास विभाग

## बलात्कार/बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि सिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसाहाय्य व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठीची मनोधैर्य योजना

(संदर्भ : शासन निर्णय क्र. संकीर्ण २०११/प्र.क्र.६/का-२, दि. ३१.१०.२०१३)

बलात्कार/बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसाहाय्य व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्यात मनोधैर्य योजना सुरू करण्यात आलेली आहे. सदर योजनेअंतर्गत दि.२.१०.२०१३ पासून घडलेल्या घटनांतील पीडित महिला / बालकांस लाभ देण्यात येतो.

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यास खालील घटनांमध्ये गुन्ह्यांची नोंद झाल्यास लाभ अनुज्ञेय ठरतो:-

**बलात्कार:-** भा.दं.वि.कलम ३७५ व ३७६, ३७६(२), ३७६ (A) ते ३७६ (E)

**बालकांवरील लैंगिक अत्याचार :** Protection of Children from Sexual Offences Act, २०१२ कलम ३, ४, ५ व ६.

**ॲसिड हल्ला :-** भा.दं.वि.कलम, ३२६ (A) ते ३२६ (B) प्रमाणे

### साहाय्याचे स्वरूप :-

बलात्कार व बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रकरणी किमान रु. २ लाख व विशेष प्रकरणांत कमाल रु. ३ लाख रक्कम ॲसिड हल्ल्यात जखमी झालेल्या महिला व बालकांस त्यांचा चेहरा विद्रूप झाल्यास अथवा कायमचे अपंगत्व आल्यास रु. ३ लाख रक्कम, ॲसिड हल्ल्यात इतर जखमा झाल्यास महिला व बालकांस रु. ५० हजार अर्थसाहाय्य पीडित महिला व बालकांना व त्यांच्या वारसदारांना गरजेनुसार निवारा, समुपदेशन, वैद्यकीय मदत, कायदेशीर साहाय्य, व्यवसाय प्रशिक्षण यासारख्या आधार सेवा पुरवून त्यांचे पुनर्वसन केले जाते.

### इतर साहाय्य सुविधा :-

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा गुन्हेगारी क्षति साहाय्य व पुनर्वसन मंडळ स्थापन करण्यात आलेले आहे. पीडित महिलांना तातडीने मानसिक आधार मिळण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात District Trauma Team घटित करण्यात येत आहे.

## एकात्मिक बाल संरक्षण योजना I.C.P.S. (Integrated Child Protection Scheme)

(संदर्भ : शासन निर्णय क्र.: एबावि-२००८/प्र.क्र.५९/का-५, दि.२४.८.२००९.)

राज्यातील बाल विकासाशी संबंधित कार्यान्वित यंत्रणा व योजनेची गुणवत्ता वाढविणे आणि त्या अधिक बळकट करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.

या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्रकल्प साह्य कक्ष (DCPU) यांची दिनांक ३०-७-२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापना करण्यात आली आहे. तसेच दिनांक १८/८/२०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रोग्नोसिस मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च कन्स्लटन्स प्रा.लि. यांची राज्य प्रकल्प सहायक कक्ष म्हणून स्थापना करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था (MSCPS) यांची संख्या नोंदणी अधिनिमय, १८६० खाली नोंदणी करणे आवश्यक असल्यामुळे दिनांक ४/४/२०१२ रोजी धर्मादाय आयुक्त पुणे येथे संस्थेची नोंदणी करण्यात आलेली आहे. या संस्थेचे प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग हे अध्यक्ष असतात व आयुक्त महिला व बालविकास पुणे हे सदस्य सचिव असतात.

एकात्मिक बाल संरक्षण योजने अंतर्गत केंद्र राज्य व स्वयंसेवी संस्था यांचेमार्फत विविध योजना राबविण्यात येतात.

## राजीव गांधी सबला योजना

या योजनेची अतिमहत्त्वाकांक्षी उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत:

- किशोर वयातील मुलींना स्वयं-विकास आणि सबलीकरणाकरिता सक्षम करणे
- त्यांच्या पोषणाची आणि आरोग्याची स्थिती सुधारणे.
- त्यांच्यामध्ये आरोग्य, स्वच्छता, पोषण, पौगंडावस्थेतील प्रजनन आणि लैंगिक आरोग्य (ए आर एस एच), कुटुंब आणि मुलांची काळजी याबाबत जाणीव जागृती करणे.
- त्यांच्या गृह कौशल्ये, जीवन कौशल्ये आणि व्यावसायिक कौशल्यांमध्ये सुधारणा करा.
- शालाबाह्य किशोरावस्थेतील मुलींना औपचारिक/ अनौपचारिक शिक्षण देऊन मुख्यप्रवाहात आणणे.
- त्यांना सद्य:स्थितीत उपलब्ध असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र, सामाजिक आरोग्य केंद्र, टपाल कार्यालय, बँक, पोलीस ठाणे इत्यादी सार्वजनिक सेवांबाबत माहिती देणे आणि मार्गदर्शन करणे.
- सद्य:स्थितीत ही योजना अमरावती, बीड, नांदेड, सातारा, गोंदिया आणि मुंबई या जिल्ह्यांमध्ये सुरू आहे

## बेटी बचाओ बेटी पढ़ाओ योजना

- राज्यातील  बालक लिंग गुणोत्तर वृद्धिंगत करण्याच्या प्रमुख उद्देशाने राज्याच्या महिला आणि बालविकास विभागाने केंद्र शासनाची बेटी बचाओ बेटी पढाओ योजना बीड, जळगाव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली आणि जालना या दहा जिल्ह्यांमध्ये कार्यान्वित केली आहे.
- बेटी बचाओ बेटी पढाओ या योजनेची अतिमहत्त्वाकांक्षी उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:
    - पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनामुळे होणाऱ्या लिंग निवडीला प्रतिबंध करणे. (स्त्रीभृणहत्यांना प्रतिबंध करणे)
    - मुलींच्या जिविताची आणि संरक्षणाची खातरजमा करणे.
    - मुलींच्या शिक्षणाची आणि सामाजिक सहभागाची खातरजमा करणे

## माझी कन्या भाग्यश्री योजना

- दिनांक ८ मार्च २०१५ रोजी महिला आणि बालविकास विभागाने माझी कन्या भाग्यश्री या त्यांच्या पहिल्या वहिल्या अनोख्या योजनेची उद्घोषणा केली.
- या उपक्रमांतर्गत मुलींच्या संगोपनासाठी, शिक्षणासाठी, बालविवाहाला प्रतिबंध करण्यासाठी आणि कौशल्ये विकसनासाठी मुलींच्या कुटुंबीयांना आर्थिक प्रोत्साहन देण्यात येईल.
- या योजनेची काही प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:
    - **मातांना पारितोषिक :** मुलीच्या संगोपनासाठी, शिक्षणासाठी आणि योग्य पोषणासाठी मुलीच्या पालकांना नियमितपणे आर्थिक लाभांश देण्यात येतात.
    - **मुलीकरिता पारितोषिक :** वयाच्या १८ व्या वर्षी, मुलीला कौशल्ये विकसनासाठी आणि उच्चशिक्षणासाठी रुपये १ लाख देण्यात येतील जेणे करून भविष्यात तिला रोजगार मिळाविता येईल आणि तिच्या निश्चित उत्पन्नाची सोय होईल, परंतु तो पर्यंत तिचा विवाह झालेला असता कामा नये.
    - **आजीला पारितोषिक :** बहुसंख्य कुटुंबामध्ये घरातील सासूसासऱ्यांचा मुलगा जन्माला यावा असा आग्रह असतो. यावर तोडगा म्हणून मुलीच्या वडिलांच्या आईला सोन्याचे नाणे तसेच माननीय महिला आणि बालक विकास मंत्र्यातर्फे प्रमाणपत्र देण्यात येईल.
    - **गावाला पारितोषिक :** कोणत्याही गावात जेथे लिंग गुणोत्तर १००० पेक्षा अधिक असेल त्यांना माननिय महिला आणि बालक विकास मंत्र्यातर्फे ५,००.००० रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल.
    - या योजनेंतर्गत शासन दारीद्र्य रेषेवरील कुटुंबातील मुलींना रुपये २१,२०० विमा संरक्षण पुरविण्यात येईल.

## बाल संगोपन योजना (मुलामुलींसाठी कौटुंबिक देखभाल)

- या उपक्रमांतर्गत ज्या मुलांचे पालक अनेक कारणांमुळे जसे की विकार (दीर्घकालीन आजार), मृत्यू, विभक्त होणे, किंवा एका पालकाने सोडून जाणे किंवा अन्य काही आपत्तीमुळे त्यांची काळजी घेण्यास असमर्थ असतात त्यांना तात्पुरते दुसरे कुंटुंब उपलब्ध करून दिले जाते.
- कुटुंबाकडून काळजी घेतली जाणे हा प्रत्येक बालकाचा अधिकार असतो म्हणून जोपासना (फ़ॉस्टर) कार्यक्रमांतर्गत मुलाला थोड्या कालावधीसाठी किंवा दीर्घकालावधीसाठी कुटुंब उपलब्ध करून दिले जाते.
- जोपासना करणाऱ्या पालकांना शासनातर्फे प्रत्येक मुलासाठी त्यांच्या मूलभूत गरजांकरिता ४२५ रुपये मासिक अनुदान सेवाभावी संस्थेमार्फत देण्यात येते. अंमलबजावणी करणाऱ्या सेवाभावी संस्थेला त्या कुटुंबाला भेटी देणे आणि इतर प्रशासकीय कामाकरिता प्रत्येक मुलासाठी ७५ रुपये मासिक अनुदान देण्यात येते.

## बाल सल्ला केंद्र

- राज्याने मुलांच्या सर्जनशील क्षमतांच्या विकासासाठी ही केंद्रे स्थापन करून विविध उपक्रम करण्यासाठी, संधी आणि संवाद साधण्यासाठी, प्रयोग करण्यासाठी, नवनिर्मितीकरिता तसेच त्यांच्या क्षमता आणि आवडीनुसार सादरीकरण करून दाखविण्यासाठी सामायिक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.
- सध्या झोपडपट्टीमधून अशा प्रकारची केंद्रे उघडण्यात आली आहे, मुंबईत सुरू असणाऱ्या अशा एका केंद्रात ७५ ते १०० बालके आहेत.

## निराश्रित महिलांसाठी आधार गृहे

- आधारगृहे सुरक्षित आणि संरक्षित वातावरण पुरवितात. तसेच अन्न, वस्त्र, निवारा, सुरक्षा, वैद्यकीय मदत, शैक्षणिक आणि प्रशिक्षण संबंधित सुविधा, कायदेशीर सल्ला आणि इत्यादी मूलभूत सुविधा पुरवितात.
- ३० दिवसांच्या वास्तव्यानंतर पीडित महिला माहेर योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरतात. विवाह/कौशल्येविकास इत्यादींने पीडितांचे पुनर्वसन करण्यात येते.

## अत्याचारग्रस्त पीडित महिलांसाठी सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय महिला केंद्र

- अत्याचार पीडित महिलांना सल्ला आणि मार्गदर्शन पुरविण्यात येते.
- अशा पीडितांकरिता ही केंद्रे मार्गदर्शन आणि कायदेशीर मदतीबाबतीत सल्ला मिळण्याचे तसेच रोजगार आणि व्यावसायिक प्रशिक्षण मिळण्याचे ठिकाण असते.

## महिला समुपदेशन केंद्र

- अत्याचार पीडितांना (महिला आणि बालक) झालेल्या मानसिक आघातातून बाहेर पडण्यास मदत करण्यासाठी समुपदेशनाची मदत पुरविण्यात येते.

## शुभ मंगल सामूहिक विवाह योजना

- निराश्रित आणि विधवांच्या मुलींच्या विवाहाकरिता प्रत्येक विवाहबद्ध होणाऱ्या जोडप्याला विवाह पूर्व अनुदान देण्यात येते.
- या योजनेचा लाभ वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या निराश्रित महिला आणि विधवांच्या मुलींना घेता येतो.
- अन्य कोणत्याही स्त्रोतातून अनुदान घेणाऱ्या मुलीला या अनुदानाचा लाभ घेता येणार नाही.

## अनाथालय, महिला स्वीकृती केंद्रे आणि संरक्षित गृहे यामधील निराधार आणि परित्यक्ता विधवांच्या मुलींच्या विवाहाकरिता अनुदान

- या योजनेचा शासकीय/बिगर शासकीय सेवाभावी संस्था जसे की राज्येगृहे, अनाथालये, निवारागृहे, माहेर योजनेंतर्गत संरक्षण गृहे आणि बालगृहे येथे राहणाऱ्या, वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या मुलींना लाभ घेता येतो.
- मुलीच्या नावाने रुपये २५,००० चा धनादेश मुलीच्या नावे तिच्या बँकेतील खात्यात (राष्ट्रीयकृत बँकेत) जमा करण्यात येतो, जेणे करून ती विवाहसंबंधित खर्च करू शकेल तसेच भांडीकुडी इत्यादी विकत घेऊ शकेल.